12-10-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A
SGB/ 11:00

10-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A=1
SGB/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन व माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात)

**पृ.शी./मु.शी.**: सभागृह नेता व उप नेत्यासंबंधी घोषणा

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभागृह नेत्याचे पद रिक्त असून महाराष्ट्र विधानपरिषद सभागृह नेत्याच्या नियुक्ती संदर्भात मला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पत्र पाठवून कळविले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 2 च्या पोट-नियम (जे-1) व (जे-2) मधील तरतुदीनुसार विधानपरिषद सभागृह नेता म्हणून श्री.एकनाथराव खडसे-पाटील, मंत्री व विधानपरिषद सभागृह उप नेता म्हणून या सभागृहाचे सदस्य असलेले श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील, मंत्री यांची नियुक्ती करीत आहे.

त्याप्रमाणे मी, श्री.एकनाथराव खडसे-पाटील, मंत्री यांना 'विधानपरिषद सभागृह नेता' व श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील, मंत्री यांना 'विधानपरिषद सभागृह उप नेता' म्हणून घोषित करीत आहे.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन व माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात)

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात)

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.विजय सिद्रामप्पा देशमुख यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देत असतात)

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**ता.प्र.क्र.1445**

(माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही)

----

**ता.प्र.क्र.458**

(माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही)

----

**सभापती** : सभागृहातील वातावरण लक्षात घेता मला कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.03 ते 11.23 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गोपीकिसन बाजोरिया**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातातील फलक फडकावून घोषणा देत असतात)

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे पुढील कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 12.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.24 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला सुरूवात होईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाची सुरूवात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी करण्याची आपली परंपरा आहे, प्रथा आहे. विधान परिषद अस्तित्त्वात आल्यापासून आज पहिल्यांदाच विरोधी पक्ष नेत्यांची निवड न करता सभागृहाचे कामकाज चालत आहे असे मला वाटते. त्यामुळे.......

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला आपण सुरूवात केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही चुकीची परंपरा आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ

**मु.शी.**: राज्यात पडलेला भीषण दुष्काळ या विषयावर श्री.माणिकराव ठाकरे व इतर वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री.माणिकराव ठाकरे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"यंदा राज्यामध्ये अल्पप्रमाणात पाऊस पडल्याने सन 1972 पेक्षाही भीषण दुष्काळ पडलेला आहे. अल्प प्रमाणात पडलेल्या पावसामुळे गेल्या तीन महिन्यात 200 च्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून.....

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात केली आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणाला सुरुवात केलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,....

श्री.माणिकराव ठाकरे : दररोज किमान 2 शेतकरी आत्महत्या करीत असणे, 48 तासात तब्बल 20 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची दु:खद घटना दिनांक 1 डिसेंबर 2014 रोजी निदर्शनास येणे, राज्याच्या निर्मितीनंतर पहिल्यांदाच घडलेली असून अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील 75 वर्षीय श्री.काशिनाथ इंदोरे या शेतकऱ्यांनी स्वत:ची चिता रचून आत्महत्या केली. नांदेड जिल्ह्यातील 32 वर्षीय युवा शेतकऱ्याने शरिराला विद्युत तारा लपेटून आत्महत्या करणे,

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्षनेता निवडी संबंधी चर्चा झाल्यानंतर 1-2 दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : एवढी मोठी भीषण परिस्थिती राज्यात निर्माण झाली असताना शासनाने 19 हजार 67 गावांमध्ये संभाव्य दुष्काळ जाहीर केला असला तरी त्याही पेक्षा जास्त गावांमध्ये दुष्काळ पडलेला असणे, सोयाबीन व कापूस उत्पादन झाले असून या पिकाला उत्पादन खर्चापेक्षाही बाजारात कमी भाव मिळत असल्याने नापिकी व कर्जाच्या ओझ्याखाली नैराश्याला तोंड देत असलेल्या शेतकऱ्याच्या कापूस व सोयाबीन या पिकाला व्यापारी तांत्रिक कारणे दाखवून हमी भावापेक्षाही कमी भावात खरेदी करीत असणे, कापसाची आधारभूत किंमत 6500 मागणी असताना मागील वर्षाच्या 4000 रूपयावरून फक्त 4050 रूपये एवढीच करण्यात येणे,

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेता संबंधातील घोषणा माननीय सभापती करतील. त्यांना मी येथे थोड्या वेळाने पाचारण करतो. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपल्या भाषणास सुरूवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, तसेच अद्याप कापूस फेडरेशनच्या मार्फत अद्याप कापूस खरेदी केंद्र सुरू न होणे, अद्यापही शासनाने दुष्काळामध्ये सापडलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक पॅकेज घोषित केले नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या वारसदारांना किमान 5 लाख रुपये आर्थिक मदत, कृषी पंपाचे वीज बिल माफ, पीक कर्जावरील कर्ज माफी, दूध उत्पादक शेतकऱ्यांचे दुधाचे भाव न वाढविणे इत्यादी, दुष्काळावर मात करण्यासाठी आणि आत्महत्येचे सत्र रोखण्यासाठी कायमस्वरुपी योजना व पॅकेज जाहीर करण्यात यावे, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी नियम 260 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करून या अतिशय जिव्हाळयाच्या व ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी."

सभापती महोदय, या सदनामध्ये राज्यातील गंभीर अशा एका प्रश्नावर मी नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी आपण नियम 260 अनुसार चर्चा करण्यास आम्हाला अनुमती दिली. खरे म्हणजे या प्रश्नावर प्रश्नोत्तराच्या तासापासूनच चर्चा व्हायला पाहिजे होती. तशा प्रकारची मागणी विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य करीत देखील होते. हा प्रश्न अत्यंत गंभीर आणि महत्त्वाचा असल्यामुळे सन्माननीय सदस्य देखील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

आग्रही होते. त्यामुळे आज सकाळी काही काळासाठी सभागृहाचे कामकाज देखील बंद पाडण्यात आले. या प्रस्तावाकडे महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांचे आणि जनतेचे लक्ष लागले आहे. विदर्भातील नागपूर येथे अधिवेशन भरलेले आहे. या अधिवेशन कालावधीतच राज्यात अतिशय भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हे सदन अधिवेशन कालावधीत आम्हाला कुठला न्याय देणार, सर्व प्रतिनिधी आमच्या पाठीशी उभे राहणार की नाहीत, नवीन आलेल्या सरकारची भूमिका काय राहणार आहे, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. यापूर्वी विरोधी पक्षात असलेले सन्माननीय सदस्य आज सदनामध्ये सत्तेमध्ये बसले आहेत ते शासनाचे नेतृत्त्व करीत आहेत. त्यांनी या सदनामध्ये अनेक वेळा शेतकऱ्यांसाठी विविध मागण्या केल्या. त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांनी सभागृहामध्ये आग्रह देखील धरला होता. त्या त्यावेळी तत्कालीन राज्य शासनाने आपले निर्णय जाहीर केले होते, शेतकऱ्यांना मदत केली होती. तेव्हा सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आज राज्यात उद्‌भवलेल्या परिस्थितीचा अत्यंत गांभीर्यपूर्वक विचार केला पाहिजे. आपली चर्चा ही फक्त सहभागी होण्यापुरतीच मर्यादित नसावी. शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याच्या दृष्टीने ही चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे असे माझे मत आहे. आपण राज्यातील संपूर्ण परिस्थिती पहावी. गेल्या काही वर्षांपासून राज्यात दुष्काळ पडत आहे, अवेळी पाऊस पडत आहे. एवढेच नव्हे तर राज्यामध्ये अवेळी मौसमी वारे देखील वाहत आहेत. या बदलत्या स्थितीमुळे मागील 3 वर्षापासून शेतकऱ्यांना सातत्याने दुकाळाशी सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रचंड प्रमाणावर शेतीचे नुकसान होत आहे, नापिकी होत आहे. पर्यायाने राज्यात आत्महत्या होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी 8 ते 15 दिवसातून आत्महत्या व्हायची तेव्हा आम्ही महिना दोन माहिन्यांनी चार ते पाच शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे आकडे ऐकत होतो. ह्या देखील आत्महत्या व्हायला नको होत्या. पण एकेका दिवसांमध्ये 15 ते 20 शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे ऐकावयास मिळते. एवढी भीषण परिस्थिती आज राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवली आहे. गरीब, गरजू शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासनासमोर अडचणी असतात हे आम्हाला मान्य आहे. परंतु, हे राज्य कोणाकरिता चालवायचे आहे ? मत मागायला गेल्यानंतर आपण मतदारांना विश्वास देतो की, आम्ही आपाल्याला मदत करणार आहोत, अडीअडचणीमध्ये धावून येणार आहोत.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .. ..

आणि घसा कोरडा होईपर्यंतची भाषणे आपण करीत असतो. परंतु जेव्हा दुष्काळी परिस्थिती ओढवते तेव्हा दुष्काळावर आपण मार्ग कसा काढतो, शेतकऱ्याना कशा पध्दतीने मदत करतो हा विषय सर्वात महत्वाचा आहे म्हणून शेतकऱ्याला मदत करण्याची भावना आपल्या सर्वांच्या मनात असली पाहिजे. शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाने गेल्या 15 वर्षापासून विरोधी पक्षात काम केले आहे. मागच्या 15 वर्षात काँग्रेस सरकारने दुष्काळी परिस्थितीत कोणकोणती कामे केली याची माहिती आताचे सत्ताधारी पक्ष देऊ शकतील. सदनात प्रश्नांवर चर्चा होत असते. सत्तेमध्ये असताना आम्ही काय केले, तुम्ही सत्तेमध्ये असताना काय केले, यासंदर्भात सभागृहात चर्चा अभिप्रेत असते व त्यापध्दतीने आपण निर्णयही घेत असतो. आज आपल्या राज्यावर दुष्काळाचे जे संकट ओढवले आहे त्याचा मुकाबला करण्याचे धैर्य शासनामध्ये आहे की नाही हे प्रथम स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. आज आमच्या तिजोरीत पैसे नाहीत त्यामुळे जास्त पैसे आम्ही खर्च करु शकत नाही अशी कारणे देऊन चालणार नाही. अशा प्रकारची मानसिकता ठेवून विचार करावयास लागलो तर पुढील 2/3 महिन्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रचंड वाढतील व त्याची जबाबदारी पर्यायाने शासनावर येईल.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, महसूल मंत्री या सर्वांची भाषणे आमच्याकडे आहेत. त्यांची उदाहरणे आम्हाला द्यावयाची नाहीत. जेव्हा मागील काळात दुष्काळ पडला होता त्यावेळी माननीय खडसे साहेबांनी, माननीय देवेंद्र फडणवीस साहेबांनी असे वक्तव्य केले होते की, शेतकऱ्यांच्या हत्येसंदर्भात शासनावर 302 चा गुन्हा नोंदवला पाहिजे व शासनकर्त्यांना शिक्षा केली पाहिजे. या वक्तव्यापेक्षा दुसरे कोणतेही वक्तव्ये गंभीर असू शकत नाही. आपण ज्या भागात राहतो त्या भागातील वर्तमानपत्र वाचतो, टीव्ही वरील बातम्या ऐकतो आणि आपले मत तयार करतो. अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जी आकडेवारी येते त्यानुसार शासन आपले मत बनवित असते. धान पिकविणाऱ्या भागाची काय परिस्थिती आहे याची माहिती त्या भागात राहणाऱ्या लोकप्रतिनिधींना असते. ज्या ठिकाणी कपाशी पिकवली जाते त्या भागाची माहिती त्या भागात राहणाऱ्या लोकप्रतिनिधींना असते. ज्या भागात सोयाबीन पिकविले जाते त्या भागात काय परिस्थिती आहे याची माहिती त्या भागातील लोकप्रतिनिधींना असते. विदर्भात कोरडवाहू शेतीत कापूस पिकविला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

जातो. विदर्भातील शेतकऱ्यांची परिस्थिती फार हलाखीची आहे. विदर्भामध्ये ओलिताखालील क्षेत्र अत्यल्प आहे. माननीय खडसे साहेब ज्या भागात राहतात त्या ठिकाणी ठिबक सिंचन केले जाते. ज्यावेळेस विदर्भातील शेतकऱ्यांच्या पेरणीला सुरुवात झालेली नसते त्यावेळेला बागायती भागातील पिके 1-1, 2-2 फुटांची झालेली असतात. त्यामुळे बागायती आणि कोरडवाहू भागातील उत्पन्नामध्ये खूप मोठया प्रमाणात फरक पडत असतो. साधारणतः शेतकरी कापूस, सोयाबीनचे पीक घेत असतात. समजा 40 टक्के सोयाबीन लावले असेल व 60 टक्के कापूस लावला असेल आणि सोयाबीनमधून नुकसान झाले तर कपाशीमधून फायदा होईल असे शेतकऱ्याला वाटत असते. विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती सुध्दा कापूस आणि सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यापेक्षा वेगळी नाही. सोयाबीनची पेरणी करण्यासाठी शेतकऱ्याला बियाण्यासाठी जवळपास अडीच हजार रुपये लागतात व मिश्र खतासाठी तेराशे रुपये खर्च करावे लागतात. एवढा खर्च करुन जर 3-4 हजार रुपयाचे उत्पन्न मिळत नसेल तर विदर्भातील शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे ? आपण विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्यांना बोलावून मनापासून विचारा की, तू घर खर्च कसा भागविणार आहे, मुलाच्या शिक्षणासाठी खर्च कसा करणार आहे, मुलीचे लग्न कसे करणार आहे ?

सभापती महोदय, धान पिकविणाऱ्या शेतकऱ्याला आमचे सरकार क्विंटलमागे 200 रुपये बोनस देत होते परंतु तो बोनस सुध्दा या सरकारने रद्द केला आहे. विदर्भातील धान, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्याला एक क्विंटल सुध्दा उत्पादन आलेले नाही.

सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळापेक्षा या वर्षाचा दुष्काळ गंभीर आहे. त्यावेळी शेतकऱ्याला एक-दोन क्विंटलपेक्षा जास्त कापूस झाला नव्हता परंतु त्यावेळेस आमच्या सरकारने कापसाला 250 रुपये क्विंटल भाव दिला होता व त्यावेळेस सोन्याचा भाव 300 रुपये तोळा होता. त्यामुळे यासंदर्भातील आजचा फरक लक्षात घेतला तर सन 2012 मध्ये कापसाला 6500 रुपये भाव होता, मागच्या वर्षी 5500 ते 5750 रुपये क्विंटल कापसाला भाव होता. परंतु आज कापसाला 3800 ते 3900 रुपये प्रति क्विंटल भाव दिला जात आहे. आज विदर्भातील शेतकऱ्याला

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ......

अर्धा-एक क्विंटलपेक्षा जास्त कापूस पिकलेला नसताना कापसाला जर 3800 ते 3900 रुपये प्रति क्विंटल भाव असेल तर विदर्भातील शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे ? दुष्काळामुळे विदर्भातील कापूस, सोयाबीन व धान पिकविणाऱ्या शेतकऱ्याची वाताहत लागली आहे. विदर्भामध्ये दररोज 15-15 शेतकरी आत्महत्या करीत आहेत. मराठवाडयामध्ये तर गेल्या 3 वर्षापासून दुष्काळी परिस्थिती आहे. माननीय श्री. एकनाथ शिंदे विरोधी पक्ष नेते होते तेव्हा त्यांनी मराठवाडयातील दुष्काळी भागाला भेटी दिल्या होत्या. विदर्भात मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री सुध्दा गेले होते. त्यावेळेस मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील अर्धे जिल्हे, अर्धी गावे दुष्काळाच्या छायेखाली आहेत. 19000 पेक्षा जास्त गावे दुष्काळसवदृष्य आहेत असे वक्तव्य माननीय मुख्यमंत्र्यांनी केले होते. परंतु ही परिस्थिती दीड महिन्याची होती. अंतिम आणेवारी आणि दुष्काळ सदृश्य परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची आणेवारी कमी लागली नसेल आणि तहसील कार्यालयात तसा त्याने अर्ज केला तर त्यासंदर्भात फेर तपासणी करुन आणेवारी योग्य पध्दतीने लावली जाईल. परंतु आता दुष्काळ सदृश्य गावांची आकडेवारी 19000 पेक्षा पुढे गेली आहेत. आज संपूर्ण राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, राज्यामध्ये सत्तांतर होत असते आणि ते सर्वांना अभिप्रेत देखील आहे. विरोधी पक्ष म्हणून आम्ही आमची भूमिका करण्यास सज्ज आहोत तर सत्ताधारी पक्ष त्यांची भूमिका करण्यास सज्ज आहे. परंतु जनता मात्र तीच आहे. ज्या जनतेला आपणास विश्वास द्यायचा आहे, त्यांच्या अडचणी दूर करायच्या आहेत, त्यांना सहकार्य करायचे आहे त्यांच्याबद्दलच्या सरकारच्या भावना वेगळ्या असतील किंवा त्यांच्या संदर्भातील माहिती आपण देऊ शकला नाहीत तर जनता दुष्काळामध्ये भरडल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, राज्याच्या दौऱ्यावर केंद्रीय कृषी मंत्री आले होते. त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता त्यांनी सांगितले की, कापूस परिसरामध्ये एकाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली नाही. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे आपले दुर्दैव आहे. या सरकारकडून राज्यातील जनतेची दिशाभूल केली जात आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, माननीय केंद्रीय मंत्री महोदयांनी असे कुठेही म्हटलेले नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी "कापूस उत्पादक भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या नाहीत असे केंद्रीय मंत्री महोदयांनी म्हटले" हा उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावा अशी आपणास विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्यात भीषण दुष्काळ पडलेला असून शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि त्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे. केंद्रीय मंत्री महोदय जे बोलले ते पत्रकारांनी छापले. जे तुम्ही आम्ही सर्वांनी वाचले, त्याचा उल्लेख ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात केला. पत्रकांरानी प्रश्न विचारला त्या प्रश्नाला जे उत्तर मिळाले ते इतके दुर्दैवी होते की, मी त्यास निष्काळजीपणा म्हणणार नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असताना त्या केलेल्या नाहीत असे ते कसे म्हणू शकतात ? तेव्हा ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी केलेले वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येऊ नये अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा वादाचा मुद्दा होत नाही. जर त्यामध्ये काही असेल तर माननीय मंत्री महोदय त्यांच्या उत्तरात स्पष्ट करतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, वर्तमानपत्रात जे छापून आले ते मी येथे सांगितले. मी काही आरोप केलेला नाही. काल आपण सर्वांनी विविध चॅनेल्सवरील बातम्या पाहिल्या असतील. त्या बातम्यावरुन दुष्काळाच्या बाबतीत हे सरकार किती गंभीर आहे हे जाणवले. राज्याच्या दौऱ्यावर केंद्रीय कृषी मंत्री आले होते. त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रात दुष्काळ पडलेला आहे, तेव्हा राज्याला मदत देणार का ? त्यावर त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्याने अगोदर दुष्काळ घोषित केला असता तर आम्ही मदत देऊ शकलो असतो. राज्य सरकारने दुष्काळ घोषित केलेला नाही. दुष्काळ घोषित करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. हे सर्व केंद्रीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. आम्ही असे काही म्हटलेले नाही. यावरुन हे सरकार दुष्काळाच्या बाबतीत किती उदासीन आहे हे दिसून येते.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडे महसूल खाते असल्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी आली. या जबाबदारीतून कसे बाहेर पडता येईल हे त्यांनी काही दिवसांपूर्वी आपल्या वक्तव्यातून स्पष्ट केले असा माझा स्पष्ट आरोप आहे. श्री.एकनाथराव खडसे साहेब मराठवाड्याच्या दौऱ्यावर गेले होते. तेथील भागांची पाहणी करताना त्यांनी काही वक्तव्य केले. ते अगदी सहज बोलून गेले, असे नाही. लोकांना काही द्यायचे नसेल तर तशी त्यांची मानसिकता तयार करावी लागते. त्यांनी विजेचे बिल न भरणाऱ्यांना सांगितले की, आपणाकडे मोबाईचे बिल भरण्याकरिता पैसे आहेत, परंतु विजेचे बिल भरण्याकरिता पैसे नाहीत. त्यांचे हे वक्तव्य दुर्दैवी आहे. त्यानंतर त्यांनी सांगितले की, शासनाची तिजोरी रिकामी झालेली आहे, आपणास पैसे देण्याकरिता आमच्याकडे पैसे नाहीत. श्री.एकनाथराव खडसेसाहेबांनी युती शासनाच्या काळात वित्तमंत्री म्हणून कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांना याची पूर्ण कल्पना आहे की, युती शासनाने सत्ता सोडली त्यावेळी राज्यावर 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले होते. त्या 45 हजार कोटीवरील व्याजाची रक्कम साधारणत: तीन ते साडेतीन लाख कोटी रुपये होते. आपण काही गोष्टी लपविण्याकरिता अगोदरच्या सरकारवर खापर फोडत आहात. आमचा यामध्ये काही

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे... 12:20

श्री.माणिकराव ठाकरे...

दोष नाही असे सांगत आहात. सरकारकडे पैसे नाहीत म्हणून आपणास मदत करता येणार नाही अशी त्यांनी जनतेची मानसिकता करुन ठेवली आहे आणि ती राज्याच्या दृष्टीने दुर्दैवी बाब आहे.

सभापती महोदय, आज आपण दुष्काळावर चर्चा करीत आहोत. याच सदनामध्ये काही महिन्यापूर्वी गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात चर्चा झाली होती. या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. आम्ही त्या ठिकाणी भेट देण्यास गेलो होतो. विरोधी पक्षातील नेते देखील त्या ठिकाणी भेट देण्यास गेले होते. त्यावेळी अनेकांनी मागणी केली की, शेतकऱ्यांना चांगली आर्थिक मदत मिळाली पाहिजे. त्या अगोदर देखील राज्यात दुष्काळ पडला होता. कपासी, सोयाबीन पिकांवर रोग पडून शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. त्यावेळी शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी झाली होती. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मागील तीन वर्षामध्ये काँग्रेस पक्षाच्या सरकारने शेतकऱ्यांना साडेनऊ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. शेतकरी अडचणीत असताना, संकटात सापडलेला असताना त्यांना मदत करण्याची भूमिका काँग्रेस पक्षाने केलेली आहे. परंतु आज शेतकऱ्यांवर भयंकर परिस्थिती ओढवलेली आहे. त्यावेळच्या स्थितीमध्ये आणि आजच्या स्थितीमध्ये प्रचंड अंतर आहे. 1972 पेक्षा हा मोठा दुष्काळ आहे असे माननीय मुख्यमंत्री सांगत आहेत. दुष्काळग्रस्त गावांची संख्या वाढली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची संख्या वाढली आहे. धान, कापूस, सोयाबीन, मका, कांदा, ज्वारी, ऊस, फळबाग उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. तेव्हा त्यांच्याशी समन्वय साधून त्यांना योग्य भाव देऊन त्यांना न्याय देण्याची भूमिका सरकारने घेतली पाहिजे. या दुष्काळामध्ये दूध उत्पादक शेतकरीसुद्धा सापडलेला आहे. केंद्र सरकारने दुधाच्या भावाच्या संदर्भात जे निर्णय घेतले त्यामुळे तो अडचणीत सापडलेला आहे. आपण नेमके काय करावे हे त्याला सुचत नाही. तेव्हा दूध उत्पादक शेतकऱ्यांना भाव वाढवून देण्याची गरज आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गेल्या वर्षी मराठवाड्यात दुष्काळ पडला असताना त्या ठिकाणी टँकर पुरविण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर देण्यात आले. दुष्काळामध्ये कामाची कमतरता पडू दिली नाही. जनावरांना चारा कमी पडू दिला नाही. फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना सुद्धा मदत करण्यात आली होती, अशा त-हेचे निर्णय आमच्या सरकारने घेतले होते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

मागच्या कालखंडात संपूर्ण दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या पाठीमागे शासन खंबीरपणे उभे होते. त्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीमागे गांभीर्याने उभे राहिले होते. आज अपुऱ्या पावसामुळे शेती माल पिकलेला नाही. शिवाय दोन महिने उशिरा पेरण्या झाल्यामुळे हातचे पीक गेले. त्यामुळे स्वाभाविकपणे पिण्याचे पाणीही कमी होणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट आहे की, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचे आहे ते मला माहीत नाही. ते असे म्हणाले होते की, या वर्षी शेती मालाचा दुष्काळ आहे, पाण्याचा दुष्काळ नाही. मला याचे आश्चर्य वाटले. वास्तविक पाहता पाण्याचा दुष्काळ असल्यामुळेच शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आणि शेतीमध्ये उत्पन्न येऊ शकले नाही. अशा परिस्थितीत पाण्याचा दुष्काळ नाही असे म्हणणे म्हणजे आपण कोणत्या राज्यात आहोत हेच मला कळत नाही. खरे म्हणजे अपुऱ्या पाण्यामुळेच राज्यावर ही परिस्थिती ओढवलेली आहे.

महोदय, कापूस फेडरेशनच्या माध्यमातून मागील 10-15 वर्षांपासून खरेदी बंद आहे. आमच्या सरकारच्या काळात हे बंद झाले ही गोष्ट मला मान्य आहे. आताचे सरकार कापूस फेडरेशन सुरु करणार असेल तर ती चांगलीच गोष्ट आहे. कापूस एकाधिकार योजना गेल्यानंतर केंद्र सरकारने राज्यासाठी आधारभूत किंमत ठरवून दिली. परंतु त्या किंमतीमुळे कधीही कोणीही समाधानी राहिले नाही. व्यापाऱ्यांकडून आधारभूत किंमतीपेक्षा अधिक किंमत मिळत होती. त्यामुळे गेल्या 10-12 वर्षांचे रेकॉर्ड पाहिले तर शेतकऱ्यांनी कापूस एकाधिकार योजना सुरु करण्याबाबत कधीही आग्रह धरला नाही. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते संपूर्ण राज्यभर फिरत होते. त्यांना कोणत्या भागात कोणते दर आहेत याची माहिती आहे. 2012 मध्ये कापसाला प्रति क्विंटल 6500 ते 7000 रुपये भाव होता. 2013 मध्ये साडेपाच ते पावणेसहा हजार रुपये भाव होता. त्यावेळी कधीही आधारभूत किंमतीची गरज पडली नव्हती. या वर्षी कापसाला 3800 ते 3900 रुपये भाव आहे. या वर्षी तर कापूसही नाही आणि कापसाला भाव सुध्दा नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना भाववाढ देण्याची गरज आहे. मी तर म्हणेन की, कापसाला प्रति क्विंटल 6500 रुपये भाव दिला पाहिजे आणि त्यातील फरक शासनाने भरुन दिला पाहिजे. मग तो फरक बोनस स्वरुपात

श्री.माणिकराव ठाकरे....

द्या किंवा अन्य कोणत्याही स्वरुपात द्या. परंतु त्यांना एकरी किंवा हेक्टरीमध्ये मदत दिली पाहिजे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मागे सांगितले होते की, आम्ही बोनस देणार आहोत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आजपर्यंत सी.सी.आय.कडे किती शेतकऱ्यांनी कापूस दिला ? माननीय मंत्री श्री.खडसे साहेब, आपले दिल्ली दरबारी वजन आहे, असे माझे मत आहे. सभापती महोदय, कापसाची खरेदी फेडरेशनने केली नाही तर राज्य सरकार नाफेडला खरेदी करण्यास सांगत होते. कारण नाफेड हे कोणत्याही कृषी मालाचे खरेदी केंद्र आहे. परंतु नाफेडने सांगितले की, या वर्षी महाराष्ट्रातील खरेदी करणार नाही. ही खरेदी सी.सी.आय. ने करावी असे त्यांनी सांगितले. मुळात सी.सी.आय. ही कृषी मालाची खरेदी करणारी संस्था नाही. सी.सी.आय. चा उद्देश चांगल्या दर्जाचा कापूस खरेदी करुन तो मिल मालकांना पुरविणे हा आहे. नाफेडला खरेदी केंद्र उघडून दिले. त्यातून त्यांना 2 टक्के टक्केवारी मिळत होती. परंतु आता सी.सी.आय.कडे ते काम देण्याचा घाट घातला जात असून त्यांना एका टक्केवारीमध्ये ते काम करण्यास सांगितले आहे. याचा अर्थ असा की, आज कोठेही कापूस खरेदी केंद्र सुरु नाही. किंबहुना, कापूस खरेदी करण्यास कोणीही तयार नाही. कापसाला 4 हजार रुपये आधारभूत किंमत कदापि कोणालाही मान्य होऊ शकत नाही. आज दुर्दैवं असे आहे की, काही शेतकरी कापूस विकून मोकळे झाले आहेत. कारण त्यांना लोकांची देणी द्यावयाची होती. त्यामुळे कापूस विक्रीतून मिळालेले पैसे संपले आहेत. आता आपण कसे जगू अशी चिंता कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लागलेली आहे. मुलांची फी कशी भरु, त्यांच्या शिक्षणाचा खर्च कसा भागवू, मुलांचे लग्न कसे करु, अशा अनेक समस्या त्यांना भेडसावत आहेत. आताच्या परिस्थितीत लग्नाचा विषय सोडूनच द्या. असो.

महोदय, मराठवाडा विभागामध्ये रब्बीचे पीक घेण्यास कोणीही तयार नाही. ज्या भागात 17 लाख हेक्टर रब्बी पीक घेतले जात होते त्या भागात ते प्रमाण आज 3 लाख हेक्टरवर आले आहे. याचाच अर्थ त्या भागातील शेतकऱ्यांची रब्बी पीक घेण्याची क्षमता राहिलेली नाही. वीज बिल आणि शेतकऱ्यांवर ओढवलेली परिस्थिती यातून सर्वप्रथम कसा मार्ग काढावा अशी चिंता त्यांच्यासमोर आहे. त्यामुळेच शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहेत. या शेतकऱ्यांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

आर्थिक पॅकेज देण्याच्या बाबतीत सर्वांचेच एकमत असण्यात कोणतीही अडचण नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे सभागृहातून निघून गेले आहेत. माननीय श्री.उध्दव ठाकरे हे त्यांच्या पक्षाच्या 63 आमदारांना एकत्र ठेवण्यासाठी दुष्काळी भागाची पाहणी करण्यासाठी मराठवाड्यात घेऊन गेले होते. ही मंडळी भक्कमपणे आमच्या पाठीमागे आहे हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माननीय श्री.उध्दव ठाकरे यांनी दुष्काळग्रस्त भागातील आमदारांसह दुष्काळग्रस्त मराठवाड्याचा दिनांक 24 व 25 नोव्हेंबर, 2014 रोजी दौरा केला. त्यांनी सांगितले की, या दौऱ्यात मी दुष्काळी परिस्थितीचे जे दृश्य पाहिले आणि दुष्काळग्रस्त लोकांच्या तोंडून ज्या कथा ऐकल्या त्यामुळे मी अत्यंत दुःखी झालो आहे. महोदय, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांनी बघितली, त्यांच्यावर ओढवलेल्या परिस्थितीची माहिती घेतली आणि त्यानंतर त्यांनी माननीय राज्यपालांना निवेदन दिले. कारण सरकार ऐकत नव्हते. त्यांनी आपल्या पक्षाच्या 63 आमदारांना दुष्काळी भागात नेऊनही सरकार प्रतिसाद देण्यास तयार नव्हते. त्यामुळे त्यांनी माननीय राज्यपालांचा दरवाजा गाठला. त्यांच्याकडे त्यांनी अनेक मागण्या केल्या. परंतु मी त्यातील एक-दोन मागण्यांचाच उल्लेख जाणीवपूर्वक करेन. त्यांनी मागणी केली की, शेतकऱ्यांची कर्ज वसुली ताबडतोब थांबवावी आणि त्यांची कर्ज माफी करावी. या ठिकाणी शिवसेना पक्षाचे सन्माननीय मंत्री आणि सन्माननीय सदस्य सुध्दा आहेत. ते सुध्दा माझ्या मताशी सहमत असतीलच. तसेच त्यांनी दुसरी मागणी अशी केली की, कोरडवाहू शेतकऱ्यांना एकरी 10 हजार रुपये आणि हेक्टरी 25 हजार रुपये मदत करावी. महोदय, ही मागणी आम्ही नव्हे तर सत्तेत बसलेल्या माननीय मंत्र्यांनीच केली होती. तसेच तिसरी मागणी अशी केली होती की, मराठवाड्यामध्ये 183 प्रकल्प रखडलेले आहेत. ते प्रकल्प सुरु करावेत. परंतु सरकार या गोष्टी करण्याची शक्यता नाही म्हणून घटनेच्या कलम 371 (2) अन्वये शासनास या गोष्टी करण्यास भाग पाडावे, अशा प्रकारची सुध्दा त्यांनी मागणी केली होती. आज शिवसेना पक्षाचे मंत्री सभागृहात बसलेले आहेत. त्यांना खरोखरच शेतकऱ्यांच्या दुःखाची चिंता आणि चहाड असेल तर त्यांनी शासनाला स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, कोरडवाहू शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये आणि

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 12:30

श्री.माणिकराव ठाकरे....

ओलिताखालील शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करण्याची आम्ही जी मागणी केली होती ती मागणी जर सरकार मान्य करीत नसेल तर आम्ही मंत्रिमंडळातून बाहेर पडू. या चर्चेच्या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अशा प्रकारची भूमिका शिवसेना पक्षाचे मंत्री घेतील काय ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

त्यांचे सन्माननीय नेते देखील अशी भूमिका घेतील का, हा त्यांना माझा प्रश्न आहे. बोलायचे एक आणि करायचे एक, हे योग्य नाही. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे (पाटील) साहेबांचे भाषण मी वाचून दाखवित नाही. सर्व सन्माननीय सदस्यांकडे त्यांच्या भाषणाच्या प्रती आहेत, ते वाचून दाखवतील, माननीय मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार साहेबांची भाषणे वाचून दाखवतील. माननीय मंत्र्यांनी त्यावेळी, सरकारमधील मंत्र्यांना फाशीवर चढवा, असे सांगितले होते. असे केले असते तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे कोणीही मंत्री शिल्लक राहिले नसते. त्यांनी या राज्यामध्ये काय काय वाक्य वापरली ते आपल्याला माहीत आहे. आम्ही त्याचा वापर यामध्ये करणार नाही. दुष्काळासारख्या अत्यंत गंभीर असलेल्या प्रश्नी आपण शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचा निर्णय सदन आणि राज्य घेणार का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आज रोज 15 शेतकऱ्यांकडून आत्महत्या होत आहेत. आपण पुढच्या काळात अशा प्रकारचे राज्य चालविले आणि शेतकऱ्यांच्या 25 हजार रूपये कोरडवाहूसाठी व 50 हजार रूपये ओलिताखालील शेतीसाठी व फळ बागांसाठी मदत दिली नाही तर आम्ही कदापिही सदनाचे कामकाज चालू देणार नाही आणि आपणास सदनाच्या बाहेर फिरू देणार नाही, हे मी जाहिरपणे सांगतो. कारण हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. ते आत्महत्या करीत आहेत. शेतकरी आत्महत्या करीत असतील तर यापेक्षा जास्त मोठा प्रश्न राज्यामध्ये कोणताही होऊ शकत नाही. तिजोरी खाली झाली तरीही चालेल. काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या संदर्भात तिजोरीकडे कधीही पाहिले नाही. निश्चितच मागच्या काळामध्ये आपणही अनेकदा मदतीची मागणी केली होती आणि आम्हीही ती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पावले टाकली होती. सरकारने कर्ज काढण्यास मागे पुढे पाहू नये. पण शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका, मग तो सोयाबीन, कापूस, धान, मका, कांदा, ज्वारी उत्पादक शेतकरी असेल. आपण या सर्वांच्या पाठीमागे सदन म्हणून एकत्रितपणे उभे राहिले पाहिजे. त्यांना वाऱ्यावर सोडता कामा नये. ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या झालेल्या आहेत त्यांना शासनामार्फत किमान 1 लाख रूपये दिले जात होते. आता त्यांना किमान 5 लाख रूपयांपर्यंत मदत केली पाहिजे, ही मागणी मी या निमित्ताने आपल्याला करीत आहे. आपण या विषयाकडे अत्यंत गंभीरपणे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

पहावे आणि दुष्काळाच्या संदर्भातील आर्थिक पॅकेज तत्काळ जाहीर करावे. केंद्र शासनाच्या भरवशावर राहू नये. काँग्रेसने केंद्र शासनाकडे कधीही बोट दाखविले नाही. तिकडे पाठविले आहे, तिकडून टीम येईल तेव्हा देण्यात येईल, असे कधीही सांगितले नाही. टीम येत असते. माजी आदरणीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेब स्वत: आले होते. टीम पाठविली होती. टीम पाठविण्यास फार वेळ लागला नाही. दुष्काळ पडत आहे, असे समजल्यावर तत्काळ टीम येऊन गेली. दुष्काळ जाहीर करण्याअगोदर टीम आली. परंतु, आज दुष्काळ जाहीर करण्याचे काम सुध्दा या राज्य सरकारने केलेले नाही, असे स्वत: कॅबिनेट मंत्री आणि देशाचे माननीय कृषी मंत्री म्हणत आहेत. अशा प्रकारे हे राज्य चालत असेल, शेतकऱ्यांच्याबद्दल सर्व प्रकारची उदासीनता दाखवित असेल तर कितीही कनवाळूपणे भाषण केले, कितीही आवाज वाढवून भाषण केले तरी त्याने शेतकऱ्यांचे भागणार नाही. आपण दुष्काळाच्या संदर्भातील आर्थिक पॅकेज कधी जाहीर करता, ते सांगावे. दुष्काळामध्ये मिळणाऱ्या सवलती देखील शेतकऱ्यांना मिळाल्या पाहिजेत, मग त्या पिण्याचे पाणी, रोजगार, चारा, दुष्काळामध्ये माफ होणारी शिक्षण फी, वीज असेल. आपण या संदर्भात त्यांना मदत करण्याची गरज आहे. काही भागात असेल. परंतु दुष्काळाचा भाग वेगळा आहे. दुष्काळासाठीचे आर्थिक पॅकेज वेगळे आहे. दुष्काळ आहे म्हणून पाण्याचे टँकर पाठविणे इत्यादी मदत करीत आहोत, असे सांगणे ठीक आहे. परंतु आर्थिक पॅकेज द्यायचे नाही, हे बरोबर नाही. तिजोरीवर बसून राहणे योग्य नाही. लोकांना हातवारे करून सांगायचे की, आम्ही दुष्काळासाठी उपाययोजना करीत आहोत, हे बरोबर नाही, याला अर्थ राहणार नाही. आपण दुष्काळाच्या संदर्भातील गांभीर्य ओळखून आर्थिक पॅकेज तत्काळ घोषित केले पाहजे, असा मी आग्रह करतो. सभापती महोदय, दुष्काळाच्या चर्चेसाठी अडीच तासांपेक्षा जास्त वेळ मिळाला पाहिजे. दुष्काळावर भाषण करणारे सन्माननीय सदस्य बरेच आहेत. आपण या चर्चेसाठीची वेळ वाढवून दिली तर त्यांना बोलण्यास संधी मिळेल, अशी विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दुष्काळाच्या प्रस्तावावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहेत, याची आपल्याला कल्पना आहे. मी एवढेच सांगेन की, आपण भाषण करताना त्यामध्ये विषयांची पुनरावृत्ती करूनये.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये सुरू असलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, आपण पहा की, नियती किती क्रूर असते. 15 वर्षांनंतर युतीचे राज्य आले. सततच्या दुष्काळामुळे कर्जबाजारीपणामुळे 1775 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आम्ही त्यांच्या विधवांनाही पूर्णपणे मदत करू शकलो नाही. त्यांचे प्रश्न आक्रोश करीत आमच्या समोर येत आहेत. 50 वर्षे राज्य करूनही जे प्रश्न सुटले नाहीत ते प्रश्न आता आम्ही सोडविण्याचा प्रयत्न करणार आहोत. 50 वर्षांचा वयस्क 40 दिवसांच्या मुलाला प्रश्न विचारतो की, दुष्काळाचा प्रश्न कसा सुटणार, हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. गेल्या 50 वर्षांत पडला नाही एवढा भीषण दुष्काळ पडला आहे. 15 वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडून आत्महत्या झाल्या आहेत. त्या आत्महत्यांच्या संदर्भात मला वाईट वाटत आहे. अमरावतीमध्ये सन 2001 पासून सन 2014 पर्यंत 9606 आत्महत्या झाल्या. नागपूरमध्ये सन 2001 पासून सन 2014 पर्यंत 2624 आत्महत्या झाल्या.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्ही विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे भाषण ऐकले. आम्ही त्यांचे भाषण सुरूअसताना शांत बसलो. मग आता सन्माननीय सदस्य माझ्या भाषणामध्ये का अडथळा निर्माण करीत आहेत ? शेतकऱ्यांच्या इतक्या आत्महत्या झालेल्या आहेत.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सभागृहात सुरूअसलेल्या प्रस्तावावरील चर्चेचे गांभीर्य घालवू नका. आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा त्याच संदर्भात हरकतीचा मुद्दा आहे. राज्यामध्ये भीषण दुष्काळ आहे आणि सभागृहातही त्याच विषयावर चर्चा सुरू आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सर्व मुद्दे उपस्थित केले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या ज्येष्ठ सदस्या आहेत. मी त्यांची अनेक भाषणे ऐकली आहेत. सन्माननीय सदस्यांनी भाषणाची सुरूवात प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तराने केली की त्या प्रस्तावावर बोलत आहेत हे समजले नाही. सन्माननीय सदस्यांच्या भाषणाच्या सुरूवातीच्या बोलण्यामुळे माझ्या सारख्याला संभ्रम निर्माण झाला आहे की, मी सरकारचे उत्तर ऐकत आहे की दुष्काळावरील भाषण ऐकत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

आहे, कापूस, धान, ऊस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकत आहोत. आम्हाला हे समजले तर बरे होईल. आम्हाला याबाबत समजले तर आमच्या ज्ञानात भर पडेल. शेतकरी ज्या झाळा सोसत आहे, त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अवगत केले तर जास्त चांगले होईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी वस्तुस्थितीचा आधार घेऊन बोलत आहे. मी दुष्काळाच्या विषयावर येणारच आहे. आमचेही तेच प्रश्न आहेत. माझा म्हणण्याचा उद्देश आरोपाचा नाही. गेल्या 15 वर्षांत आपण कायमस्वरूपी योजना करून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी योजना आखल्या असत्या तर खूप चांगले झाले असते. आपल्याला सन 1972 च्या दुष्काळाकडे पाहण्याची वेळ आली नसती. माझे म्हणणे एवढेच आहे की, काँग्रेस तेव्हा तुझा धर्म कुठे गेला होता ? शेतकरी कोणत्याही पक्षाचा, जातीचा, धर्माचा, पंथाचा नसतो. तो बळीराजा असतो. देशाचा पोशिंदा असतो. त्याला मदत करण्याचे काम तुमचे आमचे सर्वांचे असते. हे कोणाचे एकट्याचे काम नसते, याचा विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, शब्द कसे बदलत असतात ते पहा. यापूर्वी दुष्काळाच्या बाबतीत आम्ही चर्चा करतो होतो. त्यावेळी दुष्काळ हा रब्बी पिकांचा, खरीप पिकांचा घोषित केला जातो, असे आम्हाला सांगितले जात होते. जानेवारी, 2015 च्या पहिल्या आठवड्यापर्यंत दुष्काळ घोषित होत असतो. आपल्याकडून 'दुष्काळ' हा शब्द काढून टाकण्यात आला आहे. आपण आपल्याकडून 'टंचाईग्रस्त विभाग' असे घोषित करतो. त्यामुळे बोलत असताना सर्वांनी थोडा विचार करून शेतकऱ्यांच्या संदर्भात बोलले पाहिजे, असे माझेही मत आहे. संपूर्ण राज्यात प्रचंड दुष्काळ आहे. गेल्या 3 वर्षांपासून ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट अशा परिस्थितीत आमचा शेतकरी सापडला आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

सर्वात महत्त्वाचे असे आहे की, ओला दुष्काळ आला की शेतकरी अडचणीत येतो. पण पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चाऱ्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कोरड्या दुष्काळात मात्र हे सर्व प्रश्न मोठ्या प्रमाणावर आ वासून उभे राहतात. सन 1972 मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे जे प्रश्न निर्माण झाले होते त्याच प्रश्नांना सामोरे जाण्याची वेळ आज आपल्यावर आलेली आहे. सन 1972 च्या दुष्काळात मजुरांना काम मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, यासाठी आपण रोजगार हमी योजना सुरु केली आणि त्यासाठी स्वतंत्र निधी उभारण्याचा निर्णय घेतला. त्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांना आपण मदत करु शकलो. त्या नंतरही ज्या ज्या वेळी अशी परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी शासकीय तिजोरीवर भार न देता आपण शेतकऱ्यांना या योजनेच्या माध्यमातून मदत करु शकत होतो. व्यवसाय कराच्या माध्यमातून जमा होणारा निधी आपण यासाठी उपयोगात आणीत होतो. परंतु, मागील सरकारने यामध्ये बदल केला आहे. व्यवसाय कराच्या माध्यमातून जमा होणारा सर्व निधी बजेटमध्ये टाकण्यात आला आणि त्यामुळे आज पुन्हा एकदा शेतकऱ्यांना कशा प्रकारे मदत करावी, असा प्रश्न आपल्या समोर उभा राहिलेला आहे. त्यामुळे या निर्णयाचा फेरविचार करण्याची वेळ आलेली आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, दिनांक 30 जुलै, 2014 अखेर पडलेल्या पावसाची परिस्थितीत अशी होती की, 355 तालुक्यांमध्ये कमी पाऊस पडल्यामुळे टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली. सुरुवातीची आणेवारी ही तात्पुरती आणेवारी असते, नजर अंदाज आणेवारी असते. डिसेंबर महिना उलटून गेल्यानंतर अंतिम आणेवारी घोषित होत असते आणि त्यावेळी खरी परिस्थिती आपल्या समोर येत असते.

सभापती महोदय, उदाहरणच द्यावयाचे झाले तर आमच्या भागात धानाचे पट्टे आहेत. आता धानाला कोठे लोंबे आली आहेत व आता आणेवारी काढण्यास सुरुवात झाली आहे. धानाचे दाणे किती भरलेले आहेत, किती कोरडे आहेत, किती फोल आहेत, याची तपासणी करुन दाण्यानुसार व परिस्थितीनुसार आणेवारी घोषित होत असते.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

सभापती महोदय, या वर्षी खरोखरच कमी पाऊस झाला आहे. ज्यावेळी पिकांना पाण्याची आवश्यकता होती, त्यावेळी पाऊस पडला नाही. थोड्या थोड्या अंतराने पाऊस पडला. मधल्या कालावधीत तर सुमारे एक महिना पावसाने दडी मारली, पिकांवर मोठा परिणाम झाला आणि शेतकरी हवालदिल झाला. मराठवाड्यामध्ये 50 टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाला आणि त्यामुळे 123 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. विदर्भात 26 ते 50 टक्के एवढाच पाऊस झाला, मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आणि संपूर्ण विदर्भात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. धरणातील पाणी साठा देखील 30 टक्क्यांच्या खाली गेलेला आहे. भविष्यात पाण्याची काय स्थिती असेल, याचा विचार शेतकरी करीत आहे. परंतु, निश्चितपणे शासन या परिस्थितीचा विचार करणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील 10580 गावे टंचाईग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली आहेत. अमरावती विभागातील 5818, नागपूर विभागातील 4033, नाशिक विभागातील 578 आणि पुणे विभागातील 151 गावांचा यामध्ये समावेश आहे. या आकडेवारीचा आपण विचार केला तर नागपूर, अमरावतीसह विदर्भात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ आहे, हे आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, या वर्षी राज्यात 15 जुलै पर्यंत 13 टक्के पावसाची नोंद झाली. त्या नंतर पावसाची विश्रांती, नंतर पुन्हा पावसाला सुरुवात, दोन-तीन दिवस पाऊस, पुन्हा पावसाची दडी, अशी परिस्थिती होती. पीक पोहऱ्यावर येण्याच्या वेळी, पेरणीच्या वेळी, पीक फुलावर येण्याच्या वेळी, लोंबावर येण्याच्या वेळी नेमकी पावसाने दडी मारली. जेव्हा पाऊस दडी मारतो त्यावेळी आभाळ असते, पाऊस पडत नाही आणि त्यावेळी मोठ्या प्रमाणावर पिके रोगग्रस्त होतात. धानावर करपा, तुडतुड्या, लष्कर अळी, बेरड्या रोग झाला आणि दाणे भरलेच नाहीत. सोयाबीन, मुग, उडीद या पिकांवर मोझॅक रोगाचा प्रार्दूभाव झाला आणि शेंगा भरल्याच नाहीत. सोयाबीनच्या शेंगामध्ये तर दाणेच नाहीत. आता शेतकरी अशा निष्कर्षापर्यंत पोहोचला आहे की, या पिकांमधून त्याला काहीही मिळणार नाही. सोयाबीनचे 100 टक्के पीक गेलेले आहे. कापसावर लाल्या रोग आल्यामुळे बोंडे गळून पडली. त्यामुळे याही पिकामधून समाधानकारक

..3...



SRR/ प्रथम श्री.मंगेश....... 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

उत्पन्न मिळेल, अशी परिस्थिती नाही. सर्वच पिकांवर रोगराईचा परिणाम झाल्यामुळे ती हातची गेली आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, आणेवारी 30 टक्क्यांच्याही खाली गेलेली आहे. जेव्हा अंतिम आणेवारी येईल तेव्हा यापेक्षाही आणेवारी खाली गेल्याचे आपल्या लक्षात येईल. त्यासाठी शासनाने पिकांची पहाणी करुन शेतकऱ्याला न्याय देण्याची आवश्यकता आहे, असे आमचेही मत आहे.

सभापती महोदय, धानाच्या बाबतीत 10 मीटर x 10 मीटर प्लॉटमध्ये 700 ग्रॅम धान्य निघते त्यावेळी परिस्थिती अतिशय गंभीर असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्यावेळी आपण मागील वर्षीच्या उत्पादनाचा विचार करतो त्यावेळी शासनाने धानाचे पीक उत्पादन 23 क्विंटल प्रति हेक्टर दाखविले होते. त्याचा विचार केला तर आणेवारी 30 टक्क्यांच्याही खाली गेली आहे, अशी स्थिती आहे. केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा विचार न करता त्यांच्या पुढील आयुष्याचा आणि त्या बरोबरच पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा याचाही विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पाऊस कमी पडल्यामुळे तलाव भरले नाहीत. तलावातील पाण्याची पातळी खाली गेली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीरतेने पुढे येणार आहे. भविष्यात कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत आणि पुन्हा अशा दुष्काळाला आपल्याला सामोरे जावे लागणार नाही, यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत, याचा विचार करण्याची गरज आहे. केवळ टीकाटिप्पणी करुन दुष्काळ दूर होणार नाही. आज शेतकरी हवालदिल झाला आहे. त्याच्या दुखण्यावर डागण्या देण्यापेक्षा त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला तर त्यांना खऱ्या अर्थाने मदत होईल, असे माझे स्वत:चे मत आहे.

सभापती महोदय, आज शेतकऱ्याच्या हातात जे पीक पडणार आहे, त्याचा भविष्यात बियाणे म्हणून त्याला उपयोग करता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना भविष्यात चांगल्या प्रतीची बियाणे शासनाने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सर्वच पिकांच्या बाबतीत आणेवारी काढताना जो टेबल आपण वापरतो त्यामध्ये बदल करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून या सभागृहात करण्यात येत आहे.

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस......

त्यावेळी शासनाने असे सांगितले होते की, या संदर्भात एक समिती नियुक्त केली जाईल. परंतु, अद्याप अशा प्रकारची समिती नियुक्त करण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविणे, हे आम्ही आमचे काम समजून आणेवारीच्या संदर्भात जो विचार तुम्ही केला नाही तो आम्ही करणार आहोत, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. (गोंधळ)

सभापती महोदय, केवळ मंत्री पद मिळाल्याने प्रश्न सुटत नसतात. त्यापेक्षा सर्वांनी मिळून प्रयत्न करावयाचे असतात व त्यालाच खरे काम म्हणतात, हे देखील मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आणेवारी काढताना ज्या टेबलचा उपयोग केला जातो, त्यावरुन विमा घेतला जातो. त्या टेबलमध्ये धानाच्या बाबतीत प्रत्येक वर्षी प्रत्येक उत्पन्नाची वेगवेगळी आणेवारी काढली जाते आणि पीक विमा दिला जातो. सर्वच पिकांना उंबरठा उत्पन्न दाखविले जाते. परंतु, धानाच्या बाबतीत उंबरठा उत्पन्न राहिलेले नाही. दरवर्षी हे उत्पन्न बदलत असते. त्यामुळे या आणेवारीचा फायदा शेतकऱ्याला होऊ शकत नाही. गेल्या 10 वर्षात जेवढे पीक झाले असेल त्याचे सरासरी उत्पन्न काढा, 3 वर्षात जे चांगले पीक आले असेल त्याचे सरासरी उत्पन्न काढा, त्यावर उंबरठा उत्पन्न ठरवा आणि नंतर दुष्काळ जाहीर करा, ही जी पध्दत आहे ती बदलली पाहिजे. कारण शेतकऱ्याला विम्याचा फायदा आणेवारीनुसार मिळत असतो. या पध्दतीमुळे धान उत्पादक शेतकऱ्याला फायदा मिळत नाही. त्यामुळे आणेवारीचे नवीन टेबल तयार करीत असताना त्याबाबतीत एखादी समिती नेमून या सर्व बाबींचा विचार केला तर चांगले होईल. तशा प्रकारचा विचार शासनाने करावा, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी सन 2013-2014 मध्ये राज्यपाल महोदयांचे अभिभाषण मी अतिशय कान देऊन ऐकत होते. त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की, तांदुळाच्या पिकासाठी महाराष्ट्र राज्याला ॲवॉर्ड मिळाला आहे. मी विचार केला की, गेल्या 3 वर्षात दुष्काळी परिस्थिती आहे, धान उत्पादक शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत आणि महाराष्ट्र शासनाला याच धानाबाबत ॲवॉर्ड कशाच्या बाबतीत मिळाला आहे ? त्यावेळी लक्षात आले की, सन 2011-2012 मध्ये 2700 मे.टन, सन 2012-2013 मध्ये 3000 मे.टन आणि सन

..5...







असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2013-2014 मध्ये 2878 मे.टन म्हणजे -4 टक्के पीक उत्पादन झाले तरी तांदळाबाबतचा ॲवॉर्ड आपण घेत आहोत. एकीकडे राज्यातील शेतकरी मरतो आहे. त्यावेळी असे वाटते की, महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी सुखी आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे.

या नंतर श्री.मा.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

ज्वारीचे उत्पादन देखील फक्त 37 टक्केच झालेले आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि त्यांना करावयाची मदत या गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. 2014 मध्ये जळगाव, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, नाशिक, भंडारा, चंद्रपूर या ठिकाणी शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येची साधी चौकशी देखील झालेली नाही. 1 जानेवारी 2014 ते 30 एप्रिल 2014 या कालावधीत मरावाड्यातील शेतकऱ्यांच्या 56 आत्महत्यांपैकी 39 प्रकरणे प्रलंबित आहेत. मदतीस अपात्र प्रकरणे 4 आणि मदतीस पात्र प्रकरणे फक्त 13 आहेत. बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या एकाही प्रकरणाची चौकशी झालेली नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने न्याय देण्याच्या दृष्टीने आत्मचिंतन करण्याची गरज आहे. भविष्यामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्येची अशी प्रकरणे उद्‌भवणार नाहीत यादृष्टीने आमचे सरकार उपाययोजना करील असा मला पूर्ण विश्वास आहे. भविष्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत म्हणून कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत करण्याची गरज आहे. एखादा सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा दारु पिऊन मृत्यू झाला तर त्याला पेन्शन मिळते. परंतु शेतकऱ्याने नापिकीमुळे, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली तर त्याला सहजासहजी मदत मिळत नाही. आत्महत्या करणारा शेतकरी हा केवळ बँकेच्या कर्जबाजारीपणामुळेच आत्महत्या करतो असे नाही. तो सावकाराकडूनही कर्ज घेत असतो. सावकाराचे कर्ज फेडता येत नाही म्हणूनही तो आत्महत्या करतो. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याला मदत करण्याचे जे काही निकष असतील ते शिथिल करण्याची, त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यातील सिंचन हा एक महत्वाचा विषय या आत्महत्येशी निगडित आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. मी गेली 26 वर्षे विधिमंडळामध्ये सदस्य म्हणून काम करीत आहे. जोपर्यंत शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत तो सुखी होणार नाही. गोसीखुर्द प्रकल्पाचे काम कित्येक वर्षापासून रेंगाळलेले आहे. या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. केवळ 3 गावांचे पुनर्वसन झाले नाही म्हणून या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. परिणामी शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नाही. गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्याच्या डोळयासमोरुन जाते परंतु ते त्याला सिंचनासाठी मिळत नाही. अशा

श्रीमती शोभा फडणवीस...

परिस्थितीमध्ये शेतकरी आत्महत्या करणार असेल तर ते खरोखरच दुर्दैव म्हणावे लागेल. जे प्रकल्प 90 टक्के पूर्ण झालेले आहेत अशा प्रकल्पांना तातडीने निधी उपलब्ध करुन देऊन ते पूर्ण केले पाहिजेत जेणेकरुन शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ शकेल. तीन गावांच्या पुनर्वसनासाठी पैसे दिलेले आहेत. ती गावे उठत नसतील तर त्याबाबतीत कारवाई करण्याची आवश्यकता आहे. हा केवळ तीन गावांचाच प्रश्न नाही तर लाखो शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. म्हणून या प्रकरणी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी घोडदरीत सोडले जाते. त्याच्या बाजूला मेंढयाचा कॅनॉल आहे. त्या कॅनॉलचे काम 26 जून पर्यंत पूर्ण करुन शेतकऱ्याला गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी उपलब्ध करुन द्यावे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. वैनगंगा नदीचे पाणी कमी झाले म्हणून गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी वैनगंगा नदीमध्ये सोडले तर त्या परिसरातील गावातील लोकांच्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. बोरघाट नंबर 1 उपसा सिंचनाची कामे केवळ विद्युतीकरण झाले नसल्यामुळे थांबलेले आहे. हे काम ताबडतोबीने केले तर जून 2015 पर्यंत शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ शकेल. जे प्रकल्प 75 टक्के पूर्ण झालेले आहेत अशा प्रकल्पांना तातडीने निधी उपलब्ध करुन ते प्रकल्प शंभर टक्के पूर्ण करुन शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याची गरज आहे. मोठ्या प्रकल्पाची कामे होत रहातील. अशा मोठ्या प्रकल्पांना वेळ लागतो. शेतकऱ्याला तातडीने काही सोय उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर जलसंधारण हा एक प्रभावी उपाय आहे. विदर्भामध्ये मोठ्या नद्या आहेत. या नद्या पावसाळयात दुथडी भरुन वाहतात आणि उन्हाळयात कोरड्या पडतात. याचे कारण विदर्भामध्ये नद्यांच्या पात्रामध्ये मुरुम असल्यामुळे पाणी साठून राहात नाही. या नद्यावर छोटेछोटे बंधारे बांधून पाणी अडविण्याची गरज असून हा पाणी अडविण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याची आवश्यकता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

शेतीच्या सिंचनासाठी शेततळी हा देखील एक चांगला उपाय आहे. काही वेळा शेवटच्या पाण्याअभावी पिकाचे नुकसान होते. अशा वेळी शेततळयाचा चांगला उपयोग होऊ शकतो. ही शेततळी मोठया प्रमाणावर बांधण्याची आवश्यकता आहे. या शेततळयामध्ये शेतकरी मत्स्यव्यवसाय देखील करु शकतात. 30x30x3 मीटरचे शेततळे करण्यासाठी 1 लाख रुपये अनुदान दिले जाते. त्यामध्ये 32 हजार रुपये रॉयल्टी घेतली जाते. उर्वरित 68 हजार रुपयामध्ये शेततळे होऊ शकत नाही. त्यासाठी 80 हजार रुपये लागतात. कमी पडणारे 12 हजार रुपये शेतकरी देऊ शकत नाही. म्हणून रॉयल्टी बाबत शासनाने फेरविचार करण्याची गरज आहे. शेततळी मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी अनुदानामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. शेततळयाप्रमाणे पाझर तलावांचा कार्यक्रम देखील मोठ्या प्रमाणावर राबविण्याची आवश्यकता आहे. भूगर्भातील पाण्याचा साठा आणि होणारा उपसा लक्षात घेता भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे. त्यामुळे पाणी अडवा आणि पाणी जिरवा हा कार्यक्रम देखील मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे. बांध घालून पाणी अडविणे, उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करुन देणे या गोष्टी देखील करणे आवश्यक आहे. वाहणा-या पाण्याचा वापर आणि त्याची साठवण करणे गरजेचे आहे. बंधाऱ्यावरील छोट्या उपसासिंचन योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देता येईल. शेतातील धान, गहू, ज्वारी इत्यादी पिकांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळणे गरजेचे आहे. देशातील प्रत्येक राज्याचा उत्पादन खर्च वेगवेगळा आहे. राज्यात केवळ 13 टक्के इरिगेशन होते. 87 टक्के जमीन कोरडवाहू आहे. देशपातळीवर उत्पादन खर्चाचा विचार केला तर आपल्या राज्यात उत्पादन खर्च अधिक येतो. सिंचनाखालील शेती आणि कोरडवाहू शेती यांचा रेशिओ 13:87 असा असल्यामुळे उत्पादन खर्च जास्त येतो. आपल्या राज्यातील शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे उत्पादन खर्च ठरविताना ओलिताखाली किती टक्के शेती आहे याचा विचार करावा अशा प्रकारचा ठराव करुन तसे केन्द्र शासनाला कळवावे अशी माझी शासनाला विनंती आहे. शेतकऱ्याला रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे उपलब्ध करुन देणे, त्याला आर्थिक मदत करणे हे तातडीचे उपाय झाले. परंतु आपल्याला दुष्काळावर कायमस्वरुपी मात करायची असेल तर त्यासाठी शॉर्टटर्म आणि लाँगटर्म उपाय योजले पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, मी शापित आहे की काय अशा प्रकारची भावना शेतकऱ्याच्यो मनामध्ये सतत येत असते. ही भावना दूर करण्यासाठी त्याला सिंचनाची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे, चांगल्या दर्जाचे बी-बियाणे व खते उपलब्ध करुन दिली पाहिजेत. टंचाईच्या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या वीजेचे बिल माफ करणे, त्यांच्या मुलांचे शिक्षण शुल्क माफ करणे अशा तातडीच्या उपाययोजना आपण करीत असतो. असे असले तरी भविष्यामध्ये दुष्काळाला सामोरे जाण्याची वेळच येणार नाही व दुष्काळ हा चर्चेचा विषय पुन्हा होणार नाही यादृष्टीने शासनाने शॉर्ट आणि लाँगटर्म उपाय योजावेत आणि शेतकऱ्यांमध्ये जीवन जगण्याची आशा निर्माण करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

राज्यामध्ये आणि विशेषत: मराठवाडा आणि विदर्भामध्ये अतिशय गंभीर अशी दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी बीड आणि जालना जिल्हयातील दुष्काळी परिस्थिती प्रत्यक्ष पाहून आलो. तेथील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करीत असताना दुष्काळाने जगणे असह्य झालेल्या एका शेतकऱ्याच्या मुलाने माझ्या हातामध्ये एक चार ओळीची कविता दिली आणि सांगितले की, जे सत्तेमध्ये आहेत त्यांना ही कविता वाचून दाखवा.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:10

श्री.धनंजय मुंडे......

ती कविता या ठिकाणी वाचून दाखविणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

हमी भाव नसताना विकला जातो कापूस
उचल न ठरता तोडला जातो ऊस
दूध दर तर गडगडले, कांद्याचा वांदा झाला
शेतकऱ्यांचा पुळका आणणारे आता कुठे लपले आहेत?
पोशिंदा साऱ्या जगाचा तरी उपाशी आहे राजा
अरे, कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या तरुण मुलांनी या सरकारच्या प्रतिनिधींना मतदान केले आहे. दूरदर्शन आणि वर्तमानपत्रातील जाहिरातींना भुलून यांना मतदान केले आणि एका महिन्यात सरकारला ही कविता अर्पण केली आहे.

सभापती महोदय, दुष्काळ हा महाराष्ट्राला नवीन नाही. कधी मराठवाड्यात तर कधी विदर्भात भीषण दुष्काळ पडतो. आज मराठवाड्यात महाभीषण आणि विदर्भात महाभयंकर दुष्काळ पडला आहे. अशा परिस्थितीत मराठवाड्याचे नामांतर 'दुष्काळवाडा' करावे काय अशी स्थिती आलेली आहे. ही दुष्काळाची आपत्ती मराठवाड्याच्या पाचवीला पुजली गेली आहे. अतिशय भयानक अवस्था निर्माण झालेली आहे. मी ज्या भागात लहानाचा मोठा झालो त्या परळी आणि आंबेजोगाई तालुक्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय कधी उत्पन्न झालेला नव्हता. आज परळी आणि आंबेजोगाई तालुक्यात सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून कालपर्यंत 15 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. एका-एका शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या घटनेचे वर्णन सांगितले तर या सभागृहात बसलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आल्याशिवाय राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना आत्महत्या का करावी लागते? आंबेजोगाई तालुक्यातील जोडवाडी गावातील इंगळे नावाच्या शेतकऱ्याने लातूर येथे हमाली करुन आपल्या 35 वर्षाच्या तरुण मुलाला शेती करण्यासाठी 1 एकर जमीन खरेदी करुन दिली. या तरुण मुलाला 3 मुली आहेत. पाऊस पडल्यानंतर त्याने सोयाबीनची पेरणी केली. पावसाने दगा दिला म्हणून त्याने दुबार पेरणी

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

केली आणि पेरणी केलेल्या रानात जाऊन बसला. त्याच्या लक्षात आले की, दुबार पेरणी केलेले पीक सुध्दा जळून गेले आहे. त्याच वेळी त्याने रानातील लिंबाच्या झाडावर गळफास लावून स्वत:चे जीवन संपविले. अशी अवस्था त्याच्यावर का आली? कदाचित आपण असे म्हणू शकतो की, त्याला निसर्गाने दगा दिला. परंतु ज्या काळात निवडणुकीच्या निकालानंतर सत्ता बदल होत होता, सर्वाधिक जागा मिळविलेला भारतीय जनता पक्ष सत्तेत येत होता आणि त्याच काळात तू तू मैं मैं शिवसेना पक्षाशी सुरु असताना शिवसेना पक्ष सुध्दा सरकारमध्ये सामील होत होता अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी किंवा सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आधार देणारे स्टेटमेंट केले असते तर त्यांना दिलासा मिळाला असता. तुम्ही घाबरु नका, आपले जीवन संपविण्याची गरज नाही, सरकार तुमच्या पाठीशी आहे एवढे म्हटले असते तर कदाचित त्या 35 वर्षाच्या इंगळे नावाच्या तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली नसती. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

सभापती महोदय, नांदेड येथे मडेवाड नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्याने विजेचा प्रवाह सुरु असलेली तार पायाला बांधून स्वीच ऑन करुन आपले स्वत:चे जीवन स्वीच ऑफ केले. यासारखी दुसरी दुर्दैवी घटना असू शकत नाही. विदर्भात एक शेतकरी स्वत:च स्वत:ची चिता रचतो आणि कोणालाही अडचण येऊ नये, कोणावर प्रेताला खांदा देण्याची वेळ येऊ नये म्हणून स्वत:च त्या चितेवर झोपतो आणि आपले आयुष्य संपवितो ही घटना कशाचे द्योतक आहे? आज महाराष्ट्रातील शेतकरी मानसिकदृष्ट्या खचला गेला आहे याबाबत सरकार काही करणार आहे की नाही हा या चर्चेच्या निमित्ताने आपल्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, पाऊस पडला नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी जे पिकविले ते विकले गेले नाही ही गोष्ट खरी आहे. शेतीतून उत्पादन आले नाही तर विकण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. परंतु पावसाअभावी कापूस पेरणी केलेल्या शेतामध्ये एका-एका रोपाला केवळ चार ते पाच बोंडे आली आहेत. एक पिशवी बियाणे खरेदी करुन पेरणी केली तर 40 किलो कापसाचे उत्पादन येत असेल तर त्याने कर्जाची परतफेड कशी करायची? पेरणी करावयाची म्हटल्यास हेक्टरी 20 ते 25 हजार रुपये खर्च येतो. एकरी 5 पिशव्या बियाणे लागवड करायची आणि 2 क्विंटल उत्पादन येणार असेल तर क्विंटलला 3800 रुपये दर म्हटल्यानंतर 7600 रुपये उत्पन्न हाती मिळणार आहे. अशा

...3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:10

श्री.धनंजय मुंडे......

परिस्थितीत शेतकऱ्याने मरायचे नाही तर काय करायचे? आज हमी भावापेक्षा कमी दराने व्यापारी कापूस खरेदी करीत आहेत. मध्यंतरी सरकारकडून स्टेटमेंट करण्यात आले की, आम्ही कापसाला बोनस देऊ. शेतकरी वेचणी केलेला 30 ते 40 किलो कापूस घरी न ठेवता व्यापाऱ्याला विकतो. गावात खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याला तो कापूस विकला जातो. व्यापारी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला कापूस सरकारी कापूस खरेदी केंद्रावर किंवा नाफेडच्या कापूस खरेदी केंद्रावर विकतो. अशा परिस्थितीत सरकार बोनस कोणाला देणार आहे? कापूस व्यापाऱ्याच्या नावाने खरेदी केला जाणार आहे, त्यामुळे बोनसचा फायदा त्या व्यापाऱ्याला मिळणार आहे. दुष्काळाबाबत सरकार खरोखरच गंभीर असेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत गंभीर असेल तर मोठ्या मनाने सरसकट राज्यातील सर्व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. कापूस पिकाची लागवड केली की नाही हे पाहण्यासाठी 7/12 उपलब्ध आहे. धनंजय मुंडेनी या वर्षी कापूस पेरणी केली असेल तर कापसाकरिता शासन जे काही आर्थिक अनुदान देणार असेल ते अनुदान मला मिळेल. या दृष्टीने सरकारने धोरण आखले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबेल.

सभापती महोदय, सोयाबीन पिकाबाबत हीच अडचण आहे. सोयाबीनच्या हमी भावात आज केंद्र सरकारने 50 ते 100 रुपये वाढ केली. परंतु हमीभावाचा विचार केला तर आज सोयाबीनचे दर उतरले आहेत. सूर्यफूलाची हीच अवस्था आहे. मग शेतकऱ्यांनी काय करायचे याचा विचार करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ......

सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी फिरत असताना मला असेही बुजुर्ग लोकांकडून ऐकायला मिळाले की, सन 1972 च्या दुष्काळापेक्षाही अधिक गंभीर परिस्थिती येत्या 6 महिन्यात आपल्या राज्यात विशेषत: मराठवाड्यात निर्माण होणार आहे. हे वाक्य एका म्हाताऱ्या व्यक्तीने ज्याने 1972 चाही दुष्काळ अनुभवलेला आहे अशा वृध्द माणसाने मला सांगितले. त्यावेळेस माझ्या जन्मही झालेला नव्हता. कोणी म्हणत असतील हा दुष्काळ पाण्याचा नाही पण पाण्याची देखील अतिशय भयंकर परिस्थिती यावर्षी निर्माण होणार आहे व याचाही शासन स्तरावर विचार झाला पाहिजे. त्याचे मुख्य कारण म्हणजे येत्या जून-जुलै महिन्यापर्यंत पाऊस पडणारच नाही, अशा परिस्थितीत आतापासूनच हा विचार होणे आवश्यक आहे. आज मराठवाड्यातील धरणांची पाण्याची पातळी पाहिली तर काही ठिकाणी ती 12, 13 व 17 टक्क्यापर्यंत आलेली आहे. लहान 32 धरणांमध्ये आज केवळ 11 टक्के पाणीसाठा आहे. तर मोठ्या धरणांमध्ये 37 टक्के आणि मध्यम 75 प्रकल्पांमध्ये 28 टक्के इतकेच पाणी आहे. लघु प्रकल्पांमध्ये केवळ 22 टक्के पाणी शिल्लक आहे. जायकवाडी प्रकल्पात 30 टक्के, येलदरी प्रकल्पात 47 टक्के, सिध्देश्वर प्रकल्पामध्ये 43 टक्के पाणी असून माजलगांव आणि मांजरा प्रकल्पांनी तर तळ गाठला आहे. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अशी परिस्थिती आहे तर पुढे काय होणार याची चिंता शेतकऱ्याला आहे. ज्या शेतकऱ्यांनी वैयक्तिक बोअर्स घेतल्या.......अडथळा.......

श्री. भाई जगताप : महोदय, सभागृहात एवढी गंभीर चर्चा सुरु असताना संबंधित विषयाचे मंत्री महोदय किंवा राज्यमंत्री महोदय सुध्दा सभागृहात उपस्थित नाहीत. सभागृहात केवळ माननीय परिवहन मंत्री आणि माननीय आरोग्य मंत्रीच उपस्थित आहेत. याचा अर्थ दुष्काळाच्या प्रश्नावर हे सरकार अजिबात गंभीर नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, शासनाच्या वतीने इतर मंत्री सभागृहात बसलेले असल्याने आपण एवढा गहजब करणे उचित होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी चर्चा सुरु ठेवावी.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मा. महसूल मंत्री महोदयांना सभागृहात बोलावून घ्यावे आणि अशा महत्वाच्या विषयाच्या बाबतीत शासन गंभीर नसेल तर तोपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय योग्य आहे. माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते आपण अशा महत्वाच्या विषयांच्या बाबतीत नेहमीच संवेदनशील असतात याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही पण सन्माननीय सदस्य जे मुद्दे मांडत आहेत त्याबाबत आपण एक ओळ सुध्दा लिहून घेतलेली नाही. वास्तविक सभागृहात जे जे मुद्दे उपस्थित केले जातात त्या सर्व मुद्यांचा परामर्ष मंत्री महोदयांच्या उत्तरातून घेतला गेला पाहिजे व त्यासाठी संबंधित विषयाचे मंत्री महोदयच उपस्थित असले पाहिजेत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

**उप सभापती** : मी पीठासीन अधिकारी म्हणून उभा आहे, कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन सभागृहात शांतता प्रस्थापित करावी. सन्माननीय सदस्यांचे भाषण अत्यंत संवेदनशील व चांगले होत असून त्याला मंत्री महोदय उत्तर देतीलच म्हणून त्यांच्या भाषणात आपण व्यत्यय निर्माण करु नये. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री. धनंजय मुंडे : महोदय, या विषयावर सरकार किती गंभीर आहे याची आपणासही जाणीव आहेच. मराठवाड्यातील धरणांच्या साठ्यांची माहिती मी दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी त्यांच्या भाषणातून ज्या ज्या मुद्यांचा उल्लेख केला तसेच जे गंभीर विषय ते मांडत आहेत त्यांना मी प्रतिसाद देत आहे. त्यांनी धरणातील पाण्याच्या साठ्याची वस्तुस्थिती सांगितली ते आकडे देखील मला तोंडपाठ आहेत व मी कापसाच्या संदर्भात पत्रव्यवहार सुध्दा केलेला आहे. तसच मा. महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे-पाटील हे मला सांगून गेले की, मी ताबडतोब येतो. मला देखील आपल्याइतकेच गांभीर्य असल्याने मी सभागृहात बसलेलो आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून केलेल्या सूचना अत्यंत महत्वाच्या आहेत व त्यांना मी दाद देत असून आपणही त्यांच्या वेदना ऐकून दाद द्यावी अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, ज्या प्रशासनाच्या माध्यमातून आपण अशा प्रसंगी उपाययोजना करणार आहात, हे प्रश्न सोडविणार आहात त्यासाठी विभागाचे अपर मुख्य सचिव देखील येथे उपस्थित असणे आवश्यक होते. आपण ज्या शेतकऱ्यांच्या बाबतीत या बाजूला असताना बोलत होता तीच निष्ठा आता देखील दाखवावी. आपण अशा प्रकारच्या प्रश्नांवर अनेक वेळा सभागृह देखील बंद पाडलेले आहे, तीच निष्ठा दाखवून आता सभागृह बंद पाडावे तेव्हाच खरी शिवसेनेप्रती आपली निष्ठा दिसून येईल, अशी माझी सूचना आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपल्या कारकिर्दीत ज्या प्रकारे राज्यातील शेतकऱ्यांला बुडविले आहे तेच आणि तुमच्याच पापाचे धडे आता तुम्हाला वाचण्याची वेळ आली आहे आणि आपणही ते कान देऊन ऐकत आहात. आपण माझ्या कर्तृत्वावर येण्यापेक्षा आपण माननीय सभापतींना उपाययोजना करण्याच्या बाबतीत सांगावे, त्या उपाययोजना शासनाकडून करण्यात येतील.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी सूचना केल्याप्रमाणे मी महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांना लॉबीत बोलाविण्याचे निदेश दिलेले आहेत. आपण कृपया सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचे सातत्य बिघडवू नये, अशी मी विनंती करतो.

श्री. सुनील तटकरे : महोदय, मी मान्य करतो पण त्याचबरोबर शासनाच्या वतीने मंत्री महोदय श्री. दिवाकर रावते यांनी दिलगिरी व्यक्त करावी, कारण ही संवेदना असून ते संवेदनशील आहेत हे सभागृहाला कळेल.

नंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या प्रस्तावावर अत्यंत गांभीर्यपणाने चर्चा सुरू आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिकाऱ्यांची गॅलरी अदृश्य असते. त्यामुळे आपण कृपा करून चुकीचा पायंडा पाडू नका. गॅलरीमध्ये अधिकारी असण्या-नसण्यावर सभागृहाचे कामकाज चालत नाही. सभागृहाला माननीय मंत्री जबाबदार असतात. त्याची जबाबदारी मी घेतलेली आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : माझे कोणीच म्हणणे ऐकून घेत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे असे चालत नाही. अधिकाऱ्यांची गॅलरी अदृश्य आहे. सभागृहाचे कामकाज अधिकाऱ्यांवर नव्हे तर माननीय मंत्र्यावर अवलंबून असते. सभागृहाचे कामकाज प्रशासनावर नव्हे तर सरकारवर अवलंबून असते. तेव्हा कृपा करून आपण चुकीचा पायंडा पाडू नका.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : त्यांना बोलावण्यासाठी कोणाला तरी पाठविण्यात यावे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी सभागहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 32 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

.....

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील (महसूल मंत्री) : उप सभापती महोदय, या ठिकाणी मी आपला आदर ठेवून बोलू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज कोणत्या कारणामुळे बंद झाले, सभागृहाचे कामकाज आपण कोणत्या कारणासाठी बंद केले, याबाबत मी काही बोलणार नाही. या सभागृहात गोंधळ झाला त्यावेळी सभागृहात 3-3 मंत्री उपस्थित होते. सभागृहात मंत्री नाही म्हणून सभागृहाचे कामकाज बंद पडले तर मी समजू शकतो. परंतु गॅलरित अधिकारी नाहीत, या कारणासाठी सभागृहाचे कामकाज बंद पाडणे, हे बरोबर नाही. या ठिकाणी कोणते अधिकारी बसले आहेत, याच्याशी आमचा काही संबंध नाही. कारण ते अदृश्य असतात. अधिकारी नाही म्हणून सभागृहाचे कामकाज बंद पाडले गेले असेल तर ते बरोबर नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचे भाषण अतिशय प्रभावीपणे सुरु आहे. आमच्या समोर जी कागदपत्रे आली आहेत, त्यानुसार सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे भाषणाला सुरुवात करणार होते. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.तटकरे साहेबांना डावलून सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरुवात केली. माननीय श्री.ठाकरे यांचे भाषण झाल्यानंतर ते ताबडतोब सभागृहाच्या बाहेर गेले. भाषण संपल्यानंतर लगेच सभागृहाच्या बाहेर जाणे हे औचित्याला धरुन आहे का ? सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांसाठी आपण तहकूब केले, याचे आम्हाला आश्चर्य वाटले. सभागृहाचे कामकाज कशासाठी बंद पाडण्यात आले, याचे कारण समजून घेण्याचा मला अधिकार आहे की नाही ? अधिकारी नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले, असे रेकॉर्डवर आलेले आहे. या विषयाच्या संदर्भात सर्व चॅनेलवर "सभागृहाचे कामकाज अधिकारी नसल्यामुळे बंद पडले" अशी बातमी येत आहे. त्यामुळे या संदर्भात आपण आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सभागृहात अधिकारी नाहीत, असा उल्लेख विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केला होता. आताचे विरोधी पक्षाचे सदस्य ज्यावेळी सत्तेमध्ये होते तेव्हा बऱ्याच वेळा सभागृहात मंत्री नसायचे, हे उप सभापती म्हणून अनेक वेळा पाहिले आहे. मी आपल्याला सांगू



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती.........**

इच्छितो की, सभागृहात अधिकारी नाहीत म्हणून सभागृह स्थगित करण्यात आलेले नाही. अप्पर मुख्य सचिवांच्या दर्जाचा अधिकारी गॅलरीत उपस्थित असावयास हवा होता, असे त्यांचे म्हणणे होते. हा प्रकार सुरु असताना माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी अधिकाऱ्यांना बोलावण्यासाठी निरोप पाठविला. अधिकारी नाही या कारणासाठी शासनाने दिलगिरी व्यक्त करावी, असा उल्लेख या ठिकाणी झाला होता. या विषयाच्या संदर्भात दिलगिरी व्यक्त करण्यास मी सांगितले नव्हते. तसेच दिलगिरी व्यक्त करणास मंत्री महोदय श्री.रावते साहेबांनी सुध्दा नकार दिला होता. खरे म्हणजे कारण नसतांना गदारोळ वाढला होता. भाषण सुरु करण्याच्या संदर्भात मी दोन वेळा सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना सांगितले होते. त्यानंतर आवाज अजून वाढत गेला. आवाज शांत व्हावा, सभागृहाचे कामकाज सुरळीत सुरु व्हावे यासाठी मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे थांबवले. अधिकारी नव्हते म्हणून सभागृह बंद पडले नाही. कारण अधिकाऱ्यांना पाचारण करण्याची तत्परता मंत्री महोदय श्री.रावते यांनी दाखवली होती. अधिकारी आले नाही म्हणून सभागृह तहकूब केलेले नाही. सभागृहात नियमाप्रमाणे कामकाज केले जात असते. काही बाबतीत सदस्यांच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या असतील तर त्यावेळी आपण थोडी फ्लेकजिबिलिटी दाखवित असतो. परंतु अधिकारी नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले, असा आपला समज झाला असेल तर तो समज आपण काढून टाकावा. माझे म्हणणे असे आहे की, एखादे सदस्य तन्मयपणे भाषण करीत असतील आणि सभागृह शांतपणे त्यांचे भाषण ऐकत असेल तर बारीक सारीक गोष्टीचे कारण नसताना भांडवल करुन चांगल्या चर्चेत कृपया कोणीही व्यत्यय आणू नये, अशी मी आपल्याला विनम्रपणे प्रार्थना करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आमच्या निदर्शनास जी बाब नम्रपणे आणली त्याचा मी आदर करतो. या सभागृहात आम्ही आतापर्यंत एवढे बघितले आहे की, सत्तारुढ पक्षाच्या मंत्र्यांना बोलूच द्यायचे नसेल तर गोंधळ निर्माण केला जातो किंवा एखादा प्रश्न सुटत नसेल तर सभागृहात गोंधळ निर्माण होत असतो. परंतु आपल्याच सदस्याचे भाषण बंद करण्यासाठी गोंधळ झाला, असे आपण आता जे काही सांगितले, ते बरोबर नाही. या सदनात गंभीर चर्चा सुरु असताना विरोधी पक्षामध्ये एकमेकांना भाषण करु देण्याच्या संदर्भात जे काही झाले

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

ते अत्यंत खेदजनक आहे तसेच शेतकऱ्यांचा अवमान करणारेही आहे. मी आपल्याला हात जोडून विनंती करतो की, हा विषय अत्यंत गंभीर आहे. हा विषय तुमचा आहे की, माझा आहे याच्या खोलात जाण्याची आवश्यकता नाही. आपलीच भाषणे बंद पाडण्याचा प्रयत्न करु नका, एवढी विनंती मी करतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी अधिकाऱ्यांचा विषय नंतर उपस्थित झाला होता. सभागृहात त्यावेळी माननीय पर्यावरण मंत्री व आरोग्य मंत्री उपस्थित होते. माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेबांच्या प्रकृतीबद्दल आम्हा सर्वांना कल्पना आहे. त्यावेळेस मी म्हणालो की, या विभागाच्या राज्यमंत्र्यांना बोलवा आणि त्यांना चर्चेच्या नोंदी घेऊ द्या. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे या ठिकाणी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत असून ते पहिल्यापेक्षा अधिक तन्मयतेने भाषण करतील. परंतु या ठिकाणी सभापती महोदयांकडे ज्येष्ठ मंत्र्यांनी ज्या पध्दतीने अंगुलीनिर्देश केला किंवा ज्या पध्दतीने ते बोलले, त्या संदर्भात या सभागृहात चर्चा होणार आहे की नाही ? ज्यावेळी हा प्रकार सुरु होता त्यावेळी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी ज्या पध्दतीने अंगुलीनिर्देश करुन वक्तव्ये केली, ती योग्य नव्हती. हा डेकोरमचा विषय आहे.

यानंतर श्री.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:50

श्री.भाई जगताप...

पीठासीन अधिकाऱ्यांचा सन्मान राखला पाहिजे असे आपणच विरोधी पक्षाच्या बाकावर बसत होता त्यावेळी आम्हाला सांगत होता. आता आम्हाला आपल्याकडून तशी अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय यावा हा विषय नाही. सभागृहातील चर्चेचे गांभीर्य सरकार कमी करते काय हा माझा प्रश्न होता म्हणून ते बोलण्यासाठी मी उभा राहिलो होतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात हा विषय सुरु होता तेव्हा मी माझ्या दालनात होतो. त्यावेळी मी चॅनेलवर बातमी पाहिली की, "विधानपरिषद सभागृहात अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सभागृह तहकूब", ती बातमी पाहून मी धावत सभागृहात आलो. येथे आल्यावर मी आपणास सभापतीस्थानी पाहिले. तेव्हा असे काही होऊ शकणार नाही याची मला खात्री झाली. कारण मी आपणास इतके वर्षे काम करताना पाहिलेले आहे. कधी कधी खालच्या सभागृहातील सदस्य वरच्या सभागृहात येतात. त्यांना वरच्या सभागृहाच्या नियमांची माहिती नसते. उद्या ते असे म्हणतील की, गॅलरीमध्ये पत्रकार नाहीत तेव्हा सभागृह तहकूब करा, असे काहीही होऊ शकते. परंतु आपण योग्य निर्णय घेतला. काही वेळा चुकून होते. तेव्हा आपण स्पष्ट केले पाहिजे की, या या कारणाकरिता सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. अधिकाऱ्यांची गॅलरी, पत्रकार गॅलरी हे सर्व अदृश्य आहे. या ठिकाणी शिवसेना पक्षाचे मंत्री तसेच अन्य मंत्री उपस्थित होते. असे असताना गॅलरीमध्ये अधिकारी नाहीत म्हणून सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले असा मॅसेज बाहेर जाऊ नये असे मला वाटते. अशाप्रकारे कामकाज थांबविता येते असे ज्यांना वाटते त्यांना आपण खाजगीत बोलावून सांगावे. या वरिष्ठ सभागृहात असे काही चुकीचे होऊ नये असे मला वाटते. तेव्हा आपण या संदर्भात योग्य समज द्यावी असे मी म्हणणार नाही, परंतु योग्य स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी झालेल्या प्रकरणाची आपण सविस्तर माहिती दिलेली आहे. ज्येष्ठ मंत्री श्री.विनोद तावडे साहेब हे झाला प्रकार पाहून धावत धावत येथे आले. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब हे सांगून सभागृहात निघून गेले हे मी स्वत: पाहिले आहे. त्याबद्दल कोणीही हरकत घेतलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे हे अतिशय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

गांभीर्यपूर्वक भाषण करीत होते. माननीय मंत्री श्री.एकनाथ खडसे साहेब सभागृहात नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी काय भाषण केले हे त्यांना कळणार नाही म्हणून त्यांच्या सहकारी मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणांतील मुद्यांची नोंद घ्यायची असते अशी प्रथा आहे. परंतु त्यांचे सहकारी मंत्री काहीही नोंद करीत नव्हते हे त्यांनी कबूल केलेले आहे. आपण सर्व प्रथा गुंडाळून ठेवायचे ठरविले असेल तर त्याला आम्ही काही करु शकणार नाही. आपण बोलल्यानंतर आम्ही काही बोललो नाही. अधिकारी हे अदृश्य असतात याची जाणीव आम्हाला देखील आहे. आम्ही खालच्या सभागृहातून वरच्या सभागृहात आलो आहोत. पण वरच्या सभागृहातील काही सदस्य नुकतेच खालच्या सभागृहात निवडून गेले आहेत आणि त्यांना तेथील नियम कळण्यास वेळ लागणार आहे, एवढेच मला सांगायचे आहे. आम्ही देखील खालच्या सभागृहात 20 वर्षे काम केलेले आहे. त्यामुळे तेथील नियमांची आम्हाला चांगली जाण आहे. आपण सांगितले की, अधिकारी अदृश्य असतात. आपण हे वाक्य मागील 25 वर्षात बोलला नाहीत. (अडथळा).. आपण हा विषय सोडून देऊ. आपण उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांबद्दल उद्‌गार काढलेले आहेत. श्री.विनोद तावडे आपण उद्‌गार काढले नसतील. आपण तो विषय सोडून देऊ या. अधिकारी हे अदृश्य असतात असे आपण समजून यापुढे काम करु या. आमची हरकत असण्याचे काही कारण नाही. सरकार चालवित असताना काय काय होते याचे आपणाकडून आम्हाला मौलिक मार्गदर्शन मिळावे एवढीच आपणाकडून एचआरडी मंत्री म्हणून अपेक्षा आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मराठवाड्यातील पाण्याच्या पातळीबाबत मी बोलत होतो. आज मराठवाड्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी साडेतीन मीटरने खाली गेली आहे. विदर्भात देखील तशीच परिस्थती असेल. मी मराठवाड्यातील पाण्याची पातळी जवळून पाहिली आहे. मी याठिकाणी साठवण तलाव तसेच मोठ्या प्रकल्पांतील पाण्याच्या पातळीबाबत माहिती दिली. मराठवाड्यामध्ये भूगर्भातील पाण्याची पातळी डिसेंबर महिन्यातच दोन ते तीन मीटरने खाली गेली असेल तर जून महिन्यामध्ये काय परिस्थिती निर्माण होईल याचा सरकारने आताच विचार करणे आवश्यक आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी राज्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई होऊ देणार नाही,यंदा पाण्याचा दुष्काळ नाही असे कुठेतरी म्हटल्याचे माझ्या वाचनात आले होते. परंतु ग्रामीण भागामध्ये डिसेंबर महिन्यात पिण्याच्या पाण्याची अडचण होत असेल तर त्याबाबत आताच विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यामध्ये डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात दोन हजार टँकर चालू असतील तर जानेवारी ते जून पर्यत काय परिस्थिती असेल याचा आपण विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यामध्ये जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पाऊस पडतो. तेव्हा सरकारने या विषयावर संवेदशनशीलपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा उद्या पाणी नाही म्हणून शेतकरी मरतील अशी परिस्थिती मराठवाड्यात निर्माण होईल.

सभापती महोदय, पिण्याच्या बाबतीत जी परिस्थिती आहे तशीच परिस्थिती जनावरांच्या चाऱ्याच्या बाबतीत आहे. पिण्याच्या पाण्याप्रमाणे चाऱ्याची देखील भीषण टंचाई आहे. मराठवाड्यामध्ये 51 लाख जनावरे आहेत. या जनावरांसाठी दर महिन्याला साडेअकरा लाख मेट्रीक टन चारा लागतो आणि आज फक्त 15 दिवस चारा पुरेल अशी परिस्थती आहे. हे शासन खरेच संवेदनशील असेल तर या सरकारला जानेवारी महिन्यापासून 51 लाख जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे. सरकारने अशी तरतूद केली तरच मराठवाड्यातील जनावरे जगतील, अन्यथा ती जनावरे शेतकऱ्यांना विकावी लागतील. शेतकऱ्याकडे चार-पाच जनावरे असतील तर त्यातील दोन जनावरे त्यांनी आज विकायला काढली आहेत. कारण आज शेतकऱ्याकडे जनावराला घालण्यासाठी चारा नाही.

सभापती महोदय, जायकवाडी धरण हे मराठवाड्यातील जीवनधारा आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयानुसार जायकवाडी धरणात वरच्या धरणातून 22 टीएमसी पाणी सोडणे आवश्यक आहे. तेवढे पाणी मराठवाड्याला मिळाले तर आम्हाला दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, राज्यात सत्ता बदल झाला. विरोधात बसणारी मंडळी सत्तेमध्ये आली आणि मागील पाच वर्षात सत्ताधारी बाकावर बसलेले माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, महसूल

..4..



AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

मंत्री, विरोधी बाकावर आले. आता मुख्यमंत्री असलेले, महसूल मंत्री असलेले इतर मंत्रीगण असलेल्यांची मागील पाच वर्षातील त्यांची दुष्काळावरची भाषणे आम्ही ऐकली आहेत. आपण मोटार सायकवरुन दुष्काळी भागाचा केलेला दौरा देखील आम्ही पाहिला आहे. एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. चॅनेलवर दाखविण्यात आली आणि त्यावेळी सभागृह सुरु असेल तर आताचे मुख्यमंत्री असलेले श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याकडून या सरकारवर कलम 302 अंतर्गत गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी होत होती. या आत्महत्येस सरकार जबाबदार आहे असे सांगितले जात होते. आज मराठवाड्यात दिवसाला 15 शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. काल सायंकाळपर्यंत 5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. आजच्या देशोन्नती वर्तमानपत्रामध्ये मराठवाड्यामध्ये 7 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बातमी आहे. एकीकडे आपण 15 डिसेंबरला आणेवारी जाहीर करण्याची वाट पाहत आहोत. दुष्काळ घोषित करण्याची वाट पाहात आहोत. तर दुसरीकडे शेतकरी आपले जीवन पटापट संपवित आहेत. सरकारला आपल्या पाठिशी काही पुण्य उभे करायचे असेल तर या चर्चेच्या अंती सरकारला निर्णय घ्यावा लागेल. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानी संदर्भात शासनाला घोषणा करावी लागेल. शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या बाबतीत शासनाला निर्णय घ्यावा लागेल. सरकारला काय अडचण आहे, त्यांनी शेतकऱ्यांची कर्जे माफ करावीत आणि तशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 14:00

श्री.धनंजय मुंडे....

या ठिकाणी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे बसलेले आहेत. वीज बिलाच्या बाबतीत आपण मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांची बैठक घेतली. बीड जिल्ह्याच्या बैठकीला मी सुध्दा उपस्थित होतो. बीड येथील बैठक आटोपून आपण उस्मानाबाद जिल्ह्यात गेला. त्या ठिकाणी सुध्दा बैठक घेऊन दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे कोणतेही वीज कनेक्शन तोडू नये अशा प्रकारचे आदेश आपण त्या बैठकीत दिले. आपण अशा प्रकारचे आदेश दिल्यानंतर आणि उस्मानाबाद जिल्हा सोडल्यानंतर उस्मानाबाद तालुक्यातील वाशी गावासह चार गावांतील वीज कनेक्शन तोडण्यात आले. मी जे बोलत आहे ते जबाबदारीने बोलत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील माणसांनी कोणाकडे पहावे ? आज गावांमध्ये पिण्यासाठी पाणी नाही. कारण अनेक भागातील वीज कनेक्शन तोडण्यात आले आहेत. मुळात अशा परिस्थितीत सरकारला संवेदनशील राहावे लागेल. या ठिकाणी आपली संवेदनशीलता कमी पडली तर पुन्हा "कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा" अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यात मागच्या 11 महिन्यांत 125 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी मी केवळ एकाच आत्महत्येबाबत सांगणार आहे. त्या व्यक्तीने केलेल्या आत्महत्येमुळे मी स्वत: दोन दिवस झोपू शकलो नाही. महोदय, बरदापूर गावात सूर्यवंशी नावाचे कुटुंब राहत होते. सिध्देश्वर सूर्यवंशी यांच्या वडिलांना चार वर्षांपूर्वी पॅरालॅसीसचा ॲटॅक आला होता. त्यांचे घर केवळ एका खोलीचे होते. तसेच त्यांच्याकडे केवळ दीड एकर शेती होती. तीन वर्षांपूर्वी सिध्देश्वरच्या लहान भावाचा अपघातात मृत्यू झाला. लहान भावाची एक मुलगी आणि स्वत:च्या चार मुली होत्या. वडिलांच्या पॅरालॅसीसवरील औषधांचा खर्च दिवसाला 150 रुपये होता. सिध्देश्वर सूर्यवंशीला दुष्काळी परिस्थितीत घरचा गाढा सांभाळताना लक्षात आले की, या वर्षी आपल्या शेतात काहीच पिकू शकणार नाही. शेतीसाठी जे कर्ज घेतले ते सुध्दा फेडू शकत नाही. सभापती महोदय, वडील पॅरालॅसीसमुळे खाटेवर असताना, भावाचा तीन वर्षांपूर्वी मृत्यू झालेला असताना, कुटुंबाची जबाबदारी सर्वस्वी एकट्यावर असताना सिध्देश्वरने स्वत:चे जीवन संपविले. वडिलांना पॅरालॅसीस झाल्यामुळे त्यांना आपल्या मुलाच्या चितेला अग्नी देण्यासाठी सुध्दा जाता आले नाही. महोदय, या निमित्ताने मी विचारतो की, शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ का येते ? याला कोण जबाबदार आहे हे मी सांगत नाही. या सर्व बाबींना एक महिन्यापूर्वी सत्तेवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

आलेले सरकार जबाबदार आहे असे मी म्हणत नाही. परंतु या निमित्ताने एक गोष्ट सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना मदत करण्याच्या अनुषंगाने सरकारने काही घोषणा केल्या तरच या आत्महत्या थांबू शकतील. शासनाने सकारात्मक घोषणा केल्या तर त्यांच्यात विश्वास निर्माण होईल की, सरकार आमच्यासाठी काही तरी प्रयत्न करीत आहे. महोदय, यापूर्वी या राज्यावर अनेक संकटे आली. कधी गारपीट झाली तर कधी अतिवृष्टी झाली. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान सुध्दा मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली होती. त्यावेळी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांसोबत आम्ही चार दिवस होतो. गारपीट सुरु असताना आमचा दौरा सुरु होता. राजकीय दौरा संपल्यानंतर आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी स्वत: गारपीटग्रस्त भागाची पाहणी केली. एका गावात एका दिवसात 10 कि.मी. अंतर स्वत: फिरले आणि दुसऱ्या दिवशी केंद्र सरकारची टीम बोलवून घेतली. 15 दिवसांत गारपिटीमुळे नुकसान झालेल्या लोकांना नुकसानीचे पैसे मिळाले. ही संवेदना आम्ही त्या काळात पाहिली आहे.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विभागनिहाय बैठका घेतल्या. त्या बैठकीला मी सुध्दा उपस्थित होतो. त्या बैठकीत सर्व विषयांवर चर्चा झाली. मराठवाड्यातील सर्व आमदारांनी आपापल्या व्यथा मांडल्या. या परिस्थितीत काय कार्यवाही करावी या बाबत सुध्दा सूचना केल्या. आमदार महोदयांनी विषय मांडल्यानंतर बैठकीच्या शेवटी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हा सर्व विषय मला समजला आहे. आम्ही या सर्व परिस्थितीचा विचार करीत आहोत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून मदत मिळवून देण्याच्या बाबतीत जे काही करतील ते माननीय पंतप्रधान करतील. महोदय, या निमित्ताने विचारतो की, मग आपण आढावा बैठक कशासाठी घेतली ? माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने वक्तव्य केले असते तर, त्या बैठकीनंतर झालेल्या आत्महत्या थांबू शकल्या असत्या. सभापती महोदय, सत्ताधारी मंडळींची निवडणुकीपूर्वी जी संवेदना होती ती आता राहिली नाही हे जाणीवूपर्वक नमूद करावेसे वाटते.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांकडे 2 हजार शेतकऱ्यांनी निवेदन देऊन सामूहिक आत्मदहन करण्यासाठी परवानगी मागितली आहे. असे चित्र राज्यात असेल तर माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब, आपण काही तरी भूमिका घेतली पाहिजे. दोन-दोन हजार शेतकरी आत्मदहन

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

करण्यासाठी परवानगी मागत असतील तर ते योग्य नाही. सरकार आमच्यासाठी काही करीत नाही म्हणून आम्हाला आत्महत्या करु द्या, अशी ते निवेदनाद्वारे मागणी करीत आहेत. राज्य सरकारने या प्रश्नी संवेदना दाखवून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविल्या तर काही तरी पुण्य त्यांना मिळेल.

सभापती महोदय, कापूस, ऊस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांची सुध्दा तीच अवस्था आहे. राज्यातील दूध उत्पादक शेतकरी सुध्दा नजीकच्या काळात आत्महत्या करण्यास सुरुवात करतील अशी आजची परिस्थिती आहे. पूर्वी दुधाचा 24 रुपये लीटर असलेला दर आता 14-16 रुपयांवर आला आहे. त्यामुळे अनेक दूध उत्पादक आपली जनावरे विकत आहेत. दुधाला पुरेसा भाव मिळत नाही, त्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे. या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी सरकार काय करीत आहे ? हा प्रश्न आजचा नाही. सभागृहात चर्चा सुरु झाली म्हणून मी हा मुद्दा मांडत आहे असे नाही. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाबाबत आपण गेल्या अनेक दिवसांपासून वर्तमानपत्रात वाचत आहोत. दुधाच्या दरात वाढ करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत आंदोलने सुध्दा झाली. दूध उत्पादक शेतकऱ्यांनी कॅनमधील दूध रस्त्यावर ओतून दिले. महोदय, आम्ही सत्ताधारी मंडळीकडून छोट्याछोट्या गोष्टींमध्ये संवेदना पाहिली आहे. परंतु आज तीच संवदेना आंदोलने होत असताना कोठे गेली ? या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने उत्तर दिले पाहिजे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जगविण्यासाठी सरकार आपल्यासाठी काही तरी करीत आहे असा विश्वास त्यांच्यांमध्ये निर्माण केला पाहिजे. अशा प्रकारची भूमिका सरकारने घेणे हेच सभागृहाला अपेक्षित आहे, एवढेच या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने सांगतो व येथेच थांबतो.

-----------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, गेल्या तीन वर्षात दुष्काळाने महाराष्ट्राची पाठ सोडलेली नाही. 2012 मध्ये अवर्षण झाले. गेल्या वर्षी पाऊस, गारपीट झाली आणि या वर्षी पुन्हा अवर्षणाचा फटका राज्याला बसत आहे. आमची अपेक्षा होती की, सरकार दुष्काळ जाहीर करेल, शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील. सध्या विदर्भ आणि मराठवाड्यात आत्महत्यांचे जे सत्र सुरु आहे त्याला कोठे तरी आळा घालण्यासाठी, शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी सरकार पुढे येईल आणि आत्महत्या थांबविण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करेल. परंतु दुर्भाग्य असे की, या सरकारला येऊन एक महिना होऊन गेलेला असताना या सरकारमध्ये या विषयी कोठेही संवेदनशीलता दिसून येत नाही. खरीप हंगाम संपल्यानंतर शेतकऱ्यांनी सोयाबीनची लागवड केली. शेतकऱ्यांच्या पदरी काय पडले ? विदर्भातील परिस्थिती अशी आहे की, जे पेरले त्याची मजुरी देण्याजोगी सुध्दा परिस्थिती नाही.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

एवढ्यापेक्षाही कमी उतारा होता. रब्बीसाठी तर जाऊ द्याच. मागील 10 वर्षांत जेवढे हंगाम झाले, त्यामध्ये सर्वात कमी उतारा मिळाला आहे. चालू वर्षी खरीप हंगामामध्ये प्रामुख्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दुष्काळ बघायला मिळाला. हा दुष्काळ मोठा आहे. सन 1972 पेक्षाही हा मोठा दुष्काळ आहे, असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. दुष्काळाच्या संदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना झाली पाहिजे. आज त्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. सभागृहात या संदर्भात चर्चा झालीच पाहिजे. वरून पडलेला पाऊस आपण किती जास्त थांबवू शकतो, किती जास्त अडवू शकतो, हे देखील पाहिले पाहिजे. जलसंधारणाचे काम चांगल्या स्वरूपात झाले तर निश्चितपणे दुष्काळावर मात केली जाऊ शकते. ठिबक सिंचनासंबंधी अत्यंत महत्त्वाची भूमिका घ्यावी लागणार आहे. आपण ठिबक सिंचनाच्या माध्यमातून कमीत कमी पाण्याचा उपयोग करून जास्तीत जास्त यिल्ड निर्माण करू शकतो. आपण यावर भर देण्याची गरज आहे. मी बुलढाण्यामध्ये गेलो होतो. मी पाहिले की, त्या भागातील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाने कपाशी पेरली होती. ठिबक सिंचन योजना व्यवस्थित राबविली तर ज्या भागात पाण्याची कमतरता आहे तेथे, पाण्याचे व्यवस्थित नियोजन करून, किमान रब्बी हंगामामध्ये आणि काही प्रमाणात खरीप हंगामामध्ये पाण्याचे नियोजन करून शेतकऱ्यांना मदत केली जाऊ शकते. अनेक सिंचन प्रकल्पाच्या संदर्भात चर्चा झाली. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी देखील या संदर्भात मत मांडले. मी अपेक्षा करतो की, माननीय मंत्री या संदर्भात आपल्या उत्तरातून खुलासा करतील.

सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाच्या उर्वरित कामामध्ये 2 उपसा सिंचन योजना आहेत. अंभोरा उपसा सिंचन योजना व मोखेबर्डी उपसा सिंचन योजना अशा या योजना आहेत. सदर उपसा सिंचन योजना असलेला भाग अवर्षणग्रस्त आहे. साधारणपणे 4 तालुक येतात अशा प्रकारचा तो परिसर आहे. मोटार हाऊस व मोटार पंप यांचे काम पूर्ण केले तर पुढच्या हंगामामध्ये त्या उपसा सिंचन योजनांचा त्या भागात फायदा होऊ शकतो, असे मला वाटते. मला अपेक्षा आहे की, माननीय ज्येष्ठ मंत्री श्री. एकनाथराव खडसे (पाटील) चर्चेच्या उत्तराच्या वेळेस या संदर्भातील देखील उल्लेख करतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

सभापती महोदय, काल विधानसभेत पुरवणी मागण्या मांडल्या गेल्या. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अशी माहिती मिळाली की, 2 हजार कोटी रूपये दुष्काळासाठी ठेवले आहेत. आपण मानसिकता तयार करून टाकली आहे का ? कारण येथे चर्चा नाही, आम्ही ऐकले नाही की, ते कशा स्वरूपात आहे आणि आपण पुरवणी मागण्यांमध्ये पैसे ठेवले. हा भीषण दुष्काळ आहे. आम्हाला आपल्याकडून या दुष्काळाच्या व्याख्येसंदर्भात समजले पाहिजे. पुरवणी मागण्यांमध्ये दुष्काळासाठी 2 हजार कोटी रूपयेच ठरवून ठेवले. एका बाजूला माननीय अर्थ मंत्री म्हणतात की, खजाना खाली झाला आहे. पैसे देण्याची व्यवस्था नाही. मी म्हणतो की, हा निव्वळ पळपुटेपणा आहे. 9 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. हा पैसा कसा उभारणार आहात ? आम्हाला या संदर्भात विश्वास मिळाला पाहिजे. आपण दुष्काळाच्या संदर्भात पॅकेज जाहीर करावे. आपण पॅकेज जाहीर करणार असाल तर त्या संदर्भात वितरण कसे करणार, पैशांची व्यवस्था कशी करणार, हे समजले पाहिजे. माननीय अर्थमंत्र्यांचे स्टेटमेंट ऐकल्यानंतर वाटत नाही की, या पुरवणी मागण्यांद्वारे निधी मिळू शकेल. मला या संदर्भात माननीय मंत्र्यांच्या उत्तरात खुलासा हवा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितलेलेच आहे.

सभापती महोदय, मी एका शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बाबतीत सांगितले तर अंगावर काटाच येईल. नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यामध्ये पारडी या गावाजवळ मांडळसारख्या एका मोठ्या बाजारपेठेच्या बाजूला चंद्रशेखर महाजन नावाच्या 45 वर्षांच्या एक तरूणाने आत्महत्या केली. त्याने स्वत:ला विजेच्या ट्रान्सफॉर्मरला चिकटवून घेतले. त्याने खरीप हंगामामध्ये सोयाबीनचे पीक लावले होते, ते झाले नाही. सावकाराकडून कर्ज घेतले. सेवा सहकारी सोसायटीकडून कर्ज घेतले. घराची परिस्थिती पाहिली तर खूप वाईट वाटते. 9 तारखेला ही घटना घडली. तेथील परिस्थिती इतकी भीषण आहे की, अंगावर काटा येतो. अशा घटना वर्धा जिल्ह्यात, यवतमाळ जिल्ह्यात रोज घडत आहेत. रोज 2-4 शेतकरी आत्महत्या करीत आहेत, भगवंताकडे जात आहेत, अशा वर्तमानपत्रामध्ये बातम्या येत आहेत. राज्यात अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. नागपूरमध्ये अधिवेशन सुरू आहे. सत्ताधारी पक्षाला या संदर्भात काही संवेदना आहेत, असे दिसून येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

नाही. शासनाने या संदर्भात संवेदना दाखविल्या पाहिजेत. मी ऐकले की, अच्छे दिन येत आहेत. सोशल मीडियामुळे सत्ता मिळाली. सध्या ट्यूटरवर संवाद सुरू आहे. एखाद्या भागात एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली असेल, गंभीर परिस्थिती निर्माण झाली असेल तर 2-3 ट्विट करून टाकले की, आपली जबाबदारी संपली, असा प्रकार सुरू आहे. ट्विटर, सोशल मीडिया, फेसबुक, व्हॉट्स ॲप वापरले आणि हे सरकार सत्तेत आले. आपण शेतकऱ्यांच्या बाबतीत काही तरी संवेदना दाखवा. बुलढाणा जिल्ह्यात एका तरूणाने ट्रान्सफॉर्मरला चिकटून आत्महत्या केली. सदर घटना 9 तारखेला घडली आहे. परंतु, तेथे एकही माननीय मंत्री गेले नाहीत. ही शासनाची संवेदनशीलता आहे का ?

सभापती महोदय, मी या चर्चेच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती खूप खराब आहे. तो खरेदी केंद्रावर जाण्यास तयार नाही. कारण त्याला कापसासाठी कमी भाव मिळत आहे. कपाशीचा भाव 3400-3500 च्या वर नाही. ते देखील तोंडी भाव आहेत. वस्तुस्थिती जाणून घ्यायचे असेल तर आपल्याला खरेदी केंद्रावर गेल्यास खरा भाव समजेल. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ग्रेडर लोकांनी परेशान केले आहे. वजन वाढविण्यासाठी तू तुझ्या कापसाच्या बंडीमध्ये पाणी भरून आणले आहे, असे म्हटले जाते. दुष्काळाने पिडलेल्या शेतकऱ्यांना अशाप्रकारे बोलण्याची ग्रेडरची पध्दत आहे. आपल्याला या शेतकऱ्यांना अशा परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी संवेदनशीलपणाची भूमिका मांडावी लागेल. केंद्र शासन सर्व राज्यांतील कॉटन ग्रोईंग बेल्ट असेल तेथून माहिती घेते आणि त्या हिशेबाने एमएसपी ठरविली जाते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक..........

मला आठवते की, आम्ही परवा मोर्चा काढला आणि धानाला 6 हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा, अशी सरकारला विनंती केली. त्यावर काही सत्ताधारी पक्षाच्या मंत्री महोदयांनी टिंगलटवाळी करण्याचा प्रयत्न केला. एवढा भाव कसा मिळेल, हा भाव देता येणार नाही, अशी वक्तव्ये त्यांनी केली आहेत. कधी कधी असे वाटते की, यांनी अशी मानसिकताच बनवून ठेवली आहे की, मदत करायचीच नाही. अशा मानसिकतेमुळे या सरकारवर विश्वास राहू शकत नाही. हे सरकार नव्याने स्थापन झालेले आहे. परंतु, या सरकारमध्ये काही अनुभवी मंत्री महोदय आहेत. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे किंवा माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते हे अनुभवी आहेत. रावते साहेबांनी तर शेतकऱ्यांसाठी अनेक मोर्चे काढले आहेत, दिंड्या सुध्दा काढल्या आहेत. परवा ते एका गावात गेले होते. त्यांची संवेदनशीलता मी समजू शकतो. माननीय मंत्री श्री.खडसे साहेब जळगाव जिल्ह्यातील आहेत आणि तो सर्व भाग कापूस उत्पादक आहे. त्यामुळे मला असा विश्वास आहे की, उद्याच्या उत्तरात कापूस उत्पादक, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला निश्चितपणे मदत होईल.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भात मी कालच वीज मंत्री महोदयांचे एक स्टेटमेंट वाचले. त्यांनी असे वक्तव्य केले की, "आम्ही विजेचे दर वाढविणार आहोत, वीज उपलब्ध नाही." मी ज्यावेळी या संदर्भातील माहिती घेतली त्यावेळी असे लक्षात आले की, राज्याला 15000 ते 15500 मे.वॅ.एवढ्या विजेची आवश्यकता असून 13500 ते 14000 मे.वॅ.विजेची उपलब्धता आहे. साधारणपणे 1000 ते 1500 मे.वॅ.विजेचा शॉर्ट फॉल आहे. त्यामुळे विजेचे योग्य नियोजन केले तर आपण संपूर्ण राज्याला, सर्व सेक्टरला व्यवस्थित वीज उपलब्ध करुन देऊ शकू, अशी परिस्थिती आहे. परंतु, कालचे वीज मंत्री महोदयांचे स्टेटमेंट ऐकल्यानंतर मला आश्चर्य वाटले. ते असे म्हणाले की, "आम्हाला लोडशेडिंग करावे लागेल. कारण, राज्यात वीज उपलब्ध नाही. आम्हाला दर वाढवावे लागतील. कारण, राज्याला कोळसा मिळत नाही." मला असे वाटते की, मंत्री महोदयांनी थोडा अभ्यास करुन स्टेटमेंट केले पाहिजे. अशा परिस्थितीत अशी स्टेटमेंट करणे संवेदनशीलता असण्याचे लक्षण नाही. त्यामुळे माझी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक..........

की, किमान उद्या या सभागृहात उत्तर देत असताना थोडी संवेदनशीलता दाखवावी. या राज्यातील शेतकऱ्यांना मदत जाहीर करीत असताना, पॅकेज जाहीर करीत असताना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यावीच परंतु येणाऱ्या काळात अशा प्रकारच्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी ज्या काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, त्या कराव्यात आणि त्यांची निश्चित कालमर्यादेत अंमलबजावणी कशी होईल, हेही पहावे व त्याचाही उल्लेख उत्तरात करावा.

सभापती महोदय, ठिबक सिंचन, जलसंधारणाचे काही प्रकल्प अंतिम टप्प्यात आलेले आहेत. सिंचनाच्या या प्रकल्पांसाठी या वर्षी कशा प्रकारे निधी उपलब्ध करुन देणार आहात आणि या योजना निश्चित कालमर्यादेत कशा पूर्ण होतील, या संदर्भातील उल्लेख उत्तरामध्ये झाला तर निश्चितपणे शेतकऱ्यांमध्ये नवी उमेद निर्माण होईल, सध्याचे वातावरण दूर होईल आणि ते यामधून बाहेर निघतील, एवढेच सांगतो आणि थांबतो.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, विदर्भात अधिवेशन सुरु आहे. अनेक वर्षांपासून आपण दुष्काळाचे प्रश्न, अनुशेष, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या संदर्भातील मागण्या करीत आहोत. या अधिवेशनाचा एक वेगळेपणा असा की, सत्ता परिवर्तनानंतरचे हे पहिले अधिवेशन आहे आणि त्यामुळे निर्णयांमध्ये राज्य सरकारची संवेदनशीलता दिसली पाहिजे, अशा प्रकारचे मत अनेक सन्माननीय सदस्य व्यक्त करीत आहेत. ज्या अनेक घटना घडलेल्या आपल्याला दिसत आहेत त्या घटनांचे गांभीर्य अन्य सदस्यांनी सांगितलेलेच आहे. हा प्रस्ताव नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने दिलेला असला तरी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील असा प्रस्ताव दिला होता. त्यामध्ये सुध्दा शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, अनुशेष या संदर्भात राज्य सरकारकडून काय अपेक्षा आहेत, याचा उल्लेख करण्यात आला होता. संपूर्ण विदर्भाचेच नव्हे तर मराठवाड्याचे आणि महाराष्ट्राचे लक्ष या सरकारकडे लागलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, ही सर्व परिस्थिती आपण पाहिली तर मराठवाड्यात 301, विदर्भात गेल्या 72 तासात 11 आत्महत्या झालेल्या आहेत. नागपूर, गडचिरोली, यवतमाळ या सर्व भागात रोज आत्महत्या होत आहेत. साधारणपणे हे अधिवेशन संपेपर्यंत दुर्दैवाने यामध्ये आणखी वाढ झालेली दिसून येईल, अशी वस्तुस्थिती आहे. कृषी खात्याच्या अंदाजानुसार गेल्या 4 महिन्यात 204 आत्महत्या झाल्या आहेत.

सभापती महोदय, शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर आपण घटनास्थळाला भेट देत असतो. काही दिवसांपूर्वी 25 आणि 26 नोव्हेंबरला मी मराठवाड्याचा दौरा केला होता. त्या घटनास्थळाला माननीय महसूल मंत्री महोदयांनीही भेट दिली होती. या घटना पाहिल्यानंतर काही मुद्दे प्रकर्षाने समोर येत आहेत. वखारी गावामधील पवार कुटुंबाला मी भेट दिली. त्यावेळी असे लक्षात आले की, दिनांक 13/11/21014 रोजी त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. परंतु, पंचनामा दिनांक 20/11/2014 रोजी झाला. आमहत्येनंतर 7 दिवसांनी पंचनामा झालेला आहे. आम्ही त्या संदर्भातील कागदपत्रे तपासली. त्यावरुन स्पष्ट दिसले की, जबान्या घेतल्या गेल्या. परंतु,

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे............

शेतकऱ्याच्या बायकोने आत्महत्या कर्ज बाजारीपणामुळे झाली आहे, असा जो उल्लेख केला होता त्याचा समावेश जबानीत नव्हता. या दौऱ्यामध्ये असेही निदर्शनास आले की, आमदार आणि अन्य नेते भेट देत आहेत. त्यामुळे पुन्हा जबाब लिहून घेतले गेले. त्या शेतकऱ्याची 9 वी शिकलेली बुलढाणा जिल्ह्यातील पत्नी आहे. ती असे म्हणाली की, ही सर्व कार्यपध्दती बघितल्यानंतर मला तर असे वाटते की, मी देखील आत्महत्या करावी. त्या बाईला दोन छोटी मुले आहेत. हे सर्व पाहिल्यानंतर मला अशी विनंती करावयाची आहे की, खडसे साहेब आपला प्रचंड अभ्यास आहे. खूप मोठ्या प्रमाणावर आपण जागृति निर्माण केलेली आहे. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते साहेबांनी अनेक वेळा सभागृहात या संदर्भातील मुद्दे उपस्थित केले आहेत. मूळ प्रश्न हा आहे की, या संदर्भातील स्वामीनाथन अहवाल किंवा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या अहवालांवर आपण 15 वर्षात सभागृहात चर्चा केली. मात्र या अहवालांवर अंमलबजावणी काय झ ाली, याकडे लक्ष दिले नाही. अंमलबजावणी झालेली नाही, हे 100 टक्के सत्य आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या बाबतीत या अहवालांची अंमलबजावणी करण्यामध्ये आपण निश्चितपणे कमी पडलेलो आहोत.

सभापती महोदय, शिवसेनेच्या निवेदनाचा उल्लेख कॉंग्रेस पक्षाने केला आहे. कॉंग्रेस पक्षाच्या निवेदनात काय उल्लेख आहे, हे मला माहीत नाही. शिवसेनेचे निवेदन पक्षाचे नसून राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या मागण्यांचे आहे आणि ते रेकॉर्डवर आणणे मला गरजेचे वाटते. यामधील एक प्रमुख मागणी अशी आहे की, ज्याचा उल्लेख बहुधा कोणत्याही सदस्यांनी केलेला नाही. शेतकऱ्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत त्यांच्या जन धन खात्यावर जमा करावी, अशी मागणी त्यामध्ये आहे. याबाबतीत सरकारने निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. अनेक शेतकऱ्यांनी अद्याप खाती उघडलेली नाहीत, हाही विषय आहे. परंतु ही मदत थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा होणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

यानंतर श्री.मा.शिगम..........

अप्रकाशित प्रत / अप्रसिद्ध नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे, त्या ऑन लेग आहेत. आता मी लक्षवेधी सूचना पुकारतो.

श्री. माणिकराव ठाकरे : लक्षेवधी सूचना घेण्याआधी माझी आपणास विनंती आहे की, अत्यंत महत्वाच्या विषयावर सदनामध्ये चर्चा सुरु आहे. दुष्काळाच्या विषयावर बोलणाऱ्या सदस्यांची संख्या खूप जास्त आहे. सर्वच सन्मानीय सदस्यांना त्यांच्या भागातील परिस्थितीच्या संदर्भात बोलण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे आजच्या प्रस्तावावरील चर्चेसाठी एक तास वेळ वाढवून द्यावा.

**उप सभापती** : नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा दुपारी 12 ते 2.30 या वेळेत घ्यावी व त्यानंतर लक्षवेधी सूचना घ्याव्यात अशा सूचना माननीय सभापतींनी दिलेल्या आहेत. त्यांच्या सूचनेनुसार मी लक्षवेधी पुकारलेली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेसाठी दुपारी 12 ते अडीच अशी वेळ दिल्यानंतर पुष्कळशा सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल अशी अपेक्षा होती. विषयाचे गांभीर्य अधिक आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना अजून बोलायचे आहे. तेव्हा या प्रस्तावावरील चर्चेसाठी आणखी वेळ वाढवून द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : आवश्यकता असेल तर उद्या वेळ वाढवून देता येईल. आता वेळ वाढविता येणार नाही.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विरोधी पक्षनेत्याच्या घोषणे बावत

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आज सकाळी कामकाज सुरु असताना विधानपरिषद सभागृहाचे नेते आणि उपनेते यांच्या नावाची घोषणा झाली. या सभागृहाचे कामकाज नियमाने चालवायचे असेल तर या सदनाच्या विरोधी पक्षनेत्याच्या नावाची देखील घोषणा होणे आवश्यक आहे. सत्ताधाऱ्यांकडून प्रस्ताव आल्यानंतर त्यावर बोलण्यासाठी विरोधी पक्षनेत्याचा पहिला क्रमांक असतो. विरोधी पक्षनेत्याच्या नावाची घोषणा करण्यासाठी आपणाकडे पत्र सादर केल्यानंतर देखील त्यांच्या नावाची घोषणा अजूनपर्यंत झोलेली नाही. नियमाप्रमाणे कामकाज चालविण्याच्या तरतुदीची पूर्तता न करता कामकाज पुढे चालविता कामा नये अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : हा मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर त्या संदर्भात दोन पत्रे आलेली असून माननीय सभापतींच्या ती विचाराधीन आहेत. माननीय सभापती त्यासंदर्भात निर्णय घेऊन एक-दोन दिवसात घोषणा करतील.

(सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. हेमंत टकले यांनी तांत्रिक मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा विचार होणे आवश्यक आहे. आज सकाळी संविधानिक काम सुरु असताना सभागृहाचा नेता आणि उपनेता यांच्या नावाची घोषणा झाली. सन्माननीय सदस्य जयंत प्र. पाटील यांनी या संदर्भात हरकतीचा मुद्दा देखील उपस्थित केला होता. त्यावेळी यासंदर्भात वेगळी पत्रे आलेली आहेत असे माननीय उप सभापतींनी सांगितले. या संदर्भात लवकरात लवकर निर्णय अपेक्षित आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:40

श्री.सुनील तटकरे.....

आता लक्षवेधी सूचना विचारात घेत असताना माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी पुन्हा मुद्दा उपस्थित केला आहे. माननीय सदस्यांनी हीच भावना आहे की, संविधानिक कामाच्या निमित्ताने मुख्यमंत्री हे विधानसभा सभागृहाचे नेते असतात. विधानपरिषद सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री हे नेते राहू शकत होते. तरी सुध्दा आपण संविधानिक बाब म्हणून सभागृहात गोंधळ सुरु असताना देखील माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांची सभागृह नेते म्हणून घोषणा केली आणि आजपर्यंत उप नेता नेमण्याची प्रथा नव्हती तरी सुध्दा माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांची या सभागृहाचे उप नेते म्हणून घोषणा केली.

श्री.एकनाथराव खडसे-पाटील : (जागेवर बसून) नियमात तरतूद आहे.

श्री.सुनील तटकरे : ऐकिवात असे होते की, माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील हे या सभागृहाचे नेते होणार होते, परंतु अखेरच्या क्षणाला बदल झाला. मी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचे अभिनंदन करतो. या सभागृहाचे कामकाज सुरु होऊन तीन दिवस झाले आहेत. आज या सभागृहात दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा सुरु झाली. वैधानिक कामकाज होते त्यावेळी विरोधी पक्षाचा हा हक्क आहे, विरोधी पक्ष नेत्याच्या संदर्भात आपल्याकडून तातडीने घोषणा व्हावी अशा पध्दतीची सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याला भेटून आम्ही जी मागणी केली आहे त्या संदर्भातील निर्णय आपल्याकडून लवकरात लवकर व्हावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचा विचार करता आपण सर्वात ज्येष्ठ आहात असे मला वाटते. या सभागृहाला विरोधी पक्ष नेता नाही अशी स्थिती पहिल्यांदा निर्माण झाली आहे. सभागृहाचे कामकाम सुरु होऊन दोन दिवस झाल्यानंतर या सभागृहाच्या नेत्याची घोषणा करण्यात आली आहे. असे यापूर्वी कधी घडले नव्हते. माननीय मुख्यमंत्री या सभागृहामध्ये येऊन बसतात त्याच दिवशी विरोधी पक्षनेते देखील आसनस्थ होतात. ज्यांची विरोधी पक्षनेते पदी निवड होते त्यांना सन्मानाने त्या पदावर बसविण्याची या सभागृहाची प्रथा आहे. लोकसभेमध्ये विरोधी पक्षनेत्याबद्दल जो निर्णय झाला तो चुकीचा आहे असे माझे मत आहे. विरोधी पक्षाला जे पाठिंबा देतात, आपला गटनेता निवडतात त्यांनाच विरोधी पक्षनेता म्हणून

.2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

मान्यता मिळते. या सभागृहात असे विरोधी पक्षनेते होऊन गेले, असे गटनेते होऊन गेले ज्यांना पाठिंबा दिला गेला होता. ज्यामध्ये सदानंद वर्दे, एन.डी.पाटील व रा.सु.गवई यांचा समावेश आहे. या सभागृहाचे माजी सदस्य माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांच्या एका मताच्या पाठिंब्यावर विठ्ठलराव हांडे यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड झाली होती. आज संख्याबळ निश्चित आहे. अशा स्थितीत मी सभागृहाच्या नेत्यांना विनंती करतो की, नवीन प्रथा पडू नये, वाईट वळण लागता कामा नये. म्हणूनच मी सुरुवातीला सांगितले की, सभागृहाचे नेते प्रथम बोलतात, त्यानंतर विरोधी पक्षनेता बोलतात अशी या सभागृहाची परंपरा आहे. मी या सभागृहात गेली 16 ते 17 वर्षे काम करीत आहे. सभापती महोदय, आपण सभागृहाच्या सर्वोच्च स्थानी आहात. आपल्याकडून लवकरात लवकर परंतु आजच विरोधी पक्षनेत्याची घोषणा व्हावी अशी मी मागणी करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा मांडला तो संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यांची अपेक्षा आहे की, आज या सदनामध्ये सभागृहाचे नेते आणि उपनेते यांच्या नावाची घोषणा झाली त्याच पध्दतीने लवकरात लवकर विरोधी पक्षनेत्याची घोषणा होणे आवश्यक आहे. माझ्याकडे यापूर्वी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडून एक निवेदन प्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचेही एक निवेदन प्राप्त झालेले आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्याकडून फॅक्सद्वारे त्यांच्या पक्षाच्या आमदारांची एक यादी आलेली आहे. या अनुषंगाने माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दिलेल्या निवेदनाचा मी अभ्यास करीत आहे. माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड करावी याकरिता राष्ट्रवादी पक्षाच्या सर्व आमदारांनी येऊन मला एक निवेदन दिले आहे. तेही निवेदन माझ्याकडे आहे. लवकरच हा निर्णय कसा होईल या दृष्टीने मी जरूर प्रयत्न करीत आहे. त्यानंतर या संदर्भातील घोषणा मी करणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण भाष्य केल्यानंतर मी बोलणे अपेक्षित नाही आणि अभिप्रेतही नाही. पॉईंट ऑफ प्रोसीजर किंवा पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मला आपल्याकडून एका गोष्टीची माहिती जाणून घ्यायची आहे. आपल्याकडे माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी निवेदन दिलेले नसून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माननीय श्री.अजितदादा

...3...



SGB/ 14:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पवार आणि पक्षाचा अध्यक्ष म्हणून मी आपल्याला निवेदन दिले आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केलेल्या तांत्रिक मुद्यावर चर्चा करण्याची ही वेळ नाही याची मला निश्चितपणे जाणीव आहे. गट आणि पूर्वीच्या प्रथा परंपरा यांचा विचार करता एक बाब निश्चित आहे की, या सभागृहामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य संख्या 28 आहे. त्यामुळे आपल्याकडे आलेल्या दुसऱ्या पत्राबाबत विचार करण्यासारखी स्थिती आहे असे मला वाटत नाही. शेवटी निर्णय आपण घ्यायचा आहे आणि तो घ्यावा. परंतु संख्येच्या आधारे विरोधी पक्षनेता ठरत असेल तर पॉईंट ऑफ प्रोसीजर किंवा पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून नम्रपणे विचारु इच्छितो की, विरोधी पक्षनेता कशा आधारे ठरतो? पक्षाच्या संख्याबळावर की इतर बाबीनुसार ठरतो. संख्याबळाबरोबर इतरही काही सहकारी आमदारांनी त्यांना पाठिंबा दिला असेल तोही गृहीत धरला पाहिजे, त्याबद्दल कोणाचे दुमत असण्याची गरज नाही. त्यानुसार संख्या जास्त होत असेल तर आमची हरकत असण्याचे कारण नाही. पक्षाचे संख्याबळ आणि त्यांच्यासोबत असलेले संख्याबळ या दोन्ही बाबींचा विचार केला जावा आणि या संदर्भात निर्णय लवकरात लवकर करावा. विरोधी पक्षनेत्याशिवाय सभागृह चालणे, चालविणे हे सुध्दा योग्य नाही असे मला वाटते. या बाबत त्वरित निर्णय व्हावा ही अपेक्षा आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहामध्ये विरोधी पक्षाला नेतृत्व असले पाहिजे. सभागृहामध्ये कामकाजाच्या दृष्टीने विरोधी पक्षनेता असणे आवश्यक आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी प्रस्ताव दिलेला आहे. मी सुध्दा आपल्याकडे जो प्रस्ताव दिला आहे त्यामध्ये काही कारणे नमूद केली आहेत. आपण या संदर्भात निर्णय घ्यावा. या संदर्भात आम्ही एकत्रितपणे चर्चा करुन आपल्याला सुचवितो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या सभागृहातील विरोधी पक्षनेते पदाबाबतचा दावा करताना यापूर्वी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सूचित केल्याप्रमाणे संख्याबळाचा आधार हा त्याचा पहिला आणि प्राथमिक निकष आहे. दावा केल्यानंतर त्याबाबत काही आक्षेप असतील किंवा त्या व्यतिरिक्त काही म्हणणे मांडायचे असेल तर तो अधिकार आपण मान्य केला पाहिजे. परंतु तो अधिकार मान्य करताना आज सभागृहाच्या कामकाजाचा तिसरा दिवस सुरु आहे. या

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहामध्ये राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु झालेली असताना निश्चितपणे विरोधी बाकावर जे माननीय सदस्य बसलेले आहेत त्यांच्या दृष्टीने या ठिकाणी विरोधी पक्षनेता असणे अत्यंत आवश्यक बाब आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

त्यादृष्टीने याप्रकरणी आजपर्यंत जेवढा काळ गेलेला आहे तो पुरेसा आहे असे समजून लवकरात लवकर याबाबतची स्पष्टता व्हावी, शक्यतो आम्हाला आजच अपेक्षित असून तशी कार्यवाही व्हावी. परंतु हा निर्णय सर्वस्वी आपला असल्यामुळे आमच्या भावनांची योग्य ती दखल घेऊन आम्हाला त्याची माहिती द्यावी अशी विनंती करतो.

श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील (महसूल मंत्री) : महोदय, सभागृहात विरोधी पक्षाचे अनन्यसाधारण महत्व आहे आणि पक्षनेत्याचे देखील तितकेच महत्व आहे. सभागृहाचे कामकाज गेल्या तीन दिवसांपासून सुरु झालेले असून अद्याप विरोधी पक्षनेता निवडलेला नाही. याबद्दल दोन्ही पक्षाच्या माध्यमातून भूमिका मांडण्यात आलेल्या आहेत. मलाही असे वाटते की, सभागृहात विरोधी पक्षनेत्याची नेमणूक लवकरात लवकर झाली पाहिजे म्हणून माननीय संसदीय कार्य मंत्र्यांकडूनही पत्र दिलेले आहे, आता आपणास हा निर्णय घ्यावयाचा आहे. सभागृहात मघाशी अधिकाधिक आमदार असल्याचे सांगितले गेले असून त्याबाबतची सत्यता आपण पडताळून याबाबतचा निर्णय त्वरित घ्यावा, अशी मी विनंती करतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभागृहात विरोधी पक्षनेता असणे नितांत आवश्यक आहे. आज सभागृहाच्या कामकाजाचा तिसरा दिवस सुरु असून अद्यापपर्यंत विरोधी पक्षनेत्याची निवड करण्यात आलेली नाही. शेवटी हा आपला अधिकार आहे पण मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून जाणून घेऊ इच्छितो की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विरोधी पक्षनेता असावा असे संख्याबळाच्या आधारावर मघाशी सांगण्यात आले. पण एका गोष्टीचा खुलासा येथे होणे आवश्यक आहे की, सरकार बनविताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या सरकारला बाहेरुन पाठिंबा जाहीर केला होता. मग तो पक्ष अजून सरकारसोबत आहे की नाही आणि सरकारसोबत असेल तर विरोधी पक्षनेते पदासाठी त्यांची पात्रता आहे की, नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजातून मी "पात्रता" हा शब्द काढून टाकत आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सरकारला बाहेरुन पाठिंबा जाहीर केला होता त्यामुळे आम्ही विरोधी पक्षात आहोत की नाही असा मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्य ज्येष्ठ सदस्य असून एक विचारवंत आहेत व मी त्यांचा अत्यंत आदर करतो. त्यांच्या ज्ञानात भर घालण्याच्या दृष्टीने मी हे स्पष्टीकरण करतो असे मी म्हणणार नाही



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.....

पण तरी देखील त्यांना कोणी बोलावयास सांगितले असेल की काय याची माहिती नाही. त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करुन मी नम्रपणे सांगू इच्छितो की, त्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जी भूमिका जाहीर केली होती ते सभागृहाच्या रेकॉर्डवर येणेही आवश्यक आहे.

महोदय, निवडणुकांच्या निकालाच्या दिवशी म्हणजेच 19 तारखेला त्रिशंकू अशी परिस्थिती होती आणि आज काही सन्माननीय सदस्य जे मंत्रिमंडळात सहभागी झालेले आहेत त्यांच्याबद्दल मी योग्य वेळी बोलणारच आहे पण दिल्लीसारखी स्थिती निर्माण होऊ नये, राज्यात अस्थिरता परवडणार नाही या भूमिकेतून आम्ही बाहेरुन समर्थन देण्याची भूमिका स्पष्ट केली होती. त्याचप्रमाणे वेळोवेळी हे देखील सांगितले होते की, राज्यात स्थिर सरकार रहावे म्हणून आम्हाला पाठिंबा मागितलेला नसतानाही आम्ही तो देऊ केला होता व त्या पत्रकार परिषदेला मी देखील उपस्थित होतो. जनतेच्या प्रश्नांवर विरोधी पक्षाची भूमिका देखील राष्ट्रवादी बजावणार आहे व त्यानंतरच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ती बजावली देखील. ज्यावेळेस शिवसेना पक्ष सरकारमध्ये सामील झाला तेव्हा स्थिरतेबाबतचा प्रश्न संपला आणि अस्थिरता शिल्लकच राहिली नाही. आमच्या भूमिकेच्या बाबतीत गैरसमज होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, आम्ही विरोधी पक्षाची भूमिका यापुढे बजावणार आणि आमची तीच भूमिका राहणार आहे त्यासाठी आमच्या पक्षाच्या वतीने पत्रही दिलेले आहे. माझी अशी विनंती आहे की, यासंबंधीचा निर्णय आजच्या आजच जाहीर करावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण देऊन माझ्या ज्ञानात भर घातली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, "राजा बोले आणि दल हाले" अशी आमची परिस्थिती नसून "आम्हीच बोलणार आणि आम्हीच हलणार" अशी आमची परिस्थिती आहे. केवळ माझ्या मनात शंका म्हणून मी हा मुद्दा उपस्थित केला व त्याचा गैरसमज सन्माननीय सदस्यांनी करुन घेऊ नये.

**सभापती** : विरोधी पक्षनेता निवडीच्या बाबतीत कोणती गोष्ट कोणत्या वेळी करावी यादृष्टीने माझ्या काही मित्रांनी मला सल्ला देण्याचा प्रयत्न केला, तो मी समजून घेतला. त्यादृष्टीने सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी दिलेले निवेदन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या

......3



PFK/ श्री. भोगलेनंतर 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

वतीने सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांच्यासाठी दिलेले निवेदन या दोन्ही गोष्टींचा यथायोग्य विचार करुन अचूक निर्णय लवकरात लवकर कसा होईल हे मी बघतो, त्यामुळे आता या विषयावरील चर्चा संपलेली आहे. आपण आता लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेऊ.

--------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आंबेगांव (जि. पुणे) तालुक्यातील माळीण गावावर दि. ३० जुलै, २०१४ रोजी कोसळलेल्या दरडीत शेकडो लोकांचे मृत्यू होणे

मु. शी. : आंबेगांव (जि. पुणे) तालुक्यातील माळीण गावावर दि. ३० जुलै, २०१४ रोजी कोसळलेल्या दरडीत शेकडो लोकांचे मृत्यू होणे या विषयावर ॲड. जयदेव गायकवाड यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) पेठ पायथ्याशी वसलेल्या माळीण गावालगतचा डोंगर दिनांक 30 जुलै, 2014 रोजीच्या पावसात कोसळल्याने संपूर्ण गाव सदर डोंगराखाली दबले जाणे, सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या अन्य कुटूंबांचे अन्यत्र पुनर्वसन करण्याचा तसेच आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेणे, मात्र सदर निर्णय घेऊनही अद्यापही शासनाकडून कुटूंबांचे पुनर्वसन व त्यांना आर्थिक मदत देण्यात न येणे, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेला असंतोष आणि निर्माण झालेली संतापाची भावना व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री. एकनाथराव खडसे-पाटील (महसूल मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यात घोडेगांवानजिक डिंबे धरणाच्या परिसरात जवळ असलेल्या माळीण गांवात गेल्या 30 जुलै 2014 रोजी अतिवृष्टीमुळे दरड कोसळली व त्यात या गावातील 151 लोक बेसावध व झोपेत असतानाच डोंगराच्या कड्याखाली गाडले गेले आहेत. आता त्या गावात अनेक भयंकर असे प्रश्न निर्माण झाले आहेत.

.....यू-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

ॲड.जयदेव गायकवाड....

या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी दोन महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणार आहे. त्या गावाचे पुनर्वसनासह अन्य प्रश्न सुटलेले नाहीत. पुनर्वसनासाठी जागा शोधण्याचे काम शासनाच्यावतीने सुरु होते. ते काम पूर्ण झाले आहे काय, पुनर्वसनासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे काय ? अशाच प्रकारचा संभाव्य धोका ग्रामीण भागातील अनेक वस्त्यांना आहे. तेव्हा अशा धोकादायक वस्त्यांची किंवा डोंगरांची पाहणी अथवा सर्वेक्षण शासन करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे(पाटील) : सभापती महोदय, दुर्दैवी घटनेतील माळीण गावाचे पुनर्वसन शेजारील मौजे झांजळेवाडी येथे करण्यासाठी जमीन पाहण्यात आली होती व जिऑलॉजिकल सर्व्हे विभागाकडून तेथील जमिनीची पाहणी देखील करण्यात आली होती. परंतु, माळीण गावातील लोकांना ही जागा पसंत नव्हती. त्यामुळे त्यांनी शासनाला विनंती केली की, आम्हाला अन्यत्र जागा उपलब्ध करून द्यावी. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी कशाळवाडी व आडिवरे या दोन जागांची पाहणी केली व त्या जागा निवडण्यात आल्या. तेथे या गावाचे पुनर्वसन करण्याचे ठरविण्यात आले आहे. माळीण गावात मोठी दुर्घटना घडल्यामुळे फार मोठी हानी झाली. आपण रेस्क्यु ऑपरेशन करणाऱ्या जवानांचे स्वागत केले पाहिजे. त्यांनी फार चांगले काम केले. पुनर्वसन अधिनियमानुसार या गावांना सवलती मिळणार काय, अशी आपली मागणी आहे. या दुर्घटनेमध्ये 151 लोक दबले गेले, मृत पावले. यापैकी 146 लोकांचे मृतदेह मिळाले, तर 5 जणांचे सांगाडे मिळाले. या दुर्घनाग्रस्त गावाचे पुनर्वसन करण्यासाठी पुनर्वसन कायद्यामध्ये तरतूद नसली तरी आपण पुनर्वसन कायद्यानुसार पुनर्वसन करणार आहोत. पुनर्वसन कायद्यानुसार प्रकल्पबाधित गावांना ज्या सोयी-सवलती दिल्या जातात, ज्या 18 नागरी सुविधा दिल्या जातात, त्या सर्व सुविधा या गावांना दिल्या जातील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी लेखी निवेदनातील पान क्र.2 वरील "ब"कडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, "मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून 40 मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रू.5.00 लाख या प्रमाणे रू.2.00 कोटी इतकी रक्कम वाटप करण्यात आली असून उर्वरित 111 मयत वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रूपये.5.50 कोटीचा निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे." सदर विचाराधीन बाबीची कधी पूर्तता करण्यात येणार आहे आणि तातडीने मृत वारसांच्या कुटुंबीयांना मदत देण्यात येणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, उर्वरित वारसांना त्यांचे सक्सेशन सर्टिफिकेट अजून न आल्यामुळे त्यांना पैसे देण्यात आलेले नाही. या दुर्दैवी घटनेमध्ये संपूर्ण कुटुंबीयच उद्ध्वस्त झालेली आहेत. त्यांचे वारस देखील शिल्लक राहिलेले नाहीत अशी परिस्थिती आहे. ज्यांच्याकडून अधिकृत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत त्या सर्वांना आम्ही पैसा दिलेला आहे. काही जणांकडून सक्सेशन सर्टिफिकेट आलेले नाही. ते प्रमाणपत्र न्यायालयाकडून येणे आवश्यक आहे. जस जसे सक्सेशन सर्टिफिकेट येईल तस तसे त्या सर्वांना मुख्यमंत्री निधीतून आर्थिक मदत देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माळीण गावाचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. तेव्हा शासन या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी कार्यक्रम निश्चित करणार आहे काय ? अशाच प्रकारची दरड रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यामध्ये पडली होती. गेली दहा वर्षे त्या गावाचे पुनर्वसन होत आहे. तेव्हा माळीण गावाचे पुनर्वसन दोन-तीन वर्षात होईल अशी आमची माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे. तेव्हा या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी शासन निश्चित असा कालावधी ठरविणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे(पाटील) : सभापती महोदय, यासंबंधी निश्चित निर्णय घेण्यात येईल. या गावाचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने दोन्ही गावांची जमीन ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या गावांची जमीन ताब्यात आल्यानंतर लोक तेथे येण्यापूर्वी शाळा, पिण्याचे पाणी, अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय, स्मशानभूमी, गुरांना राहण्यासाठी जागा, इलेक्ट्रिफिकेशनची व्यवस्था, गावातील कॉंक्रीट रस्ता इत्यादी सर्व सुविधा प्लॉट ताब्यात मिळाल्यानंतर दोन वर्षाच्या आत पुरविण्यात येतील.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटनेच्या अगोदर नासाने माळीण येथे अतिवृष्टीमुळे भूस्खलन होऊन दरडी कोसळण्याची शक्यता वर्तविली होती काय ? तशा प्रकारची माहिती आता समोर आलेली आहे. तसेच येथील आसपासची गावे दरडी कोसळून बाधित होण्याची शक्यता आहे काय, असा देखील माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे. नासाने ग्लोबल वॉर्मिंगसंबंधी दिलेल्या इशाऱ्याची शासनाने दखल घेतली आहे काय ? अशा प्रकारची घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यासाठी शासनाने टास्क फोर्स नेमला आहे काय ? या दुघर्टनेत सापडलेल्या नागरिकांसाठी जवानांनी उत्तम काम केले आहे. जवानांच्या कष्टामुळे मृतांना एकत्रितपणे तिलांजली देणे शक्य झाले. त्या जवांनांनी आपले कर्तव्य पार पाडले असले तरी मंत्री महोदयांनी त्या जवानांची दखल घेतली पाहिजे. तशी दखल आपण घेणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, अचानक अशी आपत्ती कोसळली होती. घटनास्थळी मुसळधार पाऊस पडत होता. मातीच्या ढिगाऱ्या खाली संपूर्ण गाव गाडले गेले होते. तिसऱ्याच दिवशी गाळ उपसण्याच्या कामाला सुरुवात झाली. तो पर्यंत मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली होती. मृतदेह काढणे हे एक आव्हान होते. तेथील ढिगारा उपसत असताना तेथे पाणी देखील वाहून जात होते. सर्व ठिकाणी चिखल झाला होता. लोकांपर्यंत गाड्या जाऊ शकत नव्हत्या. जेसीबी मशीन जाऊ शकत नव्हते. अशा स्थितीत आपल्या जवानांनी चांगले काम केले असून त्याची नोंद राज्य शासनाने निश्चितपणे घेतली आहे.

सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नासंबंधी मी सांगू इच्छितो की, तसा काही रिपोर्ट असेल असे मला वाटत नाही. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या मार्फत काही अहवाल आलेले आहेत. त्यातील एका पट्टयामध्ये भूस्खलनाची शक्यता त्यांनी नाकारलेली नाही. त्यामुळेच जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, तज्ज्ञांकडून पाहणी करून अशी शक्यता कोणत्या गावापर्यंत वर्तविली आहे, हे तपासून पहावे. तसेच आपल्याकडे कोणताही रिपोर्ट आला तरी गावांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. तेव्हा त्यासंबंधी सर्व बाजूंनी अभ्यास करण्यात येईल व भविष्यकाळामध्ये जे गाव जिऑलिजिकलच्या दृष्टीने धोक्याचे आहे त्याचा अंदाज घेऊन योग्य ते पाऊल राज्य शासनातर्फे नक्कीच टाकण्यात येईल.

....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :अमरावती ते जळगाव व जळगाव ते गुजरात हद्दीपर्यंतच्या चौपदरीकरणाचे काम रखडल्यामुळे अपघातांमध्ये वाढ होणे

**मु. शी.** :अमरावती ते जळगाव व जळगाव ते गुजरात हद्दीपर्यंतच्या चौपदरीकरणाचे काम रखडल्यामुळे अपघातांमध्ये वाढ होणे या संबंधी श्री गोपीकिसन बाजोरिया व ॲड.अनिल परब वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकरण संस्था ): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राष्ट्रीय महामार्ग क्रं 6 वरील अमरावती ते जळगाव व जळगाव ते गुजरात हद्दीपर्यंतचे चौपदीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.ए.आय.) मार्फत सुरु करण्यात येणे, उपरोक्त कामाचा सवलत करारनामा दिनांक 6 जुन,2012 रोजी मे.एल ॲन्ड टी. ईस्ट वेस्ट टोल वे लि., चैन्नई यांच्यासमवेत करण्यात येणे, मात्र संबधित कंपनीने एन.एच. ए.आय.ला दिनांक 3 ऑक्टोबर, 2013 रोजी काम बंद करण्याची दिलेली नोटीस, यानंतर काम पूर्णपणे बंद असणे, नागपूर येथील डिसेंबर-2013 च्या हिवाळी अधिवेशनात एक महिन्यात प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन देण्यात येऊनही सदर प्रश्न प्रलंबित राहिल्याने मुंबई येथील 2014 च्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात येणे, आजपावेतो शासनाकडून या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, उपरोक्त महामार्गाच्या चौपदरीकरणांचे काम रखडल्याने सतत वाढत असलेली अपघातांची संख्या, दिनांक 12 ऑगस्ट, 2014 रोजी एन.एच.नं.6 महामार्गावर वाशिंबा (अकोला) जवळ कंटेनरच्या अपघातात सहा जणांचा जागेवरच बळी जाणे, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शासनाने यावर त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रविण पोटे-पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, राष्ट्रीय महामार्ग क्र.6 संबंधी चौपदरीकरणाची अतिशय अत्यंत महत्त्वाची योजना आहे. अमरावती पासून ते जळगाव पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र.6 ची अत्यंत वाईट अवस्था झाली आहे. दरवर्षी 300 ते 400 लोक या महामार्गावर मृत्युमुखी पडतात. गेल्या 2-3 वर्षात 2000 लोक मृत्यू पावले असून 3 ते 4 हजार जणांचे अपघात झाले. या सर्व बाबींचा विचार करून राज्य व केंद्र शासनाने अमरावती पासून ते जळगाव पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र.6 चौपदरी करण्याची भूमिका घेतली आणि सर्व प्रक्रिया देखील पार पाडली. दिनांक 6.6.2012 रोजी एल.अँड टी.कंपनी बरोबर करारनामा देखील करण्यात आला. सदर करारनामा केल्यानंतर एल अँड टी.कंपनीने कोणत्याही प्रकारच्या कामाला सुरूवात केली नाही. उलट एनएचएआय म्हणजे केंद्र शासनाकडून जास्त निधी मिळावा किंवा करारनाम्यामध्ये सूट मिळावी या हेतूने कंपनीने सर्व काम प्रलंबित ठेवले. या कंपनीने काम न केल्यामुळे केंद्र शासनाने दिनांक 19.9.2014 रोजी सदर कंपनी बरोबरचा करारनामा रद्द केला. त्यांचे डिपॉझिट वगैरे सगळे काही जप्त केले. सर्व करारनामे रद्द केले. केंद्र व राज्य शासन तसेच एनएचएआय यांची चौपदरी रस्ता व्हावा अशी इच्छा आहे. त्यामुळे माझा एकच प्रश्न आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया .. ..

एनएचएआय, राज्य शासन व केंद्र शासन यांच्यामध्ये समन्वय नाही. यासंदर्भात बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावला जाणार आहे काय ?

श्री. प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी फार महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित केल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. या रोडवर मोठया प्रमाणात अपघात होतात ही वस्तुस्थिती आहे. हा प्रोजेक्ट केंद्र सरकारचा असून महाराष्ट्र शासन या रोडवर केवळ मॉनेटरींग करण्याचे काम करीत आहे. एल अँड टी कंपनीने जेव्हा हा प्रोजेक्ट सोडला त्व्हा या कंपनीकडून एक टक्का अनामत रक्कम म्हणजे 45 कोटी रुपये जप्त करण्यात आले. हा प्रश्न विचारत असतांना सन्माननीय सदस्यांनी जवळपास उत्तर सुध्दा दिलेले आहे. केंद्रीय मंत्री, एनएचआयचे अधिकारी यांच्या बरोबर या विषयाच्या संदर्भात बैठक आयोजित केली जाईल व या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांना सुध्दा बोलावण्यात येईल. या बैठकीमध्ये या विषयाच्या संदर्भात लवकरात लवकर मार्ग काढला जाईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नॅशनल हायवे क्रमांक 6 चे गुजरात ते सोनगड व सोनगड ते जळगाव तसेच जळगाव ते अमरावती असे तीन फेज आहेत. एलअँडटी या कंपनीने या रस्त्याचे काम सोडले असेल तर या रस्त्याच्या संदर्भात शासन किती दिवसात एजन्सी नेमणार आहे, या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष केव्हा सुरुवात होईल ?

श्री. प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे मी अगोदरच उत्तर दिले आहे. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी, राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच एनएचएआयचे अधिकारी यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल व या बैठकीमध्ये आपल्याला सुध्दा बोलावण्यात येईल. या रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरु होण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या रस्त्यावरील अपघातात राज्यातील जवळपास दोन हजारापेक्षा अधिक लोक मृत पावले असून तीन हजारापेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत असे या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

ठिकाणी सन्माननीय सदस्य सांगत असून मंत्री महोदय सांगत आहेत की, आमचे काम केवळ समन्वयाचे आहे. त्यामुळे कृपया आपण असे काही करु नका. आमची अपेक्षा एवढी आहे की, या एनएचएआयच्या संदर्भात तत्काळ बैठक लावण्याची आवश्यकता आहे. एल अँड टी कंपनीचा करार रद्द झाला असेल तर शासनाने यामध्ये तत्काळ मध्यस्थी करण्याची गरज आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, एलअँडटी कंपनीने या रस्त्याचे काम सोडण्याचा निर्णय घेतला होता. मोठया कामाचे नव्याने टेंडर काढण्याची प्रक्रिया कठीण असते त्यामुळे या कंपनीने काम सोडू नये, यासाठी राज्य शासनाने बरेच प्रयत्न केले होते. परंतु शेवटी एलअँडटी कंपनीने टेंडर सोडले त्यावेळेस त्यांच्याकडील 45 कोटी रुपयांचे सिक्युरीटी डिपॉजिट जप्त करण्यात आले होते. हा विषय केंद्र सरकारचा असल्यामुळे एनएचएआयचे नवीन टेंडर काढण्यासाठी पाठपुरावा करणे एवढेच काम राज्य सरकारचे आहे. सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी शासन सहमत आहे परंतु हे काम केंद्र शासनाचे असल्यामुळे या कामाचा पाठपुरावा करणे एवढेच काम राज्य शासनाच्या हाती असून या संदर्भात राज्य सरकार पाठपुरावा करीत आहे. आता नवीन टेंडरसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे काम शासन करीत आहे, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

.....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे काम करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे काम करण्याची आवश्यकता, यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यात विशेषत: चंद्रपूर हा धान पिकाचा जिल्हा म्हणून ओळख असणे, सदर धान पिकाला पाण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात लागणे, परंतु जिल्ह्यात 444 मा.मा. तलाव असून सदर तलावांची सिंचन क्षमता कमी झालेली असणे, त्यामुळे सदर तलावातील खोलीकरण, तुरुब दुरुस्ती, येव्याची, पाटाची कामे करणे अत्यंत आवश्यक झाले असणे, परिणामी या वर्षी मा.मा. तलाव नादुरुस्त असल्यामुळे 40 टक्केही पाणीसाठा न भरला जाणे, त्यामुळे जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी उपलब्ध न झाल्यामुळे पिकांचे ऐन गर्भाशयावर नुकसान होणे, त्याकरिता जिल्ह्यातील मा.मा. तलाव दुरुस्ती, कॅनलची व येव्याची कामे हाती घेवून त्याकरिता तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, अद्याप सदरहू कामे न झाल्याने शासनाविरुध्द शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली चीड, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर त्वरित करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री. विजय शिवतारे ( जलसंपदा व जलसंधारण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जिल्हा परिषदेकडे 1678 तलाव असून त्यापैकी 205 व 487 तलावांचे गाळ काढण्याचे काम प्रस्तावित आहे, अशी माहिती लक्षवेधीच्या निवेदनात देण्यात आली आहे. गाळ काढून तलावांची दुरूस्ती होऊ शकत नाही तर फिडर कॅनॉल, डिस्ट्रीब्यूशन कॅनॉल तसेच इतर दुरूस्त्यांची कामे घेतली जाणार आहेत काय ? 51 माजी मालगुजारी तलाव असून त्यापैकी केवळ 14 माजी मालगुजारी तलावाचे काम गाळ काढण्याचेच आहे. बाकीच्या तलावाच्या संदर्भात घोषणा झालेल्या आहेत. बाकीच्या तलावाच्या संदर्भात एस्टीमेट मंजूर झाले असून कामांना सुरूवात झालेली नाही त्यामुळे ही कामे सुरु केली जातील काय ? विदर्भ विकास महामंडळाकडे 13.43 कोटी रुपये असून त्यांचा उपयोग चंद्रपूर जिल्हयातील माजी मालगुजारी तलावांची कामे करण्यासाठी करण्यात येणार आहे. हे पैसे चंद्रपूर जिल्हयातील माजी मालगुजारी तलावाच्या दुरूस्तीसाठी वितरित करण्यात येणार आहेत ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, माजी मालगुजारी तलावांच्या दुरूस्तीचा विषय हा अतिशय महत्वाचा आहे. माजी मालगुजारी तलावाच्या संदर्भात इतर ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्यामध्ये दुरूस्त्या केल्या जाणार आहेत. माजी मालगुजारी तलाव दुरूस्त करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच संपूर्ण जीर्ण झालेल्या तलावांची दुरूस्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. हे सर्व तलाव अधिसूचित करावे, अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जर हे तलाव अधिसूचित केले तर या संदर्भात शासनाचा अधिसूचितेचा जो अधिनियम आहे त्यातील अट क्रमांक 2 अनुसार पाणी पट्टी भरावी लागेल. यासंदर्भात शासनाचे धोरण अतिशय क्लिअर आहे. हे संपूर्ण तलाव शासनाच्या माध्यमातून दुरूस्त केले जातील. या संदर्भात व्यवस्थापन करण्यासाठी पाणी वापर संस्था स्थापन कराव्या लागणार आहेत. त्यांना पाणी पट्टी देण्याची आवश्यकता लागणार नसून यासंदर्भात शासनाने निर्णय घेतले आहेत. यासाठी पाणी वापर संस्था तयार करणे अतिशय आवश्यक आहेत. पाणी वापर संस्था निर्माण झाल्यानंतर माजी मालगुजारी तलावांची दुरूस्ती केली जाईल व पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून त्यांच्याकडे या तलावांचे व्यवस्थापन हँडओव्हर केले जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माजी मालगुजारी तलाव अधिगृहीत केले जातील अशी माहिती या ठिकाणी मंत्री महोदयांनी दिली आहे. माजी मालगुजारी तलाव हे विस्तार हक्काने देण्यात आले असून या तलावावर शासनाला अधिकार गाजवता येणार नाही तसेच शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी घेता येणार नाही असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे. त्यामुळे हे तलाव अधिगृहीत करता येणार नाहीत. या ठिकाणी पाणी वाटप संघटना तयार करावयाची असेल तर त्यांना पैशाची गरज पडणार आहे. जर या संस्थांना पाणीपट्टी मिळणार नाही तर त्या संस्था कशा काय काम करु शकतील ? सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे जे तलाव विस्तार हक्कावर आहेत अशा तलावांची दुरुस्ती शासनानेच करणे आवश्यक असून या तलावांची दुरुस्ती करताना अशा प्रकारच्या अटी लादता येणार नाहीत.

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, या मालगुजारी तलावांच्या कामाच्या दुरुस्तीसाठी जो काही खर्च येणार आहे तो खर्च शासनच करणार असून यासंदर्भात मान्यताही झालेली आहे. पाणी वापर संस्था स्थापन करावयाच्या असून त्यांच्याकडून पैसे घ्यावयाचे नाही. पाणी वापर संस्था स्थापन केल्यानंतर त्याच्याकडून पाणी पट्टी वसूल केली जाईल, अशी आपल्या मनात भीती आहे परंतु तसे होणार नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पाणी वापर संस्थांनी 40 टक्के पैसे खर्च करणे आवश्यक असल्याची अट घातली जाणार आहे. या संस्थाकडे पाणीपट्टी नसल्यामुळे या संस्था 40 टक्के पैसे कोठून आणणार आहेत ? माजी मालगुजारी तलावाच्या संदर्भात पाणी वाटप संस्था स्थापन करण्याची गरज नाही. या विषयाच्या संदर्भात आपण बैठक आयोजित केली तर आम्ही यासंदर्भात आपल्याला सहकार्य करण्यास तयार आहोत.

यानंतर श्री. अजित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री .विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या सांगत आहेत त्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील मालगुजारी तलाव हे 250 ते 300 वर्षापूर्वीचे आहेत. गौंड राजाने ते तलाव बांधले होते. त्यावेळी देखील पाणी व्यवस्थापन होते. आता त्याठिकाणी पाणीपट्टी द्यावी लागणार नाही.. महाराष्ट्र शासन पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायलयाने शासनाचे अपील फेटाळले. तेव्हा पाणीपट्टी आकरण्याचा प्रश्नच येत नाही. फक्त ते व्यवस्थित चालले पाहिजे एवढाच प्रश्न आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :राज्यातील विविध भागात डेंग्युच्या साथीचा प्रसार रोखण्यात शासनास आलेले अपयश

**मु. शी.** :राज्यातील विविध भागात डेंग्युच्या साथीचा प्रसार रोखण्यात शासनास आलेले अपयश यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री शरद रणपिसे, जगन्नाथ शिंदे, संदीप बाजोरिया, अनिल भोसले, नरेंद्र पाटील, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, हेमंत टकले, डॉ.अपूर्व हिरे, सर्वश्री रामहरी रुपनवर, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, अमरसिंह पंडित, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड. निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुभाष झ ांबड. ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सर्वत्र व विशेषत: मुंबई, ठाणे, नाशिक, सोलापूर व पुणे इ. शहरात डेंग्यूचे पेशंट मोठ्या प्रमाणात आढळून येणे, त्याचप्रमाणे टायफाईड, मलेरिया व लेप्टोस्पायरोसिसचे रुग्ण देखील आढळून येणे, आतापर्यंत डेंग्यूमुळे 200 पेक्षा जास्त नागरिक मृत्युमुखी पडणे, तर 6,000 पेक्षा जास्त नागरिक वेगवेगळया रुग्णालयात उपचार घेत असल्याचे माहे नोव्हेंबर-2014 च्या सुमारास निदर्शनास येणे, या आजाराने राज्यात आपला विळखा अधिक घट्ट केलेला असणे, डेंग्यूची साथ नियंत्रणात आणण्यासाठी मुंबई पालिकेने डेंग्यूच्या अळ्या शोधून त्या नष्ट करण्याची मोहीम हाती घेणे, तसेच धूर आणि औषध फवारणी करुन डासांची नायनाट करण्याचा प्रयत्न करणे, परंतु अद्यापही साथ आटोक्यात येत नसणे, डेंग्यूचे उच्चाटन करण्यासाठी वापरण्यात येणारी औषधेच

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

बनावट असल्याचे आढळणे, डेंग्यू आणि मलेरियाच्या आजारासंदर्भात जनजागृती करण्यासाठी छापण्यात आलेली अडीच लाख पोस्टर महापालिकेच्या मुद्रणालयात न छापता खाजगी छापखान्यातून छापून घेण्यात येणे, औषधांच्या खरेदीबरोबर पोस्टर छपाईत पालिका अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणे, शासनास राज्यातील विविध भागात डेंग्यूच्या साथीचा प्रसार रोखण्यास येत असलेले अपयश त्यामुळे राज्यातील नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने त्वरित करावयाची उपाययोजना तसेच राज्य शासनाने औषधांच्या व पोस्टर छपाईतील भ्रष्टाचारास जबाबदार असणाऱ्या दोषींवर करावयाची कारवाई व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.दीपक सावंत ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आरोग्याच्या प्रश्नाविषयी चांगला अभ्यास असणारे आमचे सहकारी सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री झाले त्याबद्दल आम्हाला आनंद झाला आहे. आमच्या त्यांना मनापासून शुभेच्छा आहेत तसेच त्यांच्याकडून अपेक्षा देखील वाढलेल्या आहेत.

सभापती महोदय, निवेदनात नमूद केले आह की, ".. या कालावधीत विविध साथीच्या आजाराने 67 हजार 168 रुग्ण आढळून आले त्यापैकी 164 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे." माझा प्रश्न आहे की, दरवर्षी असे प्रकार होत असल्यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. जे रुग्ण मृत्यू पावले त्यांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत काय, त्या संदर्भात ठोस पावले उचलण्यात आली नाहीत काय, या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ? आपण पोलियोसारखी प्रतिबंधक लस तयार केली. डेंग्यूच्या लसीसंबंधी फ्रान्समध्ये संशोधन सुरु आहे. त्या संदर्भात केंद्र सरकारशी विचार करुन राज्य शासन काही पावले उचलणार आहे काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी राज्य शासन आणि महानगरपालिकेडून योग्य पावले उचलण्यात आली की नाही आणि या आजाराची लस आहे काय असे दोन प्रश्न विचारले. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचा आवाका मुंबई, ठाणे, नाशिक, सोलापूर आणि पुणे या भागातील आहे. 164 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, या आजारामध्ये मलेरिया, डेंग्यू, टायफाईड आणि चिकनगुनिया या चार प्रकारच्या आजारांमध्ये त्यांचा मृत्यू झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईमध्ये डेंग्यू आजाराबाबत भीतीचे वातावरण होते. या आजारांबाबत राज्य शासनाने आणि महानगरपालिकांनी काळजी घेतलेली आहे. उपाययोजना करण्यामध्ये राज्य शासन आणि महानगरपालिका कमी पडलेली नाही हे मी आवर्जून सांगतो. मी या संदर्भात माहिती घेतली असता मला असे समजले की, सन 2011-12, 2012-13, 2013-14 या कालावधीत या साथीचा प्रादूर्भाव झाला. मलेरियाचा प्रादूर्भाव कमी झालेला आहे. डेंग-1 आणि डेंग-2 या आजाराचे हवामानाच्या बदलामुळे म्युटेशन होते की नाही याचा देखील अभ्यास सुरु आहे. म्युटेशन झालेले नाही ही चांगली गोष्ट आहे. म्युटेशन झालेले नसल्यामुळे हा आजार काही काळापुरता मर्यादित होता. त्यामुळे तो संपला. राज्य शासन उपाययोजना करण्यात कुठेही कमी पडलेले नाही हे मी येथे सांगू इच्छितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, या आजाराबाबत फ्रान्समध्ये संशोधन सुरु आहे हे खरे आहे. पण अजून संशोधन पूर्ण झालेले नाही. डेंग्यु आजाराबाबतची ती लस किती प्रभावशाली आहे याचा रिपोर्ट अजून आलेला नाही. तो रिपोर्ट आल्यानंतर केंद्र सरकारशी संपर्क साधून योग्य ती पावले उचलण्यात येतील.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प 29 हजार कोटी रुपयांचा आहे. आज डेंग्यूमुळे 12 जणांचा बळी गेलेला आहे. मुंबईत डेंग्यूचे 400 संशयित रुग्ण आढळून आले आहेत असे अहवालात नमूद केलेले आहे. सन 2011-2012 मध्ये स्थायी समितीमध्ये धुम्रफवारणी करणारे केमिकल बरोबर नाही अशी चर्चा झाली. असे असताना सन 2012 मध्ये असे काय घडले, लॅबमधून काय रिपोर्ट आले की, स्थायी समितीवर नव्याने विराजमान झालेल्या अध्यक्षांनी ते केमिकल पुन्हा मान्य केले आणि ते आपल्याला घ्यावे लागले ? ठाणे महानगरपालिकेमध्ये डेंग्यू आजारावर चर्चा झाली त्यावेळी स्थायी समितीच्या अध्यक्षांनी सांगितले की, आपण जे फवारणीसाठी औषध वापरत आहात ते मी प्यायलो तरी मला आता काही होणार नाही. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे त्याची शासन चौकशी करणार काय ? मंत्री महोदयांना या विषयाची चांगली माहिती आहे. मी संदर्भात अनेकदा आवाज उठविला आहे. एखाद्या महानगरपालिकेकडे निधी नसेल तर समजू शकतो. परंतु मुंबई महानगरपालिकेचे बजेट 29 हजार कोटी रुपयांचे आहे. मुंबई महानगरपालिका सुरुवातीला हे केमिकल बरोबर नाही असे सांगत आहे आणि सन 2013 मध्ये तेच केमिकल चांगले आहे असे सांगत आहे. या खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे 400 जण ॲडमिट आहेत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या आजारामुळे के.ई.एम.रुग्णालयातील दोन डॉक्टरांचा मृत्यू झालेला आहे. चुकीची फवारणी केल्यामुळे काही जणांचा मृत्यू झालेला आहे. तेव्हा ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर शासन कोणती फवारणी करणार आहे ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांच्याकडून मला हाच प्रश्न अपेक्षित होता आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यास मला आनंद वाटेल. नीता पॉल कंपनीने उत्पादित केलेले पायरॅथॅक एक्स्ट्रक्ट कीटक नाशक हे केमिकल मे.युनिव्हर्सल ऑर्गेनिक कंपनीने 2013 मध्ये 25 हजार लीटर्स पाठवले होते. परंतु त्या केमिकलने 80 टक्के डास मरत नसल्यामुळे ते केमिकल परत पाठविण्यात आले होते. तसेच त्या कंपनीने या केमिकलचा उशिरा पुरवठा केला होता. तेव्हा त्या कंपनीला कळविण्यात आले की, त्यांचे केमिकल बरोबर नाही म्हणून त्या कंपनीवर प्रयोगशाळा तपासणी शुल्क म्हणून 64 लाख 88 हजार 375 इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला. तसेच केमिकलचा उशिरा पुरवठा केला म्हणून 50 लाख 85 हजार हजार 500 रूपयांचा दंड करण्यात आला.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहासमोर चुकीची माहिती येऊ नये म्हणून सांगू इच्छितो की, सन 2012-2013 मध्ये स्थायी समितीच्या बैठकीत हे औषध बोगस असल्याची चर्चा झाली होती. त्याचा दाखला देण्यात आला होता.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत. आपण त्या कंपनीवर दंड आकारला, त्यांचा पुरवठा रद्द केला. दिनांक 22 मार्च 2013 नंतर पुन्हा 1 लाख 5 हजार लीटर औषधाची खरेदी करण्यात आली. तेव्हा ज्यांच्यावर कारवाई करायची होती त्यांच्यावर दंडरूपाने कारवाई झालेली आहे. प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्याकरिता महानगरपालिकेला जो भुर्दंड पडला तो त्यांच्याकडून वसूल केलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी पोस्टर्स छापणे हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण या आजाराच्या बाबतीत जनजागृती होणे आवश्यक आहे. झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये मलेरिया आजार जसा आढळतो तसाच डेंग्यू आजार मध्यम आणि उच्चवर्गीयांमध्ये आढळतो. त्यामुळे जनजागृती करण्यासाठी पोस्टर्स छापणे अत्यंत आवश्यक होते. म्हणूनच मागील बाजूला गोंद असलेले व सहज चिकटविले जातील असे 2 लाख पोस्टर्स छापले होते. त्यापोटी 36 लाख रुपये खर्च आला.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. त्यांनी संबंधितांना दंड आकारण्याबाबत जे काही सांगितले तो सर्व भाग औषध फवारणी नंतरचा आहे. 2011-12 मध्ये समितीने ही औषधी खरेदी न करण्याचे ठरविले होते आणि नंतर 2013 मध्ये तीच औषधी खरेदी केली. या निमित्ताने मी विचारतो की, ती औषधी कोणत्या कंपनीची होती आणि त्यांचे वितरक कोण आहेत ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझ्या उत्तरात सुस्पष्ट सांगितले की, फवारणी औषधांचा साठा आल्यानंतर तो तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविला जातो अशी पध्दत आहे. फवारणी केल्यानंतर किती डास मरतात हे प्रयोगशाळेत तपासले जाते. 80 टक्क्यांपेक्षा जास्त डास मेले तरच ते औषध ग्राह्य मानतो, अन्यथा ग्राह्य मानत नाही. खरेदी केलेल्या औषधांच्या फवारणीमुळे डास मरत आहेत. त्या औषधांचा डेंग्यू साथीवर नियंत्रण मिळविण्यात मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचा मतदारसंघ शहरापुरता असल्यामुळे बहुतेक त्यांनी केवळ महानगरपालिकेत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबतचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, सार्वजनिक आरोग्य मंत्री हे केवळ शहरी भागाचे नसून ग्रामीण भागाचे मंत्री असतात, याची जाणीव त्यांना असावयास पाहिजे. या निमित्ताने मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, मुंबईप्रमाणेच रत्नागिरीमध्ये सुध्दा डेंग्यू आजाराची साथ जोरात पसरली आहे. रत्नागिरी मधील फणसवळे गाव आणि आंबेरकर वाडीत डेंग्यूचे 150 रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी 57 रुग्ण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती हुस्नबानू खलिफे....

सामान्य रुग्णालयात दाखल असून इतर रुग्ण खाजगी रुग्णालयात दाखल आहेत. या साथीवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकार ज्या उपाययोजना करीत आहे त्या केवळ शहरी भागापुरत्या असल्याचे दिसून येते. सर्वात दुःखाची गोष्ट अशी की, राज्याची आरोग्य यंत्रणा गाव पातळीवर काम करीत नाही. कारण ज्या भागात डेंग्यूची साथ आहे त्या भागातील वैद्यकीय अधिकारी पळून गेल्याचे आम्हाला रविवारी निदर्शनास आले. मी स्पेसिफिक विचारते की, या साथीवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकार ग्रामीण भागात काय उपाययोजना करीत आहे आणि या साथीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कामाच्या ठिकाणी कसे टिकवून ठेवणार आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी फणसवळे गावातील आंबेरकरवाडीचा प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी रविवारी डेंग्यूचे 40 संशयित रुग्ण आढळले आहेत. उर्वरित 100 रुग्ण हे ताप आलेले आहेत. संशयित असलेल्या 40 रुग्णांची रॅपिड टेस्ट केल्यानंतर त्यांचा डेंग्यू आजार हा पॉझिटीव्ह आला आहे. त्यांचे नमुने एलायझा टेस्टसाठी पाठविले आहेत. तसेच दुसरी बाब अशी की, तेथील आरोग्य अधिकारी पळून गेला असेल तर त्याची निश्चितपणे चौकशी करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनालाच माझा आक्षेप आहे. ठाणे, नाशिक, सोलापूर आणि पुणे या भागाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. परंतु लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात या शहरांबाबतचा कोठेही उल्लेख नाही. हा विसंवाद कशासाठी आहे? अधिकारी जर कामचुकारपणा करीत असतील तर ते कदापि योग्य नाही. डेंग्यू आणि मलेरिया हे दोन्ही आजार त्रासदायक आहेत. या आजारांमुळे बरेच रुग्ण मृत्युमुखी पावले आहेत. या बाबतीत जे अधिकारी निष्काळजीपणे वागत असतील त्यांच्यावर स्पेसिफिक लायबिलिटी डिफाईन करणार काय तसेच त्यांच्यावर कल्पेबल होमीसाईड सारखे गुन्हे दाख्ल करणार काय ? ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी या विषयी औचित्याचा मुद्दा मांडला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या रोगाच्या डायनॅमीक्स मोठ्या प्रमाणावर बदलत आहेत. मी विचारु इच्छितो की, या रोगाचे डायनॅमीक्स बदलण्याचे कारण काय आहे? त्यांनी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे....

असेही उत्तर दिले होते की, पूर्वी छोट्या बालकांना डेंग्यू होत नव्हता. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटले. कारण लहान मुलांना डेंग्यू आणि मलेरिया हा आजार होत होता. माझ्या घरात मलेरियाची केस झाली होती. माझ्या पत्नीला फॅल्सीपेरीयम मलेरिया हा आजार झाला होता. ती आय.सी.यु.मध्ये एक महिना होती. परंतु या आजाराच्या बाबतीत असे चुकीचे विधान येत असेल तर या बाबतीत थोडीशी खबरदारी घ्यावी. मलेरिया आणि डेंग्यू हे आजार पावसाळा आणि ढगाळ वातावरणात होतात. याचाच अर्थ हे आजार विशिष्ट हंगामातच होतात. त्यामुळे पूर्वतयारी म्हणून प्रत्येक नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांना विशिष्ट कामे डिफाईन करुन देणार काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. मी या संदर्भातील जिल्हावार माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री यांनी असे सांगितले होते की, या आजाराच्या डायनॅमिक्समध्ये बदल होत आहेत. खरोखरच डायनॅमीक्स मध्ये बदल होत आहेत. आपण जर पुस्तक रेफर केले तर त्यामध्ये डेंग्यू आजार इन्फन्टना होत नाही असे नमूद केले आहे. पण आता व्हायरसचे म्युटेशन झाल्यामुळे आम्ही एन.आय.व्ही. ला सॅम्पल पुन्हा पाठविले. या सर्व प्रकारामुळे हा आजार एक वर्षाच्या आतील मुलांमध्ये सुध्दा आढळतो असे निदर्शनास आले आहे. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी असे विचारले की, या संदर्भातील अकाऊंटीबिलिटी फिक्स करणार काय ? वास्तविक पाहता या बाबतीत दोन गोष्टी आहेत. ज्यांच्या घरात डेंग्यूचा रुग्ण आढळतो त्याच्या घरात किंवा आजूबाजूच्या परिसरात अळ्यांची उत्पत्ती होत असल्याचे आढळून आले आहे. बरेच जण आपल्या घरात फेन्शुईची झाडे ठेवतात, फ्लॉवर पॉटमध्ये पाणी ठेवतात. अशा वस्तू घरात ठेवू नका अशा सूचना देऊन सुध्दा लोक ऐकत नाहीत. मलेरिया आणि डेंग्यूची केस आढळल्यानंतर त्यांची तपासणी करण्यासाठी जेव्हा अधिकारी येतात तेव्हा त्यांना घरात आणि इमारतींमध्ये प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे डेंग्यू हा आजार नोटीफायेबल डिसीज करता येईल काय याचा विचार करणे आवश्यक आहे. डेंग्यू हा आजार जर नोटीफायबेल डिसीज केला तर अनेक अडचणी आपल्यासमोर आहेत. पण हा रिपोर्टेबल डीसीज व्हावा असा आम्ही प्रयत्न करु आणि अकाऊंटीबिलिटी फिक्स करु.

..4..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांनी विचारलेले प्रश्न अतिशय गंभीर आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या सुरुवातीलाच "राज्यात सर्वत्र" असा उल्लेख असताना त्या विषयी निवेदनात एक ओळ सुध्दा उल्लेख नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि पूर्णपणे माहिती घेऊन पुन्हा सभागृहात चर्चेला आणावी, अशी मी विनंती करतो. पूर्ण माहितीसह या लक्षवेधी सूचनेचे निवेदन आले तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात राज्याची आकडेवारी दिलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात माहे जानेवारी-2014 ते नोव्हेंबर-2014 अखेरपर्यंत 7383 रुग्ण आढळले असून त्यापैकी 72 जणांचा मृत्यू झालेला आहे असे नमूद आहे. हिवताप, टायफाईड, चिकन गुनिया, गॅस्ट्रो इत्यादी सर्व आजारांचे किती रुग्ण आढळले या बाबतची सर्व माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांना अधिकची माहिती हवी असेल तर मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री ज्यावेळी विरोधी पक्षात होते त्यावेळी खूप संवेदनशील होते. परंतु आता ते सत्ताधारी बाजूला असल्यामुळे त्यांच्या संवेदना थांबल्या आहेत. माननीय मंत्र्यांनी रुग्णांची माहिती दिली. परंतु या आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यभरात काय उपाययोजना करणार आहात, या बाबत निवेदनामध्ये एक अक्षरही उल्लेख नाही. आपण या बाबत सविस्तर माहिती निवेदनात समाविष्ट केली तर आम्हाला अधिकची माहिती मिळू शकेल. आपण मुंबई महानगरपालिकेत किती वाहने आहेत, किती यंत्रे ठेवली आहेत हे सांगितले. परंतु राज्यातील साथ आटोक्यात आणण्यासंदर्भातील उल्लेख निवेदनात नाही. शिवाय उपाययोजनांबाबत सुध्दा काहीही उल्लेख नाही. त्यामुळे मी पुनश्च विनंती करतो की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी , जेणेकरुन सविस्तर निवेदनासह ही लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर त्यावर परिपूर्णपणे चर्चा होऊ शकेल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी लक्षवेधी सूचनेचे निवेदन वाचले तर त्यांना या संदर्भात लक्षात येईल की, ही लक्षवेधी सूचना फार मोठी आहे. निवेदनाच्या पहिल्या भागात राज्याचा उल्लेख आहे आणि दुसऱ्या 2/3 भागात मुंबई महानगरपालिकेचा उल्लेख आहे. त्यामुळे याबाबतीतील सर्व गोष्टी या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये दिलेल्या आहेत. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची गरज नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जेवढे प्रश्न विचारले आहेत, तेवढे देखील उत्तर नाही. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नव्यानेच कार्यभार स्वीकारलेले माननीय मंत्री डॉ. दीपक सावंत विरोधी बाजूला असताना अत्यंत पोटतिडकीने हे विषय मांडायचे. हे साथीचे रोग आहेत. राज्यात त्या संदर्भात कोणत्या उपाययोजना करणार आहात, असे त्यामध्ये अनेक प्रश्न आहेत. आपल्याकडे सार्वजनिक आरोग्य खाते आहे. मी मुजोर हा शब्द वापरणार नाही. पण ज्या खूप श्रीमंत महापालिका आहेत, त्या खात्याने दिलेल्या सूचनांची दखल घेतात का, त्याप्रमाणे कार्यवाही करतात का, हा सुध्दा संशोधनाचा विषय होऊ शकेल. आपण लक्षवेधी सूचना देताना मुंबईचा स्पेसिफिक प्रश्न दिला होता आणि त्याबद्दल उत्तर देण्याचा जरूर प्रयत्न केला आहे. संबंध राज्यामध्ये साथीचे रोख फैलावतात, त्याबद्दल उपाययोजना करण्याची आपली तयारी असेल, आम्हाला त्याबाबतची माहिती लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये अपेक्षित आहे. आपले त्यावर नियंत्रण कसे आहे, आपण त्यांची अकांऊटिबिलिटी कशी तपासणार आहत, त्यासाठी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असेल तर त्या संदर्भात सोय कशी करणार आहात, याचा विस्तृत आराखडा लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये अपेक्षित आहे. परंतु, यामध्ये त्याचा उल्लेख नाही. आपण खूप अभ्यासू आहात. आपण विषयाची जाण असणारे आहात. आपण अधिकची माहिती घेऊन पुन्हा आलात तर या लक्षवेधी सूचनेवर सविस्तर उत्तर देऊ शकाल. आपण याचा विचार करावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांना राज्याची माहिती पाहिजे असेल त्यांनी मला प्रश्न विचारावेत मी उत्तरे देण्यास सक्षम आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण आता भाषण केले आहे, ते चुकीचे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी उत्तर देण्यास तयार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण देणार असलेले उत्तर या निवेदनात आले पाहिजे होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पहिल्या भागात उत्तर दिले आहे. दुसऱ्या भागात सर्व गोष्टी आहेत. मी आकडेवारी दिलेली आहे. आपल्याला नेमके काय पाहिजे. आपण प्रश्न विचारावेत. मी उत्तर देण्यास तयार आहे. मी अधिकची माहिती देण्यास तयार आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आपण आकडेवारी दिलेली आहे. परंतु, आपण या संदर्भात कोणत्या उपाययोजना करणार आहात, त्याबाबतची माहिती देणे अपेक्षित होते. आपण त्या संदर्भातील उत्तर दिलेले नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आकडेवारी आमच्याकडे देखील उपलब्ध आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदन अपूर्ण आहे.

(माननीय मंत्री श्री. गिरीष महाजन खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय श्री. महाजन यांना बोलण्याचा अधिकार नाही. कारण ते खाते माननीय मंत्र्यांकडे नाही. माननीय मंत्र्यांना बोलायचे असेल तर त्यांनी उभे राहून बोलावे.

श्री. एकनाथराव खडसे (पाटील) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सविस्तर उत्तर देण्याची तयारी माननीय मंत्र्यांनी दाखविली आहे. यापूर्वी सुध्दा जे प्रश्न विचारण्यात आले, त्यांना सयुक्तिक उत्तरे त्यांनी दिलेली आहेत. सन्माननीय सदस्यांना अधिकची माहिती पाहिजे असेल तर त्यांनी प्रश्न विचारावेत. लक्षवेधी सूचना राखून ठेवणे योग्य नाही. लक्षवेधी सूचना मर्यादित आहे. लक्षवेधी सूचनेचे स्वरूप मर्यादित आहे. आपण राज्याचे प्रश्न विचारावयास लागलात तर त्याला उत्तर देणे कोणालाही शक्य होणार नाही. आपण यावर चर्चा उपस्थित करावी. आपणाला आता प्रश्न विचारावयाचे असतील तर विचारावेत. माननीय मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत. लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांच्या प्रती आदर व्यक्त करून बोलतो. माननीय मंत्री विधानसभेचे विरोधी पक्षनेते राहिलेले आहेत. लक्षवेधी सूचनेची सुरूवात "राज्यात सर्वत्र विशेषतः मुंबई ठाणे, नाशिक सोलापूर पुणे इत्यादी शहरात ..." अशी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....
लक्षवेधी सूचना मर्यादित नाही. लक्षवेधी सूचनेचे निवेदन अपूर्ण आहे. आपण हे कबूल करावे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावता कामा नये. आपण असेच प्रश्न विचारत आलात. कुचेष्टा करून काही साध्य होत नाही. निवेदन अपूर्ण आहे, हीच आमची हरकत आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, आम्हाला उत्तर पाहिजे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी संपूर्ण राज्याकरिता लक्षवेधी सूचना दिली आहे. आपण "राज्यात सर्वत्र मुंबई, ठाणे, पुणे ...." असे नमूद केले आहे. आपण नेहमी म्हणता की, राज्यामध्ये किंवा विशेष अधिक प्रभाव असेल त्या विशिष्ट भागाचा उल्लेख करतो आणि ते लक्षवेधी सूचनेत दिले आहे. निवेदनावरून प्रश्न विचारले जातात. निवेदनात राज्याची माहिती नसेल, फक्त आकडेवारी असेल तर काय प्रश्न विचारावयाचे ? माहिती मर्यादित असेल तर अपेक्षित प्रश्न सन्माननीय सदस्यांना विचारता येणार नाहीत. राज्यामध्ये डेंग्यूचा मोठ्या प्रमाणात प्रादूर्भाव आहे. मुंबईमध्ये त्याकरिता मुंबई महानगरपालिकेने साधने उपलब्ध करून दिलेली आहेत. राज्य शासनाने या संदर्भात महाराष्ट्रात काही केले की नाही, करणार की नाही, याचे उत्तर निवेदनामध्ये नाही. त्यामुळे हे निवेदन अपूर्ण आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे, असे सर्वांचे मत आहे.

श्री. दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, ग्रामीण भागात मलेरियाचे औषध फवारण्याची यंत्रणा आहे. सदर यंत्रणा राज्यभरात आहे का ? अनेक जिल्ह्यात ही यंत्रणा अपुरी आहे. राज्यात या संदर्भातील पदे भरली आहेत का आणि नियमितपणे मलेरियाच्या औषधाची फवारणी सबंध ग्रामीण भागात, नगरपालिका क्षेत्रात होते का ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यभरात साधारणपणे सर्व ठिकाणी डेंग्यू व चिकनगुनिया यासाठी 26 सेंटीनेंटल प्रयोगशाळा आहेत. मुंबईत यासाठी 4 प्रयोगशाळा आहेत. डेंग्यू व मलेरिया याकरिता औषध फवारणीसाठीची आपली यंत्रणा सक्षम आहे की नाही, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रभर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

यासाठी आवश्यक असलेले पायरेथ्रेनॉल औषध उपलब्ध आहे. तसेच, स्कंद माऊंटिंग म्हणजे खांद्यावर मशिन घेऊन जाणारी यंत्रणा उपलब्ध आहे. आपल्या भागात कमतरता असेल तर आपण आम्हाला तसे सांगावे सदरची यंत्रणा आपल्या भागात उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आज नियम 93 च्या सूचना घेणार आहात का ?

**उप सभापती** : आज नियम 93 च्या सूचना घेण्यात येणार नाहीत. विशेष उल्लेखाच्या सूचना देखील घेण्यात येणार नाहीत. आता मी मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी 4.15 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.49 वाजेपासून दुपारी 4.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

**नियम 93 च्या सूचनांबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 93 च्या सूचना आज घेण्यात येणार आहेत का ?

**उप सभापती** : आज 93 च्या सूचना घेण्यात येणार नाहीत. उद्या सर्व सूचना घेण्यात येतील.

-----------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

**उप सभापती** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.यांनी मांडला असून श्री.भाई गिरकर, वि.प.स. यांनी त्यास अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज बुधवार, दिनांक 10 डिसेंबर, 2014 रोजी होणार असून सभागृहातील कामकाज लक्षात घेता राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सर्वसाधारणपणे एकूण 4 तासांचा कालावधी उपलब्ध आहे. त्यातील मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासाठीचा 1 तासाचा कालावधी गृहीत धरल्यास उर्वरित 3 तास चर्चेसाठी उपलब्ध होतील. त्यातील प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदामार्फत माझ्याकडे 10 मिनिटांत पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सदर सुधारणा मंगळवार, दिनांक 9 डिसेंबर, 2014 रोजी टपालखणाव्दारे वितरित करण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी सदस्यांना मिळाली आहे, असे मी समजतो. तसेच, सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या नाहीत, असेही मी समजतो.

आता सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

सभापती महोदय, माननीय राज्यपाल श्री.चे.विद्यासागर राव यांनी दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत अभिभाषण सादर केले. त्यावेळी मी या सभागृहात आभार प्रदर्शनाचा ठराव मांडला होता.

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या मसुद्यात राज्यकर्त्यांनी केलेली कामगिरी व भविष्यातील राज्यकारभाराची दिशा ध्वनीत होत असते. सत्तेत असलेले कुठलेही सरकार हे रिस्पॉन्सिबल आणि रिस्पॉन्सिव्ह अशा दोन्ही पातळ्यांवर यशस्वी ठरले पाहिजे, अशी सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असते. राज्य शासनाला ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्या समस्या शासनाला सोडवाव्या लागतातच या शिवाय राज्याचा विकास अधिक गतिमान कसा होईल, याचाही साकल्याने विचार करावा लागतो.

यानंतर श्री.मा.शिगम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

तळागाळातील शेवटच्या माणसाचा आर्थिक स्तर उंचावून त्याला सामाजिक जीवनामध्ये समान संधी मिळवून देणे ही कल्याणकारी राज्याची संकल्पना आहे. त्यासाठी शासन कशा पध्दतीने प्रशासन राबविते व त्याचा जनतेच्या जीवनावर काय परिणाम होतो हे देखील पहाणे महत्वाचे आहे. दिनांक 12 नोव्हेंबर 2014 पूर्वी या महाराष्ट्रात जनतेने परिवर्तन केले. गेल्या 15 वर्षापासून सत्तेत असलेल्या आघाडी सरकारला मतदारांनी धडा शिकविला. मतदारांमध्ये जागृती निर्माण होऊन त्यांनी भारतीय जनता पार्टी व शिवसेनेला सरकार बनविण्याची संधी दिली. ज्या विश्वासाने मतदारांनी कौल दिला त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही या निर्धाराने या सरकारने आपल्या कामाला सुरुवात केलेली आहे. मागील 15 वर्षात आघाडी सरकारने महाराष्ट्रावर 3 लाख कोटी रुपयाचा कर्जाचा डोंगर उभा करुन ठेवलेला आहे. राज्य कर्जबाजारी करुन ठेवले. तिजोरीत खडखडाट करुन आघाडी सरकारने युती सरकारच्या हातामध्ये तिजोरीच्या चाव्या दिल्या. महसुलातील तूट, अनियमित वीज पुरवठा, अपूर्ण असलेले महत्वाकांक्षी प्रकल्प, पायाभूत सोयीसुविधा, पारदर्शक व कार्यक्षम प्रशासन अशा प्रकारची अनेक आव्हाने या युती सरकार समोर आहेत. किमान शासन व लोकाभिमुख प्रशासन हे सरकारचे ध्येय असून नागरिकांना पारदर्शक रीतीने कालबध्द सेवा देण्यास शासन कटिबद्ध आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सविस्तर बोलण्यासाठी थोडा वेळ लागणे अपरिहार्य आहे. तरी देखील त्यामधील ठळक बाबी या सभागृहाच्या माध्यमातून मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदय, ज्या निर्णयाकडे महाराष्ट्रातील जनतेचे गेली 15 वर्षे लक्ष लागले होते तो निर्णय या युतीच्या शासनाने घेतलेला आहे. पूर्वीचे सरकार दरवर्षी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्या निर्णयाचा उल्लेख करीत होते. परंतु कृती मात्र करीत नव्हते. अरबी समुद्रातील बेटावर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी प्रत्येक अधिवेशनामध्ये मागणी होत होती. प्रत्येक अधिवेशनामध्ये यासंबंधीचे प्रश्न उपस्थित होत होते आणि आघाडी सरकार मात्र थातूरमातूर आश्वासने देऊन तो प्रकल्प रेंगाळत ठेवत होते. पण युतीचे सरकार स्थानापन्न झाल्यानंतर त्या सरकारने लगेच अरबी समुद्रातील बेटावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकास मंजुरी दिली आणि त्या स्मारकाच्या संदर्भात केन्द्रातील पर्यावरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

मंत्रालयाची संमती घेतली. हे सरकार येण्यापूर्वी राज्यात आघाडी सरकार होते आणि केन्द्रातही काँग्रेसचे सरकार होते. त्या काळात केन्द्रीय पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळावयास पाहिजे होती. परंतु ती मिळविण्याच्या बाबतीत आघाडी सरकारने दुर्लक्ष केले. त्यामुळे हा प्रकल्प प्रलंबित राहिला. छत्रपती शिवरायांच्या नावाने हे राज्य सरकार स्थापन झालेले असून या सरकारने छत्रपती शिवरायांच्या स्मारकासंबंधीचा पहिला निर्णय घेतलेला आहे. त्या बाबतीत केन्द्रीय पर्यावरण मंत्रालयाची परवानगी देखील घेतलेली आहे. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाच्या भूमिपूजनाची 19 फेब्रुवरी 2015 अशी टेण्टेटिव्ह तारीख जाहीर केलेली आहे. सत्तेवर येऊन 40 दिवसाच्या आत हा निर्णय युती सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, इंदू मिल येथील जमिनीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित स्मारकास आधीच केन्द्र सरकारकडून मंजुरी मिळालेली आहे. हा प्रतिष्ठित प्रकल्प,तसेच ट्रान्स हार्बर लिंक यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प केन्द्र सरकारच्या मदतीने कालबद्ध रीतीने पूर्ण करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या संदर्भात केन्द्रीय पर्यावरण मंत्र्यांसोबत नुकतीच एक बैठक देखील घेण्यात आलेली आहे. तसेच आदरणीय कै. बाळासाहेब ठाकरे यांचे देखील मुंबईमध्ये भव्य स्मारक करण्याच्या निर्णय या सरकारने घेतला असून त्या संदर्भात समिती गठीत करुन त्या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केलेली आहे.

सभापती महोदय, तंत्रज्ञान क्षेत्राने महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावलेली आहे. पुणे शहर हे देशातील माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख शहर म्हणून उदयास आले. पुणे शहराला भारताची नवीन माहिती व तंत्रज्ञानाची राजधानी बनविण्यासाठी तसेच नागपूर, नाशिक, औरंगाबाद व कोल्हापूर या सारख्या शहरातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीस सहाय्य करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान धोरणाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. या धोरणामध्ये इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील हार्डवेअर निर्मितीवर भर देण्यात येणार आहे. शासनाकडून केल्या जाणाऱ्या खरेदीमध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे यापूर्वी आपणास दिसून आलेले आहे. यापूर्वी खरेदीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आली. त्यामुळे युती शासनाकडे कोणी बोट दाखविणार नाही यादृष्टीने खरेदीमध्ये पारदर्शकता येण्याकरिता ईनिविदा अनिवार्य करण्याचा

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

निर्णय युती सरकारने घेतलेला आहे. तसेच वाळू, वनोत्पादने, जमिनी या सारख्या सार्वजनिक साधनसंपत्तीच्या लिलावाच्या बाबतीत देखील ई लिलाव पध्दती अनिवार्य करण्याचा निर्णय या शासनाने घेतलेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्याला मिळणाऱ्या 7/12 उताऱ्याच्या बाबतीत त्याची लुबाडणूक होत होती. सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हे 7/12चे उतारे मार्च 2015 अखेर पर्यंत ऑन लाईनद्वारे उपलब्ध करुन देऊन त्यामध्ये ई फेरफार करण्याची सुविधा देखील निर्माण करुन देण्याचे शासनाने ठरविले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा हा निर्णय आहे. मार्च नंतर प्रत्येक शेतकऱ्याला 7/12चे उत्तारे ईमेलवर मिळू शकतील. यामुळे शेतकऱ्याची लुबाडणूक होणार नाही.

सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये या राज्यामध्ये मागासवर्गीयावरील अत्याचाराच्या काही दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. या घटनांची शासनाने गंभीर दखल घेतली असून दोषींना कठोर शासन करण्यास हे शासन बांधिल आहे. या बाबतीत शासन कडक उपाययोजना करणार आहे. सामर्थ्यशाली व सुप्रशिक्षित पोलीस दलामार्फत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी, कायदा व सुरक्षा राखण्यासाठी शासन आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत अशी नवीन सुरक्षा यंत्रणा निर्माण करणार आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरणासंबंधी या सभागृहामध्ये आतापर्यंत अनेक घोषणा झाल्या. आघाडी सरकारच्या घोषणा आम्ही दरवर्षी ऐकत होतो. आतापर्यंत पोलीस दलाचे ज्या पध्दतीने आधुनिकीकरण व्हायला पाहिजे होते त्या पध्दतीने ते झालेले नाही म्हणून या सरकारने पोलीस दलाचे आधुनिकीकरणास सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. या आधुनिकीकरणाबरोबरच नियमित कालांतराने कालसुसंगत असे प्रशिक्षण दिले जाणार आहे. शासन राज्यातील दहशतवादाचा मुकाबला करताना येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी पोलीस दलाची पुनर्रचना करुन, त्यांना आवश्यक ती साधनसामग्री व प्रशिक्षण देऊन पोलीस दल गतिमान करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहे. महिलांना संरक्षण देण्यासाठी महिला रक्षक पथके त्या त्या ठिकाणी निर्माण करण्याचा निर्णय या सरकारने घेतलेला आहे. त्याचप्रमाणे महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा बसावा यासाठी आधुनिक भ्रमणध्वनीचा वापर केला जाणार आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 16:20

श्री. पांडुरंग फुंडर...

सभापती महोदय, फौजदारी प्रकरणामध्ये तातडीने चौकशी होऊन त्यांचे निकाल लवकरात लवकर लागावेत यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या क्षेत्रात सुरु असलेले अनेक प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्यात मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. सरकारी खर्चाचे पुनर्व्यवस्थापन करणे, महसुली तूट दूर करणे व भांडवली मत्तामध्ये गुंतवणुकीसाठी अधिकाधिक साधनसंपत्ती उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. भविष्यात अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवणे, वित्तीय तूट रोखणे, गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण करणे, भ्रष्टाचारास आळा घालणे याकरिता एक कृती योजना करण्यात येणार आहे. या कृती योजनेनुसार पर्यायी व्यवस्था करुन लवकरच स्थानिक संस्था कर रद्द करण्यात येणार आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

सभापती महोदय, सध्याची आर्थिक परिस्थिती, स्वीकृत दायित्वे आणि भविष्यातील वाटचाल व खर्च अधिक पारदर्शक तसेच कार्यक्षमतेने करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना विशद करणारी एक श्वेतपत्रिका काढण्याचे शासनाने ठरविले आहे.

सभापती महोदय, मोठ्या उद्योगधंद्यामधील नवीन युनिट स्थापन करण्यासाठी कालबाह्य नियमांचा आढावा घेऊन आवश्यक असलेल्या परवानग्या कमी करुन त्या ई-प्लॅटफॉर्मवर आणण्याचे आणि उद्योगांना सहाय्य करण्यासाठी मैत्री हा गुंतवणूकदार सुविधा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला एक खिडकी योजनेतून परवानगी देणारी कार्यक्षम यंत्रणा बनविण्यासाठी अधिकार प्रदान करण्याचे शासनाने जाहीर केले आहे.

सभापती महोदय, राज्यातील सध्याच्या व भविष्यातील गरजा लक्षात घेऊन एक नवीन ऊर्जा धोरण तयार करण्यात येणार असून औष्णिक संयंत्रांच्या प्लँट लोड फॅक्टरमध्ये सुधारणा करुन वीज पुरवठा वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. देशांतर्गत कोळशाच्या पुरवठयामध्ये वाढ होण्यासाठी कोळसा उद्योगाचे पुन:संघटन करण्यासाठी आणि वीज निर्मितीचा एकूण खर्च कमी करण्यासाठी, राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्यात योग्य समन्वय साधून शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात येणार आहेत.

सभापती महोदय, मराठवाड्यातील आणि विदर्भातील संत्रा, मोसंबी तसेच खानदेशातील केळी या फळपिकांवर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करण्याबाबत पूर्वीच्या शासनाने अनेकदा घोषणा केल्या होत्या, परंतु त्या घोषणांची अंमलबजावणी झालेली नव्हती. हे लक्षात घेऊन आमच्या शासनाने त्या त्या भागामध्ये फळ पिकांवर प्रक्रिया करणारे कारखाने उभे करुन उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांचे वैफल्य दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची गरज आहे. पूर्वीच्या आघाडी शासनाने थातूरमातूर उपाययोजना करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपये आर्थिक मदत देऊन दु:खावर फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. परंतु आमचे शासन कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून पीक विमा योजनेच्या माध्यमातून कोणत्याही शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारे शेतीचे नुकसान झाल्यास आधार देण्यासाठी विमा योजनेच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रयत्न करणार आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळाला पाहिजे व किमान उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे यासाठी शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना माल विकता येईल अशा प्रकारची पणन व्यवस्था निर्माण करण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे चित्र पाहिले तर अनेक जिल्हयांमध्ये योजनेचा निधी खर्च होत नसल्याचे दिसून येते. 60:40 च्या निकषामध्ये अनेक कामे बसत नाहीत, त्यामुळे शासनाने निर्णय घेतला आहे की, प्रचलित निकषामध्ये बदल करुन तो 49:51 केल्यास हजारो कामे करता येतील. ग्रामीण भागातील पांदण, शेत रस्ते तयार करण्याकरिता या योजनेचा फार मोठा उपयोग होऊ शकेल. या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब सुरु होणार आहे.

सभापती महोदय, कृषी आणि उद्योग यामधील विकास या दोन बाबींवर भर देण्याचे शासनाने ठरविले आहे. शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानून अन्नदाता शेतकऱ्यांना सन्मानाने उभे करण्याचा त्याचबरोबर उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. कृषी आणि उद्योग यामध्ये वाढ झाली तर शेतकरी सन्मानाने उभा राहील अशा पध्दतीने धोरण शासनाने स्वीकारले आहे. ते धोरण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिग्दर्शित झालेले आहे. नव्याने सत्तारुढ झालेल्या सरकारने निश्चितपणे पुढील काळात महाराष्ट्राचा कायापालट करुन हे राज्य क्रमांक एकचे राज्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, गतिमान सरकार कसे असते हे मागील 15 वर्षाच्या काळात राज्यातील जनतेने पाहिलेले नाही. महाराष्ट्राच्या जनतेला आता गतिमान शासन पहायला मिळणार आहे. मी माननीय राज्यपालांचे त्यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे सरकार शाहू, फुले, आंबेडकर, छत्रपती शिवरायांचे नाव घेऊन काम करणारे आहे. आघाडी शासन केवळ या थोर पुरूषांचे नाव घेत होते. छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक अरबी समुद्रामध्ये उभे करण्याचा प्रकल्प अनेक वर्षे रखडला होता. मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभे करण्याची केवळ घोषणा केली गेली. केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडीचे शासन आणि राज्यातील आघाडीचे शासन यांनी स्मारक उभे करण्यासाठी घोषणेशिवाय काहीही केले नाही. महाराष्ट्रामध्ये सत्तारूढ झालेल्या नवीन सरकारने इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभे करण्याच्या दृष्टीने 14 एप्रिल रोजी भूमिपूजन करण्याचा निर्णय घेतला असून तशी घोषणा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, यावर्षी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 58 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस व माननीय राज्यपाल यांनी एकत्रितपणे जाऊन सरकारी मानवंदना दिली, स्मारकावर पुष्पवृष्टी करून बाबासाहेबांच्या अनुयायांना मानवंदना दिली.

सभापती महोदय, असंघटित कामगारांच्या, विशेषत: ऊस तोडणी, कोळसा उद्योग, वीट भट्टया, सफाई कामगार यासारख्या असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणासाठी एक नवीन धोरण तयार करण्याचे सरकारने सूचित केले आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेशातील व कोकण किनारपट्टीवरील तिवरांचे संवर्धन, वृध्दी व त्याचे शास्त्रोक्तपणे व्यवस्थापन करण्याचे ठरविले आहे. काही दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय पातळीवरील एका समितीने असा अहवाल दिला आहे की, समुद्र किनाऱ्याला लागून असलेल्या मुंबई शहराला धोका आहे. समुद्राच्या पाण्यामुळे मुंबई शहरामध्ये मोठी हानी होण्याचा इशारा दिलेला आहे. तिवरांचे संवर्धन व शास्त्रोक्त व्यवस्थापन याला आणखी चालना देण्यासाठी आणि तिवरांवर आधारित पर्यावरण व पर्यटन यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य पातळीवर तिवर संवर्धन प्रतिष्ठान स्थापन करण्यात येणार आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) BB.4

SGB/ 16:30

श्री.भाई गिरकर.....

सभापती महोदय, शासनाने मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे ठरविले आहे. या महामार्गावर मोठया प्रमाणात अपघात होत असल्यामुळे कोकणवासीय जनतेमध्ये मोठा असंतोष होता. या महामार्गाचे चौपदरीकरण करीत असताना हा रस्ता सिमेंट कॉंक्रिटचा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे कोकणवासीयांची अनेक वर्षाची मागणी पूर्ण होणार आहे. इतरही महामार्गाचे टप्प्याटप्प्याने सहा पदरीकरण करण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, विद्यमान रेल्वे व रस्ते वाहतूक यंत्रणेवरील ताण कमी करण्यासाठी मुंबई येथील पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील नवी मुंबई व कोकण क्षेत्रातील जलवाहतूक प्रकल्पाना चालना देण्यासाठी पायाभूत सोयी व सुविधा निर्माण करण्याचे शासनाने ठरविले आहे. मुंबई आणि कोकणाला समुद्र किनारा लाभला असूनही जलवाहतूक अद्याप सुरु झालेली नाही. ती लवकरात लवकर सुरु करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ......

अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कास्ट व्हॅलिडिटीमुळे पुढील शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते त्याबाबत या पुरोगामी सरकारने नवव्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलांची जात प्रमाणपत्र पडताळणी करण्याचा निर्णय घेऊन त्यांचा प्रवेश सुखकर करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा व आरोग्य यांसाठी सामाजिक आधार देण्याच्या दृष्टीने आवश्यक तो बदल करुन त्याबाबतच्या शर्ती शिथील करण्याचे ठरविले आहे. शासनाने आदिवासींसाठी असलेल्या विद्यमान आश्रमशाळांचे बळकटीकरण करुन त्यांचे स्थलांतरण थांबविण्याचाही निर्णय घेतला. त्याचप्रमाणे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात राज्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने अनेक गोष्टींचा उल्लेख केला असून मी पुन्हा एकदा सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाला अनुमोदन देतो आणि थांबतो.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (रायगड, रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले त्याबाबत सभागृहात मांडलेल्या प्रस्तावाला नापासंती करण्याबरोबरच हा अभिनंदनाचा प्रस्ताव असंवैधानिक कसा होतो हे सांगण्याचाही मी प्रयत्न करणार आहे. सुरुवातीलाच माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांच्यासारख्या धुरंदर नेता, ज्यांना संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे आणि मी देखील त्यांना गेल्या 30 वर्षांपासून सतत बघतो आहे अशा नेत्याला आज पहिल्यांदाच भाषण वाचून करताना पाहिले. खरे तर आमची अपेक्षा अशी होती की, ते भारतीय जनता पक्षाचे जुने-जाणते नेते असल्यामुळे मंत्रिमंडळाच्या पहिल्याच शपथविधीच्या वेळेस त्यांचा मंत्रिमंडळात समावेश होईल. तद्नंतर तयार झालेल्या मंत्रिमंडळाने अभिभाषण तयार केले. सभागृहात अभिनंदनाचा ठराव ज्यांनी आज मांडला त्यांच्या बाबतीत निदान विस्तारित मंत्रिमंडळाच्या यादीत तरी त्यांचा समावेश केला जाईल अशी आम्हाला आशा होती, पण तसे झाले नाही. या राज्यात नेमके मुख्यमंत्री कोण आहेत हेच आम्हाला अद्याप समजलेले नाही. याचे कारण म्हणजे प्रथम माननीय मंत्री महोदय श्री. विनोद तावडे यांनी मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत सुतोवाच केले होते, त्यानंतर माननीय मंत्री महोदय श्री. गिरीश बापट यांनी सुध्दा पुण्यात सांगितले होते की, मंत्रिमंडळाचा विस्तार जानेवारीमध्ये होणार आहे. त्यात माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांना मंत्रिपदाची शपथ घेत असल्याचे आम्हाला आवडेल.

महोदय, आता अभिनंदनपर प्रस्ताव असंवैधानिक कसा आहे हे मी सांगू इच्छितो. ज्यावेळेस हे सरकार स्थापन झाले त्यानंतर माननीय राज्यपाल विधानसभा सभागृहात येण्यासाठी निघाले तेव्हा विधानभवनाच्या दारातच त्यांना शिवसेनेच्या नेत्यांनी मज्जाव केला. त्यांचे म्हणणे असे होते की, माननीय राज्यपालांनी सभागृहात येऊ नये. त्यानंतर सभागृहात विश्वासदर्शक ठराव मांडण्यात आला, त्या ठरावाला शिवसेनेच्या वतीने मत विभाजनाची मागणी करण्यात आली असेही त्यांचे म्हणणे आहे पण त्यांना ती परवानगी न देता केवळ आवाजी मतदानाने हा विश्वासदर्शक ठराव पारित करण्यात आला. अशा परिस्थितीत सत्तेवर आलेल्या सरकारने तयार केलेले अभिभाषण व त्यावरील अभिनंदनपर प्रस्ताव हे म्हणूनच असंवैधानिक आहेत. सभागृहात ज्यावेळेस अभिनंदनपर प्रस्ताव मांडला जातो त्यावेळेस सहयोगी पक्षाकडून त्या ठरावाचे अनुमोदन केले जाते. पण आज मात्र तसे अनुमोदन देण्याची मानसिकता सहयोगी पक्षाची दिसली नाही. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ......

गोऱ्हे या जरी सभागृहात उपस्थित दिसत असल्या तरी केवळ बसावयाचे म्हणूनच त्या बसलेल्या आहेत असे मला वाटते, कारण पुढील विस्तारात त्यांना सुध्दा स्थान मिळेल अशी अपेक्षा आहे.

माननीय राज्यपालांचे अभिभाषण ज्या प्रशासकीय विंगकडून बनविले जाते त्यासंबंधीच्या प्रक्रियेवर बोलण्याचा मला अधिकार आहे. तसेच सभागृहाच्या काही प्रथा आणि परंपरा मला माहीत असल्याने मी त्या व्यक्त करु इच्छितो. ज्यावेळी शासन प्रस्थापित झाले तेव्हा तत्काळ मा. महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी राज्याच्या दुष्काळी भागात दौरा केला. त्याच वेळेस तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री. एकनाथ शिंदे आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनीही मराठवाड्यातील दुष्काळी भागात पाहणी दौरा केला होता. त्या दौऱ्याच्या दरम्यान माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मा. महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांच्या बाबतीत "खडसे मंत्री म्हणून राहण्याच्या लायकीचे नाहीत" अशा प्रकारचा शब्दप्रयोग केला होता. त्यांनी पुढे जो शब्दप्रयोग केला तो इतका असंसदीय स्वरुपाचा होता की, मी त्याचा उच्चारही करु शकत नाही.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्यांचा परामर्श ज्येष्ठ सदस्य माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी घेतला असता या संपूर्ण पुस्तकार राज्यातील दुष्काळी परिस्थितीत मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येतील याबाबत एकही वाक्य दिलेले दिसत नाही. वास्तविक हे सरकार सत्तेवर आले त्यावेळेसच राज्यात भीषण टंचाईची परिस्थिती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. त्यापूर्वी सुध्दा निवडणुकांच्या काळात सबंध राज्यात पाऊस कमी पडल्यामुळे टंचाईची परिस्थिती निर्माण होऊन असे प्रकार घडत होते. असे असताना देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पुढील संपूर्ण वर्षात करावयाची कामे आणि उपाययोजनां यांच्या रुपरेषेचा समावेश केलेला दिसत नाही. त्यानंतर मधल्या काळात याच शासनाकडून कुशल प्रशासन देण्याबाबत अनेक वक्तव्य करण्यात आली. आज ज्याप्रमाणे माननीय महसूल मंत्र्यांनी प्रशासकीय अधिकारी सभागृहात अदृश्य असल्याचा उल्लेख केला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अगदी पहिल्याच दिवशी अशा प्रकारे प्रशासनावरील वचक कमी होत असेल तर पुढील काळात काय होईल याचाही विचार केलेला बरा. या शासनाच्या कार्यक्रमाच्या बाबतीत प्रशासनाचा, सचिवांचा सहभाग आणि

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ......

समरसताच नसेल, मानसिकता नसेल तर पुढील काळात हे सरकार कसे काम करणार आहे ? लोकशाहीमध्ये विधिमंडळाला कायदे करण्याचे अधिकार आणि शासन म्हणून धोरण ठरविण्याचे अधिकार बहाल केलेले असतात. पण शेवटी अंमलबजावणीचे अधिकार नोकरशाहीकडेच असतात. त्यांनीच जर अशा प्रकारचे अनास्थेचे टोक गाठलेले दिसले तर त्याचाही विचार व्हावा. आज दुष्काळासारख्या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना या प्रशासकीय अधिकाऱ्यांची अनास्था अनुभवायला मिळाली. ज्यावेळेस महसूल मंत्र्यांनी मराठवाड्यात दौरा केला त्यावेळी सुध्दा वेगवेगळ्या प्रकारच्या घोषणा त्या दौऱ्याच्या दरम्यान केल्या होत्या, त्यासाठी त्यांनी मंत्रिमंडळाची मंजुरी घेतली की नाही हे माहीत नाही कारण शेवटी त्यांचा तो अधिकार आहे म्हणूनच त्यांनी त्या घोषणा केल्या.

......डीडी-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

मधल्या कालावधीत ते दिल्लीला गेले होते. माननीय मंत्री महोदय श्री.चंद्रकांतदादा पाटील आणि मुख्यमंत्री येथे काय करीत आहेत यापासून त्यांना दूर ठेवण्यासाठी कदाचित त्यांना दिल्लीला पाठविले होते की काय अशी शंका देखील कुठेना कुठे तरी निर्माण होते. मी येथे राजकीय अभिनिवेशाने बोलतो अशातला भाग नाही. 15 वर्षामध्ये आमच्या शासनाने काय केले हे बोलले जात असताना आपण जे काही बोलत आहात, कृती करत आहात किंवा पुढची पावले उचलण्यासंबंधी जी काही भावना व्यक्त करीत आहात त्यासंबंधातील शब्द प्रयोग किंवा सरकारच्या मनातील संवेदना नजरेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे. त्याच गोष्टी आपल्याला माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून अभिप्रेत असतात. मंत्रिमंडळ व प्रशासकीय अधिकारी माननीय राज्यपालांचे अभिभाषण तयार करतात. नव्याने गठित झालेले सरकार नव्या अपेक्षेने येत असते. आम्ही लोकशाहीमध्ये जनतेने दिलेला कौल मान्य केला आहे. मी हेही मान्य करतो की, कदाचित आम्ही लोकांपुढे जाण्यामध्ये अपयशी ठरलो असू. किंबहुना आपण निर्माण केलेल्या वातावरणात, मार्केटिंगमध्ये यशस्वी ठरलात. त्याला काही कारणे असू शकतात. या लोकशाहीमध्ये जनतेने आपणाला सत्तेमध्ये बसण्याचा अधिकार आज दिलेला आहे. त्याचा आदर मनामध्ये ठेवूनच आम्ही आमच्या भावना मांडत आहोत. आदर मनामध्ये ठेवणे याचा अर्थ असाही नव्हे की, आपल्याला जे वाटेल ते करणे. आपल्या मनामध्ये असलेल्या चांगल्या कल्पना मांडाल त्यावेळी एक सक्षम विरोधी पक्ष या नात्याने त्या योजनांना पाठिंबा देण्याची भूमिका मात्र आमच्याकडून घेतली जाईल, विरोधाला विरोध करण्याची भूमिका आम्ही कधीच घेणार नाही. लोकांच्या सहनशीलतेचा उद्रेक होतो तेव्हा काय होते हे आपण सर्वांनी पाहिले आहे. गेल्या एक महिन्यामध्ये दिवसागणिक आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. आपले सरकार आल्यानंतर देखील तरू ण व्यक्ती आत्महत्या करीत आहेत. तरूण शेतकरी ज्यावेळी आत्महत्येला उद्युक्त होतो त्यावेळी त्याचा अर्थ असा निघतो की, त्याच्या मनामध्ये सरकार प्रती जी विश्वासार्हता वाटायला हवी होती ती कमी कमी होत चालली आहे. वास्तविक माझ्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे आहे असे त्याला वाटायला हवे होते, मी माझे जीवन संपुष्टात आणण्यापेक्षा सरकार काहीना काही उपाययोजना करून मला न्यायाच्या

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

भूमिकेतून वागवेल अशी भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण होण्याऐवजी त्याच्या मनात आत्महत्येचा विचार बळावतो. दुष्काळी परिस्थितीत गेल्या महिन्याभरामध्ये झालेला फेरबदल लक्षात घेणे आवश्यक आहे. आमच्या काळात देखील आत्महत्या झाल्या, त्या आम्ही नाकारल्या नाहीत. आता महिनाभरात झालेल्या आत्महत्या आणि आधी झालेल्या आत्महत्या यांचे प्रमाण बघून समाधान मानू नका. आता आपण जनतेचे प्रतिनिधी आहात. आता जे झाले आहे त्यावर पांघरुण घालण्याचा कृपा करून प्रयत्न करू नका अन्यथा त्यातून आपले खरे स्वरूप लोकांसमोर येणार आहे. आपण जेवढे बोलाल तेवढे आम्हाला बरे राहील. त्यामुळे माझ्या भाषणात व्यत्यय येईल मला वाटत नाही. तो व्यत्यय मी येऊ देखील देणार नाही. आज आपणा सर्वांच्या मनात मोकळेपणाची भूमिका असणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. सरकार ही चालत राहणारी निरंतर अशी प्रक्रिया असते. काल आम्ही सत्तेत होतो, आज विरोधात आहोत. अशा घटना ह्या लोकशाहीमध्ये घडतच असतात. परंतु, लोकशाहीमध्ये चालत राहणारा जो वैचारिक गाभा आहे तो महत्त्वाचा आहे. लोकांच्या विकासाच्या कल्पनांची अंमलबजावणी करण्यासाठी काही पावले उचलावी लागतात. आपण अनेक वेळा म्हणालात की, राज्याच्या तिजोरीमध्ये खणखणाट झालेला आहे. त्याचा उल्लेख माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केला. त्यांनी सांगितले की, पूर्वीच्या शासनाने तिजोरी रिकामी करून दिलेली आहे. 1999 मध्ये सत्तांतर झाले त्यावेळी काय स्थिती होती ? त्यासंबंधी मी भाष्य करू इच्छित नाही. आज देखील राज्यावर कर्ज आहे. पण कर्ज असलेले राज्य महाराष्ट्र हे एकमेव नाही, इतर राज्यांवरही कर्जाचा बोजा आहेच. ज्या गुजरात राज्याचा डांगोरा पिटवत आपण आज सत्तेवर आलात त्या गुजरात राज्यावरील कर्ज पहावे, शेजारील मध्यप्रदेश राज्यावरील कर्ज पहावे, छत्तीसगड राज्यावरील कर्ज पहावे. त्या कर्जाचे प्रमाण महाराष्ट्राने घेतलेल्या कर्जापेक्षा खूपच जास्त आहे. राज्याचे स्थूल उत्पन्न देखील वाढले. उत्पन्नामध्ये भर कशाने पडेल यासंबंधी देखील पावले उचलण्यात आली. स्वत:ची कृतिशीलता दाखविण्यामध्ये असमर्थ असलेली माणसे कारणे शोधत असतात. सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेब आपण कारणे शोधू नका. लोकांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी आपण पावले उचलावीत. निवडणूकीला अजून पाच वर्षाचा कालावधी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

निवडणुका येतील तेव्हा राजकीय अभिनिवेशाने भाषणे करण्यासंबंधातील भूमिका आपण घेऊ या. पण आज दुष्काळामध्ये होरपळत असलेल्या शेतकऱ्याला मदत करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. तो कसा उभा राहील यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर तातडीने उपाययोजना करण्यासाठी सरकारने त्या त्या वेळी कोणती पावले उचलली आहेत हे आपण अनेक वेळा पाहिले आहे. आज आपण कोणती पावले उचलत आहात, उद्या आपण चर्चेला उत्तर देताना कोणता निर्णय घेणार आहात हे देखील पाहणे अगत्याचे आहे. त्यासंबंधातील अपेक्षा मी आताच व्यक्त करीत नाही. परंतु, पुढच्या गोष्टींचा विचार करण्यासाठी शासन म्हणून आपणाला पावले उचलावीच लागणार आहेत. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखणे देखील जरूरीचे आहे. ही प्रणाली व्यवस्था केवळ आताच आलेली नसून 3,4,5, वर्षापूर्वीच आली आहे. आपण नवीन काही तरी आणत आहोत अशा प्रकारचे काही तरी सांगून वेगळे काही तरी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे असा आभास निर्माण केला म्हणजे मूळ अभिभाषणापासून दूर जात आहोत असाच अर्थ निघतो. आम्ही एक भूमिका घेतली होती ती म्हणजे हे सरकार स्थिर असले पाहिजे. दिल्लीमध्ये वेगळी परिस्थिती निर्माण झाली होती. अनेकांच्या मनात वेगवेगळे संभ्रम असू शकतात. दिल्ली ही या देशाची राजधानी आहे. देशाच्या राजधानीमध्ये केवळ 8 दिवसांचे सरकार असेल तर तशी अवस्था या देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये राहता कामा नये, अशी आम्ही भूमिका घेतली होती. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून या राज्याचा इतिहास वेगळा आहे. हे राज्य 105 हुतात्म्यांच्या बलिदानातून झाल्याचे आपण सर्वांनी अनुभवले आहे. यासाठी मागच्या पिढीने खूप मोठे बलिदान दिलेले आहे. त्या आपल्या महाराष्ट्राचे देशात अव्वल स्थान टिकाविण्यासाठी पराक्रमांची पराकाष्ठा करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी गेल्या महिन्याभरात कोणतेच भाष्य केले नाही. कदाचित टीव्ही किंवा माईकवर जाऊन बोलण्याचा त्यांचा स्वभाव नसेल. पण ज्यांचा ज्यांचा संबंध होता त्यांना अडचण वाटू शकते. सरकारमध्ये आल्यानंतर बोलणे आणि नसताना बोलणे यामध्ये खूप मोठा फरक आहे. मासा पाण्यामधून बाहेर आल्यानंतर तडफडत असतो. याचे एक विदारक दर्शन गेल्या महिन्याभरात अनुभवायला मिळाले. त्यामुळे सरकारकडून आमच्या काही अपेक्षा आहेत. अभिभाषणावर चर्चा करीत असताना ठोस आणि

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

ठामपणाची भूमिका घेत असताना ज्या काही उणिवा आहेत त्या आपल्या समोर ठेवणे आमचे कर्तव्य आहे. आज आपली झालेली अवस्था, आपल्या सारखा कणखर नेता विदर्भ, मराठवाड्यामध्ये फिरला तेव्हाच शासनाच्या वतीने आपण ठामपणे भूमिका घ्यायला पाहिजे होती. पण प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर देखील लोकांच्या हितासाठी पॅकेज जाहीर करावे असे मंत्री महोदयांना वाटले नाही. एक दिवस सभागृह बंद पडल्यानंतर लोकांच्या मनामध्ये भावना निर्माण झाल्या. पण अशाच प्रश्नांच्या वेळी यापूर्वी देखील अनेक वेळा सभागृहाचे कामकाज विरोधी पक्षाकडून बंद पाडण्यात आले होते. त्यावेळी देखील सरकारने पॅकेज जाहीर केल्याशिवाय कामकाज होऊ देणार नाही अशी भूमिका घेतली होती. आम्ही जी काही चर्चा करूती पॅकेजवर करूअशी भूमिका आपण घेतली होती, हे सुद्धा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांने आम्ही सत्तेमध्ये असताना ऐकले होते. स्थानमाहात्म्य खूप मोठे आहे. त्याचा तो परिणाम असू शकतो. त्याचा तो परिणाम असला तरी सुद्धा मनामध्ये प्रामाणिकपणाचे विचार असले पाहिजेत. कृती संबंधातील आपला आत्मविश्वास ठाम असेल आणि इच्छाशक्ती प्रबळ असेल तर लोकांचे प्रश्न सोडविण्याच्या बांधिलकीतून वेगवेगळे प्रयत्न करता येऊ शकतात. ते आज आपण दाखवावेत अशी आमची अपेक्षा आहे. विधायक कामासाठी आमचा पाठिंबा राहिल हे मी आधीच सांगितले आहे. पण पूर्वग्रहदूषित एखादी भूमिका घेतलेली देखील आम्हाला पहायला मिळू शकेल.

आज येथे कोकणातील अनेक नेते मंडळी आहेत. ऊर्जेमध्ये स्वयंपूर्ण महाराष्ट्र करण्याची भूमिका आपण घेतली आहे. जैतापूरच्या प्रकल्पासंबंधी राज्य शासनाची भूमिका काय आहे. यासंबंधातील उत्तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या उत्तराच्या निमित्ताने येणे आवश्यक आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी हे ज्यावेळी फ्रान्सला गेले होते त्यावेळी त्यांनी दुरूत्ती केली की, जैतापूर प्रकल्पासंबंधी झालेल्या कराराची अंमलबजावणी नवीन आलेले सरकार करील. तशी भूमिका माननीय प्रंतप्रधानांनी फ्रान्समध्ये जाऊन मांडली. आता आपण दोघेजण सरकारमध्ये आहात. तेव्हा यासंबंधातील स्पष्ट भूमिका होणे आवश्यक आहे.

....5

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD 5

BGO/ PFK 16:50

श्री.सुनील तटकरे...

स्वतंत्र विदर्भासंबंधी देखील तीच भूमिका आहे. आदरणीय श्री.नितीन गडकरी साहेबांनी नागपूरमध्ये सांगितले होते आणि सरकार प्रस्थापित झाल्यानंतर सुद्धा सांगितले होते की, आमचे सरकार असे पर्यंत विदर्भ स्वतंत्र केला जाईल. सन्माननीय मंत्री श्री.रावते साहेब आज आपण अखंड महाराष्ट्राच्या नावाने सरकारमध्ये आला आहात. महाराष्ट्राच्या अस्मितेबद्दलचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. 105 हुतात्म्यांच्या बलिदानाने संयुक्त महाराष्ट्र साकार झालेला आहे पण आपल्याला अभिप्रेत असलेल्या अखंड महाराष्ट्राची ग्वाही देण्याची मनोभूमिका मात्र या अभिभाषणामध्ये दुर्दैवाने कुठेही नमूद केलेली नाही. ती भूमिका या निमित्ताने स्पष्ट झाली पाहिजे. त्या भूमिकेसंबंधी राजकारण करण्याची आमची मुळीच इच्छा नाही. परंतु, यासंबंधातील शासनाची भूमिका ही स्पष्ट असली पाहिजे. विचाराची स्पष्टता असली की, कृतीमध्ये अंमलबजावणी करता येऊ शकते.

यानंतर श्री.जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .. ..

परंतु स्पष्टता नसेल, भूमिका अधांतरी असेल तर अनेक प्रश्नांची उकल करता येत नाही. त्यामुळे या संदर्भात सरकार नेमकी कोणती पावले उचलणार आहे, या संदर्भातील भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मधल्या कालावधीतील वक्तव्ये आम्ही ऐकली आहेत. महाराष्ट्रापासून मुंबईला वेगळे करण्याचा प्रयत्न केला गेला तर आम्ही नरडीचा घोट घेऊ, हे माझे वक्तव्य नाही तर शिवसेना नेत्यांचे वक्तव्य आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा भूमिका घेतली आणि मग त्यासंदर्भात सामना वर्तमानपत्रात भूमिका स्पष्ट करण्यात आली. मुंबईच्या विकासासाठी पंतप्रधान महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक वेगळी समिती स्थापन करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. मुंबईच्या विकासासाठी एमएमआरडीचे प्राधिकरण तयार करण्यात आले आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईमध्ये गेल्या 15 वर्षापासून चांगल्या प्रकारे कामे झालेली आहेत. मी नगरविकास खात्याचा राज्यमंत्री असताना एमयुटीपीचा प्रकल्प तत्कालीन मुख्यमंत्री माननीय विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आणण्यात आला होता. त्यावेळी समोरच्या बाकावरुन माझी थट्टा करण्यात आली होती. परंतु आज आम्हाला याचा अभिमान वाटतो की, गेल्या 15 वर्षामध्ये मुंबई शहराचा चेहरामोहरा एमएमआरडीएच्या माध्यमातून बदलण्यासाठी राज्य सरकारने निश्चितपणे पावले उचलली होती. त्यावेळेस आमच्या योजनेला आपला असा आक्षेप होता की, मुंबईमध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातून कामे नको. एमएमआरडीएमुळे ओव्हरलॅपींग होईल, अशी भीती आपण व्यक्त केली होती. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुंबईमध्ये कामे होऊ शकतात, अशी भूमिका आपण त्या कालावधीत मांडत होता. आज मुंबईच्या विकासासाठी स्वतंत्र समिती नेमण्याच्या संदर्भात आम्ही बरेच काही ऐकले आहे. निवडणुकीच्या वेळी गुजरातच्या मुख्यमंत्री महोदया राज्यात आल्या होत्या. त्यांनी असे सांगितले की, मुंबईतील उद्योग, व्यापार गुजरातला गेला तर त्यांचा विकास होईल. एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्यात उद्योग यावेत, यासाठी भूमिका घेतली तर त्याला आमचा आक्षेप नाही. परंतु त्यापुढे त्यांनी असे सांगितले की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .. ..

मुंबईत पायाभूत सुविधा नाहीत, मुंबईत चांगले रस्ते नसल्यामुळे मुंबईचा व्यापार चांगल्या पध्दतीने चालू शकत नाही. त्यामुळे येथील व्यापार गुजरात राज्यात गेला तर चांगले होईल. अशा प्रकारची भूमिका त्यांनी मांडली होती. मुंबई महानगरपालिकेत आपण अनेक वर्षापासून काम करीत आहात. त्या महानगरपालिकेच्या कार्यकक्षेतील रस्त्यांची अवस्था खड्डेमय झालेली आहे, हे मी नाही तर गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. गुजरातमध्ये उद्योग जाण्याची भूमिका घेतली जाते, ती योग्य नाही. आज मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे कोणी काम करीत असेल तर आमच्या रक्तात शेवटचा थेंब असेपर्यंत आम्ही ते घडू देणार नाही, असे शिवसेनेच्या नेत्यांनी वक्तव्य केले होते. त्याचे आता काय होणार आहे ?

सभापती महोदय, मुंबई ही तुमची, आमची सर्वांची आहे. मुंबई ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचे वर्णन केले जाते. त्यामुळे ही अस्मिता कोणालाही वेगळी करता येणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात ही बाब स्पष्ट केली पाहिजे की, माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये त्यांना नेमके काय अभिप्रेत होते ? यामध्ये संविधानात्मक अधिकार कोणाला राहणार आहेत, राज्य सरकारचे अधिकार माननीय पंतप्रधानांच्या समितीला देणे योग्य होतील काय ? महानगरपालिकेचे अधिकार आपण घटना दुरूस्ती करुन घेतलेले आहेत. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, "मेअर इन कौन्सिल"ची भूमिका आपण आणली होती. परंतु ज्यावेळी आपण सरकामध्ये आला त्यावेळी आपल्याला "मेअर ईन कौन्सिल"ची भूमिका रद्द करावी लागली होती. "मेअर ईन कौन्सिल"च्या अधिकारामुळे मुंबईमध्ये नेमके काय घडले, हे तुम्हाला नेमके अनुभवयास मिळाले होते. त्यामुळे या संदर्भातही आज स्पष्टता होण्याची आवश्यकता आहे. वेगळी समिती तयार करण्याच्या भूमिकेत नेमके काय काय आहे, हे सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे. मुंबईचा विकासासाठी निधी हवा असेल तर केंद्र सरकारला निधी देता येतो. दिल्ली शहरालाही केंद्र सरकारच्या माध्यमातून निधी दिला जातो. परंतु दिल्लीमध्ये माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील समितीची स्थापना झालेली नाही. प्रत्येक महानगरपालिकेत प्राधिकरण अस्तित्वात असून तेथे सुध्दा पाहिजे त्या निधीची उपलब्धता होत असते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .. ..

तेथेही राज्य सरकार आहे व येथेही राज्य सरकार आहे. राज्य सरकारचा अधिकार हा संविधानात्मक आहे. राज्य सरकारच्या अधिकारामध्ये नेमका कसा हस्तक्षेप केला जाणार आहे, राज्य सरकारच्या अधिकारावर काही मर्यादा येणार आहेत का व नंतर विकासाच्या संदर्भात नेमकी भूमिका काय घ्यायची, या संदर्भातील भूमिका समजणे आवश्यक आहे. गेल्या महिन्याभरात आम्हाला बरेच काही अनुभवावयास मिळाले आहे. केंद्र सरकारला जर खरोखर मदत करावयाची असती तर माननीय श्री.खडसे साहेब आपण दुष्काळाच्या संदर्भात दोन वेळा दिल्लीला जाऊन आला आहात. परंतु केंद्राची टीम दोन-तीन दिवसानंतर दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी येणार आहे. खरे तर केंद्राची टीम महिन्याभरापूर्वीच राज्याच्या भेटीला यावयास हवी होती. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे मुंबईच्या चर्चेपासून तुमच्या सारख्या स्पष्टवक्त्या नेत्याला दूर ठेवावयाचे असल्यामुळे कदाचित तुम्हाला दिल्ली येथे पाठविले गेले असावे. तुम्ही दिल्लीत जाऊन चांगले काम केले, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्याची फलनि:ष्पत्ति जोपर्यंत समोर येत नाही तो पर्यंत उपाययोजनांच्या बाबतीत, सरकारच्या विश्वासार्हतेबाबत शंका निर्माण होऊ शकते. ज्यावेळेस लोकांमध्ये विश्वासार्हतेच्या बाबतीत शंका निर्माण होते त्यावेळी उत्तर देण्यासाठी कृतीशील पध्दतीने काम करण्याची आवश्यकता असावी लागते. या ठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद न केलेल्या बाबी सुध्दा या ठिकाणी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र सरकारवर कर्ज आहे. स्थूल उत्पन्नाच्या 17 ते 18 टक्क्याच्या मर्यादेत कर्ज आहे. महाराष्ट्र कर्ज मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न घेणारे राज्य आहे.

सभापती महोदय, यांनी एलबीटीच्या नावावर निवडणूक जिंकली. या ठिकाणी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, एलबीटीच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख आहे. परंतु एलबीटीच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात एका ओळीचा सुध्दा उल्लेख नाही. आज आपण म्हणत आहात की, ज्यावेळेस जीएसटी येईल त्यावेळेला एलबीटीच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, मी जेव्हा या राज्याचा अर्थमंत्री होतो त्यावेळी केंद्रीय अर्थमंत्री माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .. ..

श्री.प्रणव मुखर्जी यांच्या बैठकीला मी उपस्थित होतो. त्यावेळी छत्तीसगड, मध्यप्रदेश, गुजरात या राज्याच्या अर्थमंत्र्यांनी जीएसटीला पूर्णपणाने विरोध केला होता. पश्चिम बंगालच्या अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली देशाच्या अर्थमंत्र्यांची हायपॉवर कमिटी होती. त्या बैठकीलाही मी अनेक वेळेस गेलो होतो. त्यावेळी भाजपप्रणित अर्थमंत्री जीएसटीला विरोध करीत असत. आता जीएसटीच्या संदर्भात आपल्याला भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे.

सभापती महोदय, या निवडणुकीत टोलच्या नावाखाली यांना मते मिळाली आहेत. आज कोल्हापूरचे सन्माननीय सदस्य सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री आहेत. या अभिभाषणाच्या चर्चेच्या निमित्ताने टोलचा उल्लेख व्हावा, असे तुम्हालाही वाटले नाही. या सरकारने मते मागताना जनतेपुढे जे जे विचार ठेवले होते त्याची स्पष्टता या ठिकाणी होण्याची आवश्यकता आहे. आम्ही सत्तेमध्ये आल्यानंतर टोलमुक्ती करु आम्ही सत्तेमध्ये आल्याबरोबर एलबीटी रद्द केली जाईल, असे म्हणणारी माणसे आता कारणे शोधायला लागली आहेत. विरोधी पक्षात असताना बोलणे आणि सत्तेमध्ये असताना बोलणे यामध्ये खूप मोठा फरक असतो व त्याची आपल्याला 15 वर्षाच्या कालखंडानंतर जाणीव झाली, हे चांगले झाले. राज्याला प्रगतीपथावर नेणे हे आपले काम असते. परंतु दुर्दैवाने गेल्या 15 वर्षाच्या कालखंडात जवळपास 10 वर्षे अशीच गेली. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, केवळ काँग्रेस सरकार असा उल्लेख करु नका तर लोकशाही आघाडी सरकार असा उल्लेख करा. ज्या ज्या वेळी या महाराष्ट्रात नैसर्गिक संकट आले त्या त्या वेळी योजनेला कपात करावी लागली तरी चालेल परंतु आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत झाली पाहिजे, अशी भूमिका आमच्या सरकारने गेल्या 15 वर्षात सातत्याने घेतली होती. धानाच्या आधारभूत किंमतीच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले आहेत. आता भाताची आणि कपाशीची खरेदी सुरु झाली आहे. परंतु त्या संदर्भात एकही शब्द अभिभाषणात आला नाही. उलट मागच्या सरकारने धानाला दर क्विंटलला 200 रुपयांचा बोनस देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु तो बोनस रद्द करण्याचे पाप या सरकारने केले असून त्याचा हिशेब या सरकारला द्यावा लागणार आहे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .. ..

सभापती महोदय, माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी कपाशीच्या संदर्भात दिंडी काढली होती. परंतु ती मानसिकता आता आम्हाला दिसत नाही. आज धानाची आणि कपाशीची खरेदी व्यापाऱ्यांनी केली आहे. परंतु तुम्ही या शेतकऱ्याला बोनस कधी देणार आहात ? भात खरेदी करण्याच्या संदर्भात योग्य वेळी पावले उचलली गेली असती आणि राज्य सरकारने धानाला बोनस देण्याची भूमिका घेतली असती तर आज भाताचे उत्पादन कमी झालेल्या शेतकऱ्याला त्याचा फायदा झाला असता. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या धान उत्पादक भागातून आलेल्या आहेत. त्यांच्या भागातील धान उत्पादक शेतकऱ्याला बोनस न देण्याचे पाप या सरकारच्या माध्यमातून घडले आहे, हे मी या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेला सांगू इच्छितो. उक्ती आणि कृतीमध्ये फारसा फरक असता कामा नये. जेवढे झेपेल तेवढेच बोलावे. परंतु ठीक आहे. आपण 15 वर्षापासून सत्तेपासून दूर राहिल्यानंतर कधी एकदा सत्तेची पायरी चढतो अशी थोडीशी घाई आपल्याला होणे स्वाभाविक आहे. परंतु त्यानंतर होणाऱ्या परिणामांची, अंमलबजावणीच्या संदर्भात, उपाययोजनेच्या संदर्भात कोणकोणत्या अडचणी येऊ शकतात, हे आपल्या लक्षात आले असेल. आता त्याला सामोरे जाण्याचा प्रयत्न आपण करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अर्थखात्याच्या संदर्भात जरूर श्वेतपत्रिका काढावी. ती काढली तर वस्तुस्थिती आपल्या सर्वांच्या लक्षात येईल. माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेब आपण यापूर्वी अर्थमंत्री म्हणून काम केलेले आहे. या राज्याचे आर्थिक उत्पन्न किती वाढले, याची आपल्याला चांगली माहिती आहे. ज्यावेळी सन 2010 मध्ये मी वित्त मंत्री म्हणून बजेट मांडले त्यावेळी आपल्या राज्याची वार्षिक योजना 35 हजार कोटी रुपयांची होती.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10-12-2014 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )

FF-1

AJIT 5=10पूर्वी श्री.जुन्नरे..

17.10

श्री.सुनील तटकरे ...

आज ती वाढलेली आहे. नॉन प्लान एक्स्पेन्डीचर कशासाठी होतो हे माझ्यापेक्षा आपल्याला जास्त माहीत आहे. आपल्या राज्याचे विक्रीकर विभागाचे खात्याचे उत्पन्न 8 ते 9 हजार कोटी रुपये उत्पन्न होते. आज राज्याच्या विक्रीकर विभागाचे खात्याचे उत्पन्न 60 ते 70 हजार कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. मागील पाच वर्षात ही वाढ झालेली आहे. विक्रीकरचा उत्पन्न वाढले याचा अर्थ राज्याची सर्वांगीण प्रगती झाली असा होतो. मागील पाच वर्षात विक्रीकराच्या उत्पन्नात पाच पटीने वाढ झालेली आहे. याचा अर्थ राज्याच्या विकासाचा दर, औद्योगिक विकासाचा दर वाढलेला आहे असा त्याचा अर्थ होतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिल्ली-मुंबई कॉरीडोर करण्यात येईल असा उल्लेख आहे. माननीय पंतप्रधान जपान दौऱ्यावर गेले त्यावेळी त्यांनी ही भूमिका घेतली. माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते साहेब आपणास डुलकी लागली नसेल तर आपणास प्रश्न विचारतो, त्या प्रश्नाचे उत्तर आपल्याकडून अभिप्रेत आहे. दिल्ली-मुंबई कॉरीडॉर होऊ नये म्हणून आपण माणगाव येथे येऊन मोर्चा काढला होता. आता त्या दिल्ली-मुंबई कॉरीडॉरचे अस्तित्व काय आहे ? माननीय पंतप्रधान जपानच्या दौऱ्यावर जाऊन दिल्ली-मुंबई कॉरीडॉर करण्यासाठी नवे सरकार वचनबद्ध आहे अशी भूमिका घेतात आणि त्याचो. उल्लेख या सरकारने त्याचा अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्यावेळी त्यावेळी शिवसेना पक्ष सत्तेत सहभागी नव्हता. सहभागी नव्हती. आता त्यांच्याकडून उत्तर मिळाले पाहिजे कारण आता युतीचे सरकार आहे. तेव्हा या संदर्भातील भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्यात उद्योग वाढले पाहिजेत, रोजगार वाढला पाहिजे, आम्ही तरुणांना काम देणार आहोत असे निवडणुकीपूर्वी सांगण्यात आले होते. परंतु आता आम्ही रोज काय पाहतो तर काय, नुसते ट्विट सुरु आहे. सकाळी 9.00 वाजता ब्रेकफास्ट झाल्यावर ट्विट, दुपारी पुन्हा ट्विट. आम्हाला सन्माननीय मंत्री एकनाथराव खडसे यांची भूमिका पटते. कारण ते आपण जे काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असेल ते स्पष्ट सांगतात. पोटात एक आणि ओठात एक अशी त्यांची कधीही भूमिका राहिलेली नाही.

सभापती महोदय, इतक्या मोठ्या प्रमाणावर हाय-टेक झाल्यानंतर काय होते हे आंध्रप्रदेश राज्याने पाहिलेले आहे. तेव्हा सा सरकारने जमिनीवर यावे, वास्तवामध्ये यावे. लोकांचे प्रश्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ...

सोडविण्याच्या दृष्टीकोनातून आपण चर्चा करु या. या महाराष्ट्राची एक गौरवशाली परंपरा आहे. शाहू-फुले-आंबेडकरांचा पुरोगामी विचार आहे. काही वेळेला आपली राजकीय भूमिका वेगवेगळी राहू शकेल. ~~पण~~ आता आपण ~~कोण~~ एका धर्माचे राहिलेला नाहीत. ~~कोण्या~~ एका जातीचे राहिलेले नाहीत. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी पंढरपूरमध्ये कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने उत्लेख केला त्याबद्दल मी काही बोलू इच्छित नाही. परंतु ~~माननीय मंत्री~~ त्यानंतर श्री.रामदास कदम यांनी ~~त्यानंतर~~ जे वक्तव्य केले ते ~~खूप मोठे आहे. त्यांनी केलेले वक्तव्य~~ मला येथे बोलवत सुद्धा नाही. मधल्या कालावधीत त्यांची जी काही वाणी झाली आणि चर्चेतील कावा त्यांनी व्यक्त केला, जे~~से~~ व्यक्तव्य केले ~~या ठिकाणी मांडले~~ त्याला शाहू-फुले-आंबेडकरांनी त्याच वेळी तिलांजली दिली होती. पण आपण त्याचा पुनरूच्चार आज करीत आहात याचा अर्थ आपल्या मनातील विखार आजही कायम आहे, त्याची स्पष्टता या निमित्ताने लोकांसमोर येते.

सभापती महोदय, मागील महिन्याभरात आपण काय पाहत आहोत, ~~–~~दलितांवर झालेल्या अत्याचारा संदर्भातील ~~ा अत्याचार, त्या संदर्भातील~~ तपासामध्ये होत असलेली दिरंगाई किंवा ~~आज~~ भगिनींवर होणाऱ्या अत्याचारामध्ये ~~रा अत्याचार त्यामध्ये~~ वाढ होत आहे. ~~त चाललेले प्रमाण~~ आम्हाला याची जाणीव आहे की, महिन्याभराच्या~~ा~~ कालखंडात सर्व गोष्टी करणे शक्य नाही. ~~–हा पूर्णपणे प्रशासनासाठी देणे शक्य नाही.~~ त्यासाठी काही महिने द्यावे लागतील आणि त्यामध्ये दुमत असण्याचे ~~काही~~ कारण नाही. पण सत्तेत आल्याच्या पहिल्या ~~आल्या~~ दिवसापासून आम्हाला सर्वकाही कळते असा आभास तरी करु नका. जे होईल ते होत असते. काही उपायुयोजना करण्याच्या दृष्टीकोनातून कणखरपणे पावले उचलण्याची भूमिका घ्यावी लागते. या भूमिकेचा आपण स्वीकार करावा, एवढीच मी विनंती करतो.

सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल नापसंती आणि अभिनंदनाच्या ठरावाला तीव्र विरोध करतो कारण ज्यांनी माननीय राज्यपालांना सभागृहात येण्यापासून थांबविले ते आज सरकारमध्ये आहेत, ~~आणि~~ माननीय राज्यपालांवरील ~~च्या~~ अभिनंदनाच्या ठरावामध्ये सहभागी आहेत, तेव्हा यामध्ये ~~याची~~ स्पष्टता आणावी एवढीच विनंती करतो आ–णि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला विरोध करुन येथेच थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

Formatted: Indent: First line: 0.5"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---------

..3..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव )**

Formatted: Font: Bold, Complex Script Font: Bold

Formatted: Centered

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानण्यासाठी मी उभी आहे. आम्ही मागील 15 वर्षे ~~आम्ही~~ माननीय राज्यपालांचे अभिभाषण आणि त्यावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्यासाठी~~ण्याच~~ तसेच इंदू मिलच्या आवारात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी केंद्र शासनाने अनुमती दिलेली आहे असे सांगितले.

सभापती महोदय, मला या ठिक~~क~~णी काही गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. पुणे शहर हे विद्येचे माहेर घर म्हणून ओळखले जाते. ~~त्यामध्ये~~ माहिती आणि तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून देखील पुणे शहर ओळखले जाते. परंतु आज पुणे शहराबरोबर, नाशिक, औरंगाबाद, नागपूर,कोल्हापूर या शहरांमध्ये आय.टी.सेक्टरची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे त्याबद्दल मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करते.

सभापती महोदय, दिनांक 26/11 रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशामध्ये आणि राज्यामध्ये पुन्हा एकदा चर्चा झाली. 26/11 च्या हल्ल्यात ज्या शूरवीर पोलिसांनी प्रचंड संघर्ष केला, त्यामध्ये काही पोलीस अधिकारी शहीद झाले. त्यांच्यापैकी हुतात्मा तुकाराम ओंबळे ज्यांनी अतिरेक्यांशी लढताना आपल्या प्राणाची आहुती दिली त्या शूरवीर पोलिसाचे स्मरण करण्याचे आपण ठरविले आहे ही अतिशय महत्वाची बाब आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्र 2012 पर्यंत भारनियमनमुक्त करण्यात येईल अशी घोषणा तत्कालीन सरकारने केली होती. परंतु अजूनपर्यंत महाराष्ट्र भारनियमन मुक्त झालेला नाही. आमचे शासन ऊर्जेच्या संदर्भात नवीन पावले उचलणार आहे ही अतिशय स्वागतार्ह बाब आहे.

सभापती महोदय, गेल्या काही वर्षात सहकारी बँका आणि पतसंस्था बुडीत गेल्या. त्यामध्ये पेण अर्बन को-ऑप.बॅक असेल, सांगली-कोल्हापूर परिसरातील सहकारी बँका असतील, पुण्यामधील काही बँका असतील, या सहकारी बँका बुडीत गेल्यामुळे ठेवीदारांचे जीवन उद्धवस्त झालेले आहे. काही ठेवीदार आजारी पडले, काहींनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

काहींनी आत्महत्या केल्या. सहकार क्षेत्रामध्ये ज्या अपप्रवृत्ती वाढल्या होत्या त्याला आळा घालण्यासाठी आणि ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनामार्फत एक धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणामुळे गोरगरीब ठेवीदारांना निश्चितपणे दिलासा मिळेल आणि ते शासनास निश्चितपणे धन्यवाद देतील असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी असंघटित कामगारांच्या प्रश्नासंबंधी प्रश्न व लक्षवेधीच्या माध्यमातून समस्या मांडल्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अठराव्या क्रमांकावर असंघटित कामगारांसंबधीचा मुद्दा आहे. ऊस तोडणी कामगार, कोळसा उद्योग, वीट भट्टया, सफाई कामगार इत्यादींसारख्या असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी हे शासन एक नवीन स्वतंत्र धोरण तयार करीत आहे. 1995च्या सुरुवातीला राज्य सरकारने श्रमशक्ती अहवाल तयार केला होता. श्रीमती इला भट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली होती.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

प्रत्येक सेक्टरमधील असंघटित क्षेत्रातील मजुरांसाठी आणि विशेष करुन महिला वर्गासाठी जे कायदे केले होते त्याची किती अंमलबजावणी झाली आहे आणि त्यात अजून काय करता येईल हे ठरविण्याच्या दृष्टीने या नवीन व स्वतंत्र धोरणाचा फायदा होऊ शकेल, याबाबत मी अभिनंदन करते.

तसेच रोजगाराच्या संदर्भातील योजनांचा उल्लेख अभिभाषणामध्ये मुद्दा क्रमांक-20 वर केलेला आहे आणि तो वेगळ्या प्रकारचा आहे. महोदय, पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले ज्यावेळी सत्ताधारी बाजूमध्ये होते त्यावेळी ते सातत्याने या बाबतचा उल्लेख करीत होते. पण आम्ही आता सत्ताधारी बाजूला आल्यामुळे आम्ही तो मुद्दा विसरलो असे नाही. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी संपूर्ण भारतातून जे भाविक येतात त्या पार्श्वभूमीवर या कामामध्ये अजून प्रगती होण्यासाठी, योग्य ते निर्णय होण्यासाठी किंवा सिंहस्थ कुंभमेळ्याच्या विकास योजनाच्या अनुषंगाने जे काम झाले पाहिजे त्या बाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सूचित केलेला आहे. अशा प्रकारच्या उल्लेखामुळे देखील या गोष्टींना अधिक चालना मिळेल आणि ती कामे वेळेत पूर्ण होतील अशी आमची अपेक्षा आहे. म्हणून या मुद्याचे मी निश्चितपणे स्वागत करते.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात "2022 पर्यंत सर्वांना घरे" हे धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. ही बाब अत्यावश्यक आहे. हे अधिवेशन विदर्भात सुरु आहे. आपल्या राज्याने काही वर्षांपूर्वी आदिवासींसाठी क्रांतिकारी कायदा मंजूर केला होता. त्या कायद्याच्या अनुषंगाने आदिवासींच्या वनहक्कांचे संरक्षण करण्यासंदर्भातील निर्णय झालेले आहेत. या निर्णयांमुळे आदिवासींना वन हक्कांच्या संदर्भात सामूहिक स्वरुपाचे अधिकार मिळू शकतात आणि रोजगाराची सुध्दा निर्मिती होऊ शकते. महोदय, 'पेसा' कायद्याला चालना देण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी कशी होते हे जाणून घेण्यासाठी माननीय राज्यपाल विविध ठिकाणी भेटी देत आहेत. माननीय राज्यपालाच्या अभिभाषणात पेसा कायद्याचा उल्लेख करण्यात आल्याबाबत मी स्वागत करते.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

माननीय सभापती महोदय, कृपया आपण वेळ संपल्याची बेल वाजवू नका. आम्ही विरोधी पक्षात होतो तेव्हा आपण आम्हाला चांगले सहकार्य करीत होता. आता आम्ही सत्ताधारी बाजूला असल्यामुळे पूर्वीसारखेच सहकार्य करावे अशी विनंती करते.

**तालिका सभापती ( श्री.जयवंतराव जाधव)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे. आपण वेळ वाया घालवू नका.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, स्मार्ट सिटीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषण करण्यात आलेला आहे. भारताच्या विशिष्ट शहरामध्ये ज्या घटना घडतात त्यावर आळा घालण्यासाठी उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा असावयास पाहिजेत. अपघात टाळण्याबरोबरच विशिष्ट शहरे दळणवळणाच्या सुविधांनी जोडण्यासाठी जी पावले उचलली पाहिजेत त्यांचा केंद्रीय अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला होता आणि आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सुध्दा स्मार्ट सिटीचा उल्लेख करण्यात आल्याबद्दल मी स्वागत करते.

महोदय, सन्माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी महिला अत्याचाराच्या संदर्भात बोलत असताना स्वत: लोकांना आवाहन केले की, गुंडगिरी करणाऱ्या आणि अपप्रवृत्तीच्या लोकांना रोखण्यासाठी पालकांनी काही तरी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. या पार्श्वभूमीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी महिला पोलिसांची भरती करणे आवश्यक आहे. तसेच पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी राज्य सरकारने जी पावले उचलली आहेत त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात काही प्रमाणात तरी चालना मिळू शकेल असे मला निश्चितपणे वाटते.

महोदय, आमचे सर्वांचे पूजनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी राज्य सरकारने समिती गठित करण्याचे जाहीर केले आहे. त्या समितीच्या कामाची प्रत्यक्षात अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी. माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे अजरामर काम मूलभूत स्वरुपात संयुक्त महाराष्ट्रप्रेमी जनतेच्या समोर आणण्याच्या दृष्टीने, त्यांच्या स्मृती जागृत होण्याच्या दृष्टीने ते दृश्य आणि ठाशीव स्वरुपात असावे म्हणून समिती गठित करणे हे देखील एक महत्त्वाचे पाऊल आहे. महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानते व माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----------

..3..

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अजूनपर्यंत काँग्रेस पक्षाच्या एकाही सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतलेला नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे भाषण झाल्यानंतर आपल्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना संधी देण्यात येईल.

श्री.भाई जगताप : महोदय, सन्माननीय सदस्यांना संधी दिल्याबद्दल माझा आक्षेप नाही. परंतु सभागृहात ज्या चर्चा होतात, विशेषतः अशा प्रस्तावावर जेव्हा चर्चा होते त्यावेळी सभागृहातील सदस्य संख्येनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाते व त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या सदस्यांना संधी दिली जाते. त्यानंतर संख्येनुसार इतर पक्षाच्या सदस्यांना संधी दिली जाते.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे भाषण झाल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाणार आहे. माननीय उप सभापती या बाबत निर्देश देऊन गेलेले आहेत.

श्री.भाई जगताप : याचा अर्थ काँग्रेस पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची संधी द्यायची नाही काय ?

**तालिका सभापती** : या नंतर काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनाच बोलण्याची संधी देण्यात येणार आहे.

श्री.भाई जगताप : माझे म्हणणे एवढेच आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानंतर काँग्रेस पक्षाच्या सदस्यांना संधी द्यायला पाहिजे होती.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, आपल्याकडे वेळ आहे. यानंतर आपल्यालाच बोलण्याची संधी दिली जाईल.

श्री.भाई जगताप : वेळेचा मुद्दा नाही. वेळ उद्या सुध्दा राहणार आहे. आपल्याला सभागृहाच्या प्रथा, परंपरा पाळायच्या नाहीत काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, माननीय उप सभापती मला जसे निदेश देऊन गेलेले आहेत त्यानुसार मी कामकाज करीत आहे. या नंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपले भाषण सुरु करतील.

श्री.भाई जगताप : महोदय, या क्षणाला आपण सभापतीस्थानी असल्यामुळे आपल्याला असे म्हणता येणार नाही.

**तालिका सभापती** : मी असे सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्यानंतर आपल्याला संधी देण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज कसे चालवावे या बद्दल नियम, प्रथा, परंपरा ठरलेल्या आहेत. संख्याबळानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानंतर दुसरा मोठा पक्ष हा काँग्रेस पक्ष आहे. त्यामुळे त्यांना वेळ आणि प्राधान्य द्यायला पाहिजे. त्यामुळे उप सभापतींनी आपल्याला निदेश दिले असे सांगता येणार नाही. तुम्हाला काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी लागेल. आपल्याला प्रथा तोडता येणार नाही.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>राज्यात अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांबाबत</u>

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे नाव पुकारलेले आहे.

श्री.रामनाथ मोते : महोदय, आपली अनुमती असेल तर माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे मला एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्यानंतर मी आपल्याला संधी देतो.

श्री.कपिल पाटील : महोदय, या राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या प्रश्नावर राज्यातील सर्व शाळा दिनांक 12 डिसेंबर, 2014 रोजी बंद राहणार आहेत. या बाबतीत आम्ही माननीय मुख्यमंत्री आणि माननीय शालेय शिक्षण मंत्र्याशी चर्चा केली आहे. त्यांनी या विषयी निवेदन करावे असा आम्ही आग्रह धरलेला आहे. ते या विषयी निवेदन करु शकतात आणि त्यांनी ते निवेदन करावे अशी आमची विनंती आहे. सभागृहात निवेदन करुन त्यांनी या राज्यावर येऊ घातलेले संकट कमी करावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आपण निवेदन करावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या राज्यातील....

श्री.प्रकाश बिनसाळे : महोदय, मंत्री महोदयांनी निवेदन करायचे असते.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी दोघांची विनंती अमान्य केली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. माननीय मंत्री महोदय, आपण एकदा स्वत: बोलता आणि एकदा सन्माननीय सदस्यांना बोलायला सांगत आहात.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलू द्या. माझा त्या बाबतीत काही आक्षेप नाही. त्यांच्या भाषणानंतर मी भाषण करील.

श्री.भाई जगताप : महोदय, आपल्या निर्णयाचा आम्ही मान ठेवतो. पण या सभागृहात एखाद्या सदस्याच्या मनमानीप्रमाणे सभागृहाचा कारभार चालत नाही. या सभागृहाचे काही नियम, प्रथा, परंपरा आहेत आणि त्या वस्तुनिष्ठ आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, या सभागृहात विरोधी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य संख्या 28 आहे त्यानंतर दुसरा मोठा पक्ष काँग्रेस आहे. सभापतीस्थानी माननीय उप सभापती बसलेले असताना त्यावेळी काँग्रेस पक्षाकडून एकाच सदस्याचे नाव पाठविण्यात आले होते. त्यानंतर मी तत्काळ अन्य सदस्यांची नावे पाठविली.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

तरी सुध्दा एक नाव काँग्रेस पक्षाचे होते. त्यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भाषण केले. आम्ही त्यास आक्षेप घेतला नाही. परंतु, जर अशा पध्दतीने एका मोठ्या गटाला वागणूक मिळत असेल तर ते बरोबर नाही. माझी या संदर्भात विनंती राहील. आपण सर्व गोष्टींचा विचार करून निर्णय घ्यावा. काँग्रेस हा संख्याबळानुसार दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपण आम्हाला भाषण करण्यास संधी द्यावी. त्यापूर्वी सन्माननीय सदस्यांना काही बोलायचे असेल तर त्यांना बोलण्यास संधी आहे.

**तालिका सभापती** : आता माननीय मंत्री म्हणणे मांडतील.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना भाषण करण्यास संधी दिली होती. त्यामुळे आपण आपले निर्देश बदलू शकत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील, नागो गाणार, सतीश चव्हाण, अनिल सोले या सर्वांनी दिवसभरात भेटून मला माहिती दिली की, 12 तारखेला संस्था चालकांचा बंद आहे. तो बंद कशासाठी आहे, असे मी विचारले. सरकार प्रोॲक्टिव्ह असल्यामुळे असा बंद, मोर्चा घोषित झाला तर आम्ही विचारतो की, उद्या तुमचा मोर्चा कशासाठी येत आहे ? कारण त्यांचे प्रश्न, समस्या असतात, त्या सरकारने ऐकून घ्यायच्या असतात, सोडवायच्या असतात. सरकार तशी संवेदना नेहमीच दाखविते. बंदच्या बाबतीत ज्या घोषणा झाल्या, त्यासंबंधी मी काही जणांना बोलाविले, भेटलो, बोललो. मी सर्वांशी बोललो. मी सर्व पक्षांच्या प्रतिनिधीशी चर्चा केली. सर्वांच्या मनामध्ये जो विषय आहे तो म्हणजे संच मान्यतेचा. हल्ली हे शब्द देखील पाठ होण्यास वेळ लागतो. संच मान्यता, समायोजन, चिपळूणकर समिती, सर्क्यूलर दिनांक 23.10 असे आहे. मी आता सर्व पाठ करीत आहे. मी त्यांचा सर्व अभ्यासही पूर्ण करीत आलो आहे. लोकप्रतीनिधी म्हणून वेगवेगळ्या प्रकारची माहिती लोक आपल्याकडे देत असतात आणि सरकार म्हणून ते आम्ही तपासत असतो. कोणावरही अन्याय होता कामा नये, ही भूमिका सरकारची आहे. संस्था चालविणाऱ्यांना संस्था चालविणे सोपे जावे. पण सरकारलाही आरटीई कायद्याचे बंधन आहे. या कायद्यामुळे अनेक गोष्टी चांगल्या झाल्या तर अनेक गोष्टींच्या बाबतीत मर्यादाही उत्पन्न झाल्या. आपल्याला गेल्या 2-3 वर्षांत त्या दुरूस्त करता आल्या

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

असत्या. पण तसे झाले नाही. मग या मागील कारणे काही असतील. माझे आपल्यामार्फत सर्व संस्था चालक, संस्था संघटना या सर्वांना आवाहन आहे. वरिष्ठ महाविद्यालयाच्या संघटना देखील 15 तारखेपासून संपावर जाणार असल्याचे म्हणत आहेत. त्यांच्या मागण्या "नो वर्क, नो पे", नेटसेट व वय मर्यादा 60 चे 62 व 62 चे 65 करणे अशा आहेत. त्या मागण्याच्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा झाली आहे. मी सरकार स्तरावर काम करणार आहे. कारण यामध्ये फक्त शिक्षण खात्याचाच नव्हे तर अर्थ खात्याचाही संबंध आहे. मी शैक्षणिक चळवळीत काम केले असल्याने या सर्व विषयांच्या संदर्भात संवदेनशीलपणे काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. कायद्याच्या चौकटीत सर्व बसवावे लागणार आहे. माझी वरिष्ठ महाविद्यालयांच्या संस्था चालकांना विनंती आहे. अधिवेशन संपण्याच्या आत या विषयाच्या संदर्भात सरकारचे ठोस म्हणणे नीट अभ्यास करून नक्की मांडण्यात येईल. विद्यार्थ्यांचे नुकसान होईल अशी कोणतीही कृती त्यांनी करू नये. नवीन सरकार आले आहे. सरकारला येऊन फक्त 40 दिवस होत आहेत. आम्ही सर्व गोष्टींचा आढावा घेऊन प्रोॲक्टिव्ह निर्णय घेत आहोत. आपण निश्चितपणे कौतुक कराल. माझी सर्व संघटनांना विनंती आहे की, आपण सध्या पुकारलेले बंद, संप पुढे ढकलावेत. आंदोलन हा आपला हक्क आहे. आपण ते केलेच पाहिजे. कारण त्या शिवाय संघटना मजबूत होत नाही. ते आपण करा. अधिवेशन संपण्याच्या आत, पुढच्याच आठवड्यात सदर विषयांच्या संदर्भात नीट विचार करून निवदेन करतो. निवेदन झाल्यानंतर आपले समाधान होईल. आपण काळजी करूनये. इतकेच मला आवाहन करायचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी भाषणास सुरुवात करावी.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ....

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी घेतलेल्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो. परंतु, आपण आपला निर्णय घेईपर्यंत मागे घेण्यात आलेला निर्णय तूर्त स्थगित ठेवण्याची घोषणा केली तर राज्यातील शिक्षण क्षेत्राला चांगला मेसेज जाईल, राज्याला प्रोॲक्टिव्ह शिक्षण मंत्री मिळाले असा संदेश जाईल. नवे सरकार शिक्षण, विद्यार्थ्यांचे अधिकार, शिक्षक यांना महत्त्व

..3

श्री. कपिल पाटील ....

देत आहे, हा मेसेज जायचा असेल तर दोन्ही वादग्रस्त निर्णय तूर्त स्थगित करावेत, अशी दोन्ही बाजूच्या शिक्षक व पदवीधर सन्माननीय सदस्यांची विनंती आहे. पूर्वीच्या निर्णयास तूर्त स्थगिती देत आहोत, असे मंत्री महोदयांनी सांगावे आणि तोपर्यंत शासनाने कॉंक्रिट निर्णय घ्यावा. आम्ही भरपूर वेळ देण्यास तयार आहोत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना शिक्षण खाते मिळाल्यानंतर त्यांनी त्यामध्ये रस दाखविला आहे. माननीय मंत्र्यांनी चार्ज घेतल्याबरोबर पहिल्याच दिवशी आम्हा सर्व शिक्षक, पदवीधर सन्माननीय सदस्यांना बोलाविले. सदर विषयाच्या संदर्भातील बैठक जवळपास 1 महिन्यापूर्वी झाली. आम्हाला त्या बैठकीत सांगितले होते की, आम्ही या आठवड्यात स्थगिती देत आहोत. आता एक महिना होत आहे. आमची एकच विनंती आहे की, आपण पूर्वीच्या निर्णयास तूर्त स्थगिती द्यावी आणि त्यानंतर सर्व अभ्यास करुन निर्णय घेऊ एवढे सांगावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचा हा विषय आहे. संच मान्यतेमुळे अतिरिक्त शिक्षक होणे ही बाब आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे 3 वर्षे सेवा पूर्ण करु शकत नाहीत असा त्यांचा प्रश्न आहे. केवळ समायोजनाचा प्रश्न नाही तर त्यांच्या घरी बसण्याचा प्रश्न आहे. नोकऱ्या गेलेले हजारो शिक्षक आहेत. "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत सर्वांचा आग्रह आहे. आपण पूर्वीच्या निर्णयास तूर्त स्थगिती द्यावी, अशी विनंती आहे.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, आपली महत्त्वाची भूमिका आहे. सर्व शिक्षक, संस्था चालक, सन्माननीय सदस्य यांच्या संदर्भात, "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे", अशी माननीय शिक्षणमंत्र्यांची भावना असल्याचे लक्षात येते. आपण निर्णय घेईपर्यंत पूर्वीच्या निर्णयास स्थगिती द्यावी, अशी परत एकदा मी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे म्हणणे खरे आहे. मला शिक्षण खाते मिळाल्यानंतर स्वाभाविकपणे मी सर्व शिक्षक आमदार, शिक्षक संघटना यांना बोलाविले. मी आपणास सांगू इच्छितो की, शिक्षकांच्या 90 टक्के मागण्या वेतनश्रेणीच्या संदर्भातील आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

त्या समजून घेण्यास एवढा वेळ लागला. शैक्षणिक गुणवत्तेचा विषय असेल तर तो मला लवकर समजला असता. कारण, त्यामध्ये मला जास्त रस आहे. परंतु, आकृतीबंध वगैरे विषय समजून घेण्यामध्ये थोडा वेळ लागला. तथापि, मी सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना आश्वस्त करु इच्छितो की, कोणाचीही नोकरी जाणार नाही, त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. आपण आता जी मागणी करीत आहात त्यामुळे अडचणी निर्माण होतील. खालच्या स्तरावर काय अडचणी आहेत, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे या अडचणी वाढू नयेत, याची काळजी आपल्याला घ्यावी लागेल. परंतु, मी पुन्हा एकदा आश्वस्त करतो की, कोणत्याही शिक्षकाची नोकरी जाणार नाही.

धन्यवाद.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु..........

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शन प्रस्तावाला असंमती दर्शविण्यासाठी मी उभा आहे. सुरुवातीलाच मी या अभिभाषणातील मुद्यांना नापसंती दर्शवीत आहे.

सभापती महोदय, राज्यात आज शेतकऱ्यांची जी स्थिती आहे किंवा आज जी दुष्काळी परिस्थिती आहे, ही काही दोन-चार दिवसात तयार झालेली नाही. परंतु, नवीन सरकारने त्या परिस्थितीचे आकलन करुन केंद्राकडे 4500 कोटी रुपयांची मागणी केली आहे. ही मागणी करीत असताना अभिभाषणामध्ये या शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकार नक्की काय करणार आहे किंवा राज्यात दुष्काळ आहे किंवा नाही किंवा दुष्काळसदृश परिस्थिती आहे किंवा नाही, याबाबतचा उल्लेख करणे गरजेचे होते. आजच सकाळी सभागृहात या विषयावर अडीच तासांची चर्चा झाली आहे आणि ती आपण सर्वांनी ऐकली आहे. ही परिस्थिती माहीत असताना सुध्दा या राज्यातील बळीराजाला, शेतकऱ्याला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी सरकार कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहे, याचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये आलेला नाही, याबद्दल मी तीव्र नापसंती व्यक्त करतो.

सभापती महोदय, या राज्यात दररोज सुमारे 15 शेतकरी आत्महत्या करीत आहेत. आज सुध्दा एक आत्महत्या झालेली आहे. गेल्या 3 वर्षांपासून राज्यात कधी अवर्षणप्रवण, कधी दुष्काळी, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट, अशी परिस्थिती सातत्याने आहे. या सर्व संकटातून शेतकऱ्याला बाहेर काढत असताना, ही परिस्थिती ज्ञात असताना सुध्दा राज्यपाल महोदयांच्या भाषणात या संदर्भातील उल्लेख असू नये, याबद्दल मला खरोखरच खेद वाटतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी त्यांच्या भाषणात एका गोष्टीचा उल्लेख केला आणि ती खरी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले या सर्व महापुरुषांची नावे आपण सर्वजण घेत असतो, तो आपल्या

....3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.........

सर्वांचा हक्क सुध्दा आहे, सन्मान आणि मानबिंदू सुध्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात छत्रपतींचा पुतळा अरबी समुद्रात उभारण्याबाबतच्या प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांनी हिरवा कंदिल दाखविला आहे, या गोष्टीचा उल्लेख केला आणि त्याचे मी स्वागत करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची पायाभरणी हे सरकार 14 एप्रिलला करणार आहे. मला एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो की, सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा गुजरातमध्ये उभा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे आणि तो चांगला संकल्प आहे. आम्ही त्या प्रकल्पाचे स्वागत केले आहे. परंतु, या प्रकल्पासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने 200 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. छत्रपतींच्या अरबी समुद्रातील पुतळ्यासाठी असा निधी दिलेला नाही किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठीही दिलेला नाही. मागील सरकारने ज्यावेळी संपूर्ण आर्किटेक्चर समोर आले त्यावेळी स्पष्टपणे असे सांगितले होते की, लागेल तेवढा निधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी उपलब्ध करुन दिला जाईल. या संदर्भात आम्हाला अपेक्षा होती. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून अपेक्षित होते की, कोठे तरी या बाबींचा उल्लेख त्यामध्ये असेल. या सरकारने केलेल्या चांगल्या गोष्टींचे स्वागत आहे, ते नाकारता येणार नाही. मी माझ्या मागील भाषणात "पुतना मावशीचे प्रेम", असा शब्द प्रयोग केला होता व तो काही सदस्यांना आवडला नव्हता. परंतु, आज तो शब्दप्रयोग मी पुन्हा वापरतो आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल प्रेम दाखवीत असताना, छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल प्रेम दाखवीत असताना ते पुतना मावशीचे असू नये. खऱ्या अर्थाने हे प्रकल्प मार्गी लावा, जनतेला कळू द्या, सरकार ज्या प्रमाणे बोलत आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सुध्दा निघाले आहे, असे काही तरी चित्र दिसावयास हवे. जर कोणी असा दावा करीत असेल की, केंद्रीय पर्यावरण विभागाच्या परवानग्या आम्ही मिळविल्या तर मात्र मी सांगू इच्छितो की, ती एक प्रोसेस आहे. मागील काळात थोडी दिरंगाई झाली हे मान्य करुन हे सांगू इच्छितो की, या परवानग्या प्रोसेसनुसार मिळाल्या आहेत. प्रशासकीय काम करीत असताना आम्ही ते केले, असे म्हणणे योग्य नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांची

..4...


SRR/ प्रथम श्री.मंगेश...... 17:40
असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप........

जगभरामध्ये जी ख्याती आहे, ती टिकविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केंद्र सरकारकडून झाले नाहीत किंवा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातही तसे दिसू शकले नाही.

सभापती महोदय, गेल्या 8-10 वर्षांपासून वाळू माफियांचा प्रचंड सुळसुळाट झाला आहे. या संदर्भात केवळ ई-निविदा काढली जाईल, असे म्हणून सर्व संपणार नाही. ई-निविदा काढणार आहोत, ती कशा प्रकारे काढणार आहोत, कार्यपध्दती कशी असेल, हे देखील सांगितले पाहिजे. केवळ चांगले शब्द वापरले म्हणजे लोकांना दिलासा दिला, असे होत नाही. 'ट्विटर'च्या संदर्भात जर आपण मराठीत 'टिवटिव' असा शब्द वापरला तर लोकांना राग येईल. "आपण काल चांगले ट्विट केले", असे म्हणण्याऐवजी मराठीत "आपण काल चांगली टिवटिव केली", असे म्हटले तर कसे वाटेल ? मला फक्त एवढेच म्हणावयाचे आहे की, केवळ चांगले शब्द वापरल्याने लोकांना दिलासा मिळत नाही. मागील काळात आपण पाहिले असेल की, एका तहसीलदाराने वाळू माफियाला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याला मारण्याचा प्रयत्न झाला. एका तहसीलदाराला तर गोळी घालण्यात आली. त्यामुळे ई-निविदा काढण्यामागे शासनाचा दृष्टीकोन काय आहे, कशा प्रकारे कार्यपध्दती असणार आहे, याबाबत स्पष्टता आली पाहिजे. कारण, या सर्व गोष्टींचा संबंध पर्यावरणाशी आणि विकासाशी आहे. आज प्रति ब्रास 2500 ते 3000 रुपये एवढा वाळूचा दर झाला आहे. पर्यायाने त्याचा त्रास गरिबांना होत आहे. त्यांच्या घराची किंमत त्याला परवडेनाशी झाली आहे. त्यामुळे मी या संदर्भात सुध्दा नापसंती व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, "सर्व जिल्ह्यांमध्ये मार्च, 2015 च्या अखेरपर्यंत 7/12 चे अद्ययावत उतारे ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येतील व त्यावर आधारित ई-फेरफार नोंद करण्यात येतील", असा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आला आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, 7/12 उतारा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याचे काम खऱ्या अर्थाने तत्कालीन महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. त्यापुढे जाऊन मला असे म्हणावयाचे आहे की, प्रत्येक गावामध्ये, ग्राम पंचायतीमध्ये संगणकीकरण झाले आहे का, याचा उल्लेख या अभिभाषणात नाही.

यानंतर श्री.मा.शिगम..........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 17:50

श्री. भाई जगताप...

कॉम्प्युटरायझेशन होऊनही हा प्रश्न कसा सुटेल ? जोपर्यंत गावामध्ये इंटरनेट पोहोचत नाही तोपर्यत आपण कितीही मोठया घोषणा केल्या तरी त्या प्रत्यक्षात उतरणार नाहीत. प्रत्येक गावामध्ये विशेषत: ग्रामपंचायतीमध्ये कॉम्प्युटरायझेशन झाले पाहिजे, त्या ठिकाणी इंटरनेट कनेक्शन उपलब्ध झाले पाहिजे. पण या संबंधी या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख आलेला नाही. शेतकरी स्वत: 7/12 चे उतारे घेण्यास जाणार असे आपण म्हटले असले तरी त्या गावामध्ये आठ-आठ बारा -बारा तास लोड शेडिंग असते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला उतारे कोठून मिळणार ? म्हणून हे 7/12 चे उतारे देण्याच्या संदर्भात चांगली कॉम्प्युटरायझेशनची सुविधा, इंटरनेटची सुविधा, अन्य आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या बाबतीत या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख नसल्यामुळे मी नापसंती व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. सर्वजण या विषयाच्या संदर्भात भरभरुन बोलले. लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली. सरकार येऊन एक महिना झाला असला तरी मागील चार महिन्यांच्या कालावधीत महिलांवरील अत्याचाराच्या आणि बलात्काराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. आजच एका 3 वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी हे सरकार काय करणार आहे, कोणती पावले उचलणार आहे ? राज्यपालांच्या अभिभाषणाचा अर्थ काय असतो हे आम्हाला ज्ञात आहे. हे सरकार भविष्यामध्ये कशी वाटचाल करणार आहे याचा रोडमॅप अभिभाषणातून व्यक्त होत असतो आणि त्यानुसार पुढे कार्यवाही होत असते.

एक श्रेय मात्र आपल्या राज्याला घेतले पाहिजे. ते म्हणजे पोलीस दलामध्ये महिलांचा सहभाग हा देशात आपल्या राज्याने प्रथम केला. तुम्हा आम्हाला या गोष्टीचा अभिमान आहे. यापुढेही पोलीस दलामध्ये महिला पोलीसांची संख्या वाढेल. आपण क्रांतिकारी निर्णय घेतल्यानंतर इतर राज्यांनी त्याचे अनुकरण केले. इतर राज्यांमध्ये महिलांसाठी पोलीस स्टेशन्स निर्माण झालेली आहेत. मात्र आपल्या राज्यामध्ये ती सुविधा निर्माण झालेली नाही. एक घटना आपण प्रत्यक्ष पाहिलेली आहे. सायनमध्ये एका 12-13 वर्षाच्या मुलीवर भंयकर अत्याचार झालेला होता. अशा परिस्थितीमध्ये त्या मुलीला पोलीस स्टेशनमध्ये 4 तास बसून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

ठेवण्यात आले होते. आम्ही तेथे गेलो नसतो तर त्या मुलीचा जीव देखील वाचला नसता. महिला पोलीस स्टेशन्स ही काळाची गरज बनलेली आहे. महिला पोलीस स्टेशन्स झाली तर महिलांना त्यांच्यावर झालेल्या अन्याय अत्याचाराच्या बाबतीत त्यांची बाजू महिला पोलिसांसमोर नीटपणे मांडता येईल. महिला पोलीस स्टेशन्सची निर्मिती करण्यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असता तर मी अभिभाषणाचे निश्चितपणे स्वागतच केले असते.

सभापती महोदय, या राज्याने अनेक कायदे केलेले आहेत आणि ते पथदर्शी देखील ठरलेले आहेत. इतर राज्यांनी प्रेरणा घेऊन तसे कायदे बनविलेले आहेत. या कायद्याच्या संदर्भात अभिभाषणामध्ये उल्लेख होईल अशी अपेक्षा होती पण ती फोल ठरली. एक गोष्ट वारंवार सांगितली जात आहे की, 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर या राज्यातील कामगार कायदे बदलले जाणार आहेत. यासंबंधी मोघम उल्लेख आहे. कोणत्याही प्रगतीला आमचा विरोध असण्याचे कारण नाही. 'मेक इन इंडिया' हे नवीन पॅकेज मधील जुने प्रॉडक्ट आहे. त्यासंबंधी वेगळी चर्चा होईल. पण या अभिभाषणामध्ये जे काही नमूद केलेले आहे ते मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

आज कामगार क्षेत्रामध्ये फार बजबजपुरी माजली आहे. महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबई सारख्या शहरामध्ये मिनिमम वेजेस ॲक्टची देखील अंमलबजावणी होत नाही. कंत्राटी कामगारांच्या बाबतीत, अन्य असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या बाबतीत आम्हाला भांडावे लागत आहे. आमचे आघाडीचे सरकार असताना देखील आम्ही भांडत होतो, राज्यातील कष्टकऱ्यांच्या बाजूने उभे राहाण्याचे काम आम्ही करीत होतो. आज अभिभाषणामध्ये ज्या पध्दतीचा उल्लेख केलेला आहे तो पाहता राज्यातील कामगार चळवळ नेस्तनाबूत होईलच पण कामगार देखील देशोधडीला लागल्या शिवाय राहाणार नाहीत हे मी नम्रपणे येथे सांगत आहे.

सभापती महोदय, इंडस्ट्रियल डिस्प्यूट ॲक्ट 1947 हा कामगार चळवळीचा आत्मा आहे. या राज्यातील सत्तेमध्ये आघाडी सरकार हे जास्तीत जास्त काळ राहिले. ते खरे आहे. पण या आय डी ॲक्टला हात लावण्याचा प्रयत्न ना केन्द्रामध्ये झाला ना राज्यामध्ये झाला. म्हणून या कायद्याच्या बाबतीत तुम्ही एखादी जरी रेषा ओढली तरी ती खोडताना तुम्हाला कठीण जाईल. मी राजकीय अभिनिवेश ठेवून बोलत नाही. या कायद्यामध्ये गुजरात, राज्यस्थान, मध्यप्रदेश या

..3..



MSS/ पूर्वी श्री. रोझेकर 17:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

राज्यांनी सुधारणा केलेली असून पंजाब राज्य देखील तशी सुधारणा करण्याच्या प्रयत्नात आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी राज्याचा कारभार हाती घेतल्या बरोबर त्यांनी पहिली घोषणा कोणती केली असेल तर ती या राज्यातील कामगार कायदा बदलण्याची केली. या त्यांच्या घोषणेचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. मला वाईट बोलता येत नाही. पण आपण कुठे चाललो आहोत याचे भान राज्यकर्त्यांना नसेल तर राज्य रसातळाला जाण्यास वेळ लागणार नाही. राज्याच्या अकरा कोटी लोकसंख्येमधील 80 टक्के लोक कष्टकरी आहेत. मग ते असंघटित क्षेत्रातील कामगार असतील, कारखान्यामधील कामगार असतील अन्य क्षेत्रातील कामगार असतील, त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण राहाणार नाही. इतर राज्यामध्ये या कायद्यात बदल झालेला आहे. आपल्या राज्यातील कायद्यामध्ये हा बदल करण्याचा घाट घातला जात आहे. हा बदल कसा घातक आहे याचे मी एक उदाहरण देतो. कंपनी कायद्यामध्ये असे आहे की, कंपनीच्या आवारामध्ये एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्या बाबतीत मालकाला जबाबदार धरले जाते. आपण सर्वजण कामगारांच्या बाबतीत संवेदनशील असल्यामुळे हा कायदा वाचला असेल. या कंपनी कायद्यामध्ये बदल करण्याचा घाट घातलेला आहे. तुम्ही जर मालकाला अशा प्रकारे सूट दिली तर मालकावर कोणतेही बंधन राहाणार नाही. कामगाराचे काम करताना अर्धे बोट तुटले तर किती नुकसान भरपाई द्यावी, संपूर्ण बोट तुटले तर किती नुकसान भरपाई द्यावी यासंबंधीच्या तरतुदी कंपनी कायद्यामध्ये आहेत. मी राज्यातील सर्वसामान्य माणसाच्या संदर्भातील, कष्टकऱ्यांच्या संबंधातील मुद्दे मांडलेले आहेत. त्या मुद्यांच्या संदर्भात मला चिंता आहे. मी मांडलेल्या मुद्यांना माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. कंपनी कायद्यामध्ये बदल केला तर फार मोठी आफत ओढवेल. भोपाळची दुर्घटना आम्ही विसरलो नाही. एका रात्रीमध्ये हजोरो लोक मृत्युमुखी पडले. हजारो संसार बरबाद झाले. कंपनी कायद्यामध्ये मालकाला सवलत दिली तर मालक म्हणेल की जी काही कारवाई करायची आहे ती कंपनीच्या शिपायावर करा आणि मालक मात्र त्यातून सुटून जाईल. तो शिपाई देखील कामगारच असतो. अशा प्रकारचे दुष्टचक्र आपल्या महाराष्ट्रामध्ये आपण येऊ देता कामा नये.

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धप्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:00

श्री.भाई जगताप.........

या राज्यामध्ये गिरणी कामगारांच्या बाबतीत सभागृहामध्ये अनेक वेळेला भाषणे केली गेली आहेत. त्या भाषणांचा एक मोठा ग्रंथ निर्माण होईल. त्या कामगारांच्या घरांचा प्रश्न आघाडी सरकारने सोडविला. ते सांगण्यासाठी भविष्यवेत्त्याची गरज नाही. 8000 घरांचे वाटप आम्ही स्वत: जागेवर जाऊन केले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबद्दल उल्लेख होणे आवश्यक होते. जवळजवळ 1.60 लाख गिरणी कामगार आयडेंटिफाय झाले आहेत. पूर्वी 80 हजार गिरणी कामगार होते. परंतु शासनाने सर्व कामगार संघटनांशी चर्चा करुन, सर्व पक्षीय नेते आणि संघटना यांच्याशी चर्चा केल्यानंतर 1.60 लाख गिरणी कामगार आयडेंटिफाय झाले. त्यांच्या घराबाबत एका शब्दानेही अभिभाषणात उल्लेख झालेला नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, प्रत्येक वेळेला अवर्षण, दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस झाल्यानंतर आपण चर्चा करतो. आज मराठवाड्यामध्ये काय स्थिती आहे याची सर्वांना कल्पना आहे. पाऊस पडत असताना आणि पाऊस संपल्यानंतर आपण चर्चा करतो. आपल्याकडे अनेक अहवाल आलेले आहेत. माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी त्याबाबत उल्लेख केला आहे. मागे काय झाले यावर चर्चा करण्यापेक्षा आज काय स्थिती आहे, त्याबाबत काय करु इच्छितो हे समोर येणे आवश्यक आहे. आपण तत्कालिक विचार करुन पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. भविष्यात काय होणार आहे, किती पाऊस पडणार आहे हे तुम्हा आम्हाला माहिती नाही. आज निसर्ग ज्या पध्दतीने बदलत आहे ते पाहता कोणत्या वेळी पाऊस भरपूर येईल हे कोणीही सांगू शकत नाही.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री हे स्वत: दुष्काळी भागात फिरलेले आहेत. त्यांनी अनेक उपाययोजना सूचित केल्या आहेत. कोकणामध्ये आंबा, काजू आणि भात ही मुख्य नगदी पिके आहेत. यावर्षी कोकणामध्ये बऱ्यापैकी पाऊस पडला, त्यामुळे पीक भरपूर आले होते. कोकणातील वातावरणामुळे पीक लवकर तयार होते. दिवाळीच्या वेळेला सातत्याने 12 दिवस पाऊस पडल्यामुळे शेतातील कापणीला आलेले उभे पीक उद्ध्वस्त झाले. याबद्दल कोणी ब्र काढल्याचे मला आठवत नाही.

सभापती महोदय, मराठवाड्यातील अनेक तालुक्यातील परिस्थिती अतिशय वाईट आहे. या चर्चेला महसूल मंत्री उत्तर देणार असतील तर माझी त्यांना विनंती आहे की, पावसामुळे ज्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.........

शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झाले अशा कोकणातील शेतकऱ्यांना सुध्दा शासनाने आर्थिक मदत जाहीर करावी. पूर्वी आंब्याचे पीक एप्रिल-मे महिन्यामध्ये यायचे. आता नोव्हेंबर महिन्यात आंब्याची पहिली पेटी बाजारात विक्रीला आली. नोव्हेंबर महिन्यात पडलेल्या पावसाने उभ्या पिकाचे वाटोळे केले आहे. कोकणातील आंबा, धान व काजू पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. तेथील शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची भूमिका या अभिभाषणामध्ये दिसून आलेली नाही. त्या संदर्भात शासनाने निश्चितपणे विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सुरुवातीला गोंधळ झाला त्याबद्दल मनामध्ये कोणताही किंतू न बाळगता मी नम्रपणे सांगू इच्छितो की, माझा उद्देश निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न होता. या सर्वोच्च खुर्चीचा सन्मान आम्ही ठेवला नाही तर कोणाकडून अपेक्षित करायचे आणि त्यांनी न्याय दिला नाही तर आम्ही कोणाकडे पहायचे हा प्रश्न आहे. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील भ्रष्टाचाराबाबत अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख झालेला नाही. या सभागृहात मी अनेकदा ही भूमिका मांडली आहे. राज्यातील जी शासकीय कार्यालये आहेत त्यांच्या कामकाजाची वेळ निश्चित ठरलेली आहे. सायंकाळी 6.00 नंतर कार्यालये सुरु राहतात. सायंकाळी 6.00 नंतर शासकीय कार्यालयात कोण येतात? मंत्रालयामध्ये सायंकाळनंतर एजंट, ठेकेदार, जमिनीचे व्यवहार करणारी मंडळी येत असतात. आम्ही ज्यावेळी जिल्हास्तरीय शासकीय अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी जात असतो त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात येते की, साहेब मंत्रालयात गेले आहेत, जिल्हाधिकाऱ्यांकडे गेले आहेत, आयुक्त कार्यालयात गेले आहेत. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस हे अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात असा माझा अनुभव आहे. या सभागृहातील माननीय सदस्यांचे अनुभव वेगवेगळे असू शकतात. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्यामुळे शासकीय कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताची येण्याची व जाण्याची नोंद होईल. ही सर्व माहिती सर्वसामान्य माणसांना माहितीच्या अधिकाराखाली खुली करण्यात यावी. सर्वच मंत्री महोदयांनी देखील त्यांच्या कार्यालयाला हे नियम लागू करावेत. सायंकाळी 6.00 नंतर मंत्री महोदयांनी देखील कार्यालयात बसू नये. सकाळी लवकर उठावे आणि वेळेत कार्यालयात हजर व्हावे. या विषयाकडे शासनाने गंभीरपणे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये मंत्री महोदयांना डावलून अधिकारीवर्ग काम करीत आहे. माननीय महसूल मंत्री विरोधी पक्षनेता होते, युती सरकारमध्ये मंत्री होते आणि आता पुन्हा मंत्री म्हणून काम करीत आहेत. नवीन सरकारकडून आमच्या खूप अपेक्षा आहेत. शासकीय कारभारामध्ये फरक पडलेला दिसून येत नाही. मंत्रालयातील कार्यालये सायंकाळी 6.00 नंतर बंद होतील अशी व्यवस्था करण्यात यावी. आणीबाणीपूर्वी स्व.शंकरराव चव्हाण या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यापूर्वी मंत्रालयात चालणे कठीण व्हायचे, इतक्या मोठया प्रमाणात एजंट मंडळींचा

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..............

मंत्रालयात वावर असायचा. स्व.शंकरराव चव्हाण यांनी प्रवेशपत्राशिवाय आणि दुपारी 3.00 पूर्वी मंत्रालयात अभ्यागतांना प्रवेश मिळणार नसल्याचा नियम लागू केला होता. मंत्रालयात अभ्यागतांना प्रवेशपत्र देण्याची प्रथा शंकरराव चव्हाण यांनी सुरु केली. माननीय महसूल मंत्र्यांनी अशा प्रकारचा ठोस निर्णय घ्यावा आणि तो सभागृहामध्ये जाहीर करावा. महसूल मंत्र्यांच्या कॅबिनमध्ये कोण मंडळी येतात, कुठून जातात हे लोकांना कळले पाहिजे. सत्तेमध्ये बदल झाला तरी तेच तेच लोक मंत्र्यांकडे येत आहेत, हे बदलले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, वाळूच्या संदर्भात माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उल्लेख केला आहे. वाळूचे उत्खनन करताच येत नाही असे माझे म्हणणे आहे. महसूल मंत्र्यांकडून हीच भूमिका अपेक्षित आहे. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी सभागृहात केलेली अनेक भाषणे मी ऐकली आहेत.

नंतर 2 एल...1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील......

महत्वाचा प्रश्न म्हणजे मुंबई, पुणे व नाशिकसारख्या महानगरांमध्ये जी डेव्हलपमेंट होत आहे त्यासाठी लागणारी रेती पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने वाळू उत्खननाचे प्रमाण वाढत आहे. केरळ आणि तामिळनाडू सरकारने वाळू उत्खननाच्या संदर्भात एक जी.आर. काढला असून त्याची प्रत मी मागविली असून ती आपणास सादर करणार आहे. त्यात वाळू उपसा करणाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात असे त्या सरकारने ठरविले आहे. आज आपल्या राज्यात वाळू उपशाच्या वाढत्या प्रमाणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास तर होतच आहे पण राज्य शासनाचा महसूल बुडवून तलाठ्यापासून सचिवांपर्यंत हप्ते पोहचविले जातात. यात प्रामुख्याने तलाठी, पोलीस इन्स्पेक्टर, नायब तहसीलदार, तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी व मंत्रालयापर्यंत राजरोसपणे हप्ते पोहचविले जातात, याकडे शासनाने कटाक्षाने लक्ष देऊन हे बंद केले पाहिजे. पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यात असलेल्या माळीण गावावर जे संकट कोसळले ते उत्खननामुळेच. संपूर्ण जगाला ग्लोबल वॉर्मिंगची समस्या भेडसावत असताना आपण त्यात पर्यावरणाचा नाश करण्यासाठी प्रोत्साहन देतो की काय अशी शंका येते. म्हणून निसर्गाचे सौंदर्य अबाधित कसे राखता येईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. तामिळनाडू राज्यात कंबोडियामधून उत्कृष्ट वाळूचा पुरवठा होतो, तशी वाळू आपल्या राज्यात कोठेच मिळत नाही. त्याचाच परिणाम म्हणून निकृष्ट दर्जाचे बांधकाम होताना दिसत आहे. आज आपल्या राज्यात वाळू माफियांचे प्रस्थ एवढे वाढलेले आहे की, ते ठरवितात कोणत्या उमेदवाराला मत द्यावयाचे आणि कोणाला देऊ नये. संपूर्ण शासकीय यंत्रणा त्यांच्या ताब्यात आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ऑन लेग असतील. आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन उद्या गुरुवार दि. 11 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायं. 6 वाजून 13 मिनिटांनी गुरुवार, दि. 11 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही